## युपीत पोलिसांची बस उलटली, २९ जखमी

■ वृत्तसंस्था, बालिया, दि. ३० :

यूपीच्या बलिया येथे पोलिस कर्मचाऱ्यांना घेऊन जाणाऱ्या जीर्ण बसला अपघात झाला. बस ३-४ वेळा उलटली आणि महामार्गावरून खाली पडली. या अपघातात २९ जवान जखमी झाले आहेत. यापैकी १० जणांची प्रकृती चिंताजनक आहे. हे सर्व बिहार विशेष शस्त्र पोलिसांचे शिपाई होते.

छठपूजेच्या वेळी ड्युटीसाठी रोहतासहून सिवानला जात होते. मंगळवारी रात्री १२.३० च्या सुमारास यूपी-बिहार सीमेवर बैरिया पेट्रोल पंपाजवळ हा अपघात झाला. या घटनेनंतर रस्त्याने जाणाऱ्यांनी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून जखमी जवानांना कसेबसे बसमधून काढून सोनबरसा सीएचसीमध्ये नेले.


Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक २०४ * * नागपूर *

गुरुवार, दिनांक ३१ ऑक्टोबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)


अग्राग्रलेख

## खरीखरी...

## बंडोबांचे बंड

आपल्या महाराष्ट्रात या विधानसभेच्या निवडणुकीत असे म्हणतात स्पर्धा कुठेच आली नाही. पण युती आणि आघाडीत बंड मात्र जिकडे तिकडे चोहीकडे दिसू लागलेले आहे. आज आचार्य अत्रे हयात असते. तर त्यांनी 'गेल्या दहा हजार वर्षात अशी निवडणूक झाली नाही, असे विधान केले असते. कोणत्याच पक्षात शिस्त नाही. आपल्या लोकांवर भिस्त नाही आणि बाहेरून उमेदवार आयात करण्यात कोणालाही लाज वाटत नाही. त्यामुळेच जे जे उभे आहेत त्यांचा माज उतरत नाही. पक्ष-बिक्ष जाऊ द्या. तिकीट असेल तर पक्ष, नाहीतर आमचे एकच लक्ष्य, निवडून येण्यासाठी स्वपक्ष सोडून अपक्ष! महाराष्ट्रातील तीन तीन प्रमुख पक्षांमधील नेमका कोणता पक्ष महत्त्वाचा आहे. हे कोण ठरवणार? काँग्रेसने लोकसभेसाठी 48 पैकी 14 जागा जिंकल्यामुळे निदान लोकसभेसाठी तरी महाराष्ट्रात काँग्रेस पक्ष बलबलवान आहे. असे म्हणायला हरकत नाही. जो काँग्रेस पक्ष भाजप सोडून आणि इतर दोन पक्ष अभंग असताना सर्वात शेवटच्या क्रमांकावर होता. त्यानेच एवढी प्रगती केली की, आता तोच पक्ष प्रथम क्रमांकावर आला आहे. हा प्रथम क्रमांक राहुल गांधीच्या करिष्म्यामुळे आला आहे की, मोदी साहेबांच्या करिष्मा गेल्यामुळे आला आहे. याचे आम्हाला ज्ञान नाही. परंतु पहिल्या क्रमांकाचा पक्ष असूनही काँग्रेसला आपल्या महाराष्ट्राच्या महाविकास आघाडीत कोणीच त्यांना क्रमांक एकचा पक्ष मानायला तयार नाही. शरद पवार साहेब तर पक्के खिलाडी आहेत. कोणाला कुठे उभे करावे, हे त्यांना चांगलेच समजते. उद्धवजींचा पक्षही भावी मुख्यमंत्री म्हणून उद्धवजीच कसे योग्य आहेत. याचाच पाढा वाचत आहे. उद्धवजींची शिवसेना आणि काँग्रेस त्यासोबतच शरद पवार यांची राष्ट्रवादी हे सगळे आता तरी एकाच माळेत आहेत. त्या माळेचा मेरुमणी सिल्वर ओक येथे विराजमान आहे. याची आघाडीला परिपूर्ण जाण आहे. इकडच्या गदारोळा नंतर आता आपण तिकडच्या गदारोळाकडे बघूया. तिकडे आणि इकडे जशीच्या तशीच परिस्थिती आहे. त्यामुळेच कोणीही नाकाने कांदे सोलण्याचा प्रयत्न करू नये, हेच बरे! आता प्रत्येक पक्षातील बड्या बड्या नेत्यांकडे बंडोबांना थंड करण्याचे मार्ग आहेत. रामभक्त भाजपाला परवाच्या लक्ष्मीपूजना नंतर लक्ष्मी मातेची आरती गायला आणि त्यांचा कृपाप्रसाद मिळवायला मोठीच संधी आहे. इतर सगळे पक्षही दिवाळीच्या दिवशी लक्ष्मीपूजन करतील. पण रामभक्त असलेल्या भारतीय जनता पक्षाला, लक्ष्मी मातेच्या विशेष प्रेमाची गोडी लागलेली आहे. आपल्या महाराष्ट्रात राजकारण आणि नाटक यांचे वेड आहे. हेच वेड पांघरून सगळेच इच्छुक पक्षी पेडगावकडे निघाले आहेत. या पेडगावातील 'पेड' चा इंग्रजी अर्थ कोणीही घेऊ नये. हे एका साध्या सोप्या मराठी म्हणी तील हे पेडगाव आहे. आता शेरोशायरीप्रिय श्रीमान निवडणूक आयुक्तांनी सर्वांनीच नियमाप्रमाणे वागावे. असा फतवाच काढला आहे. पण प्रत्येक गोष्टीला थोडासा अपवाद असतोच. तसाच याही बाबतीत एक-दोन पक्षांचा अपवाद केला तर काय बिघडले? त्यामुळे आता धर्म जाणून घ्यावा, मात्र त्या पावलाचे मर्म जाणून घ्यायचा, प्रयत्न जनतेने करू नये. एवढीच आमची विनंती आहे. आपल्या सुवर्णमय भूतकाळात आणि उज्वल भविष्यकाळात याची सांगड घालून जनतेच्या कल्याणाकरता आणि जनता म्हणजे आमचे कुटुंबच आहे. असे आम्ही समजतो. त्यामुळेच जनता कुटुंबाच्या कल्याणासाठी जे जे करायचे. ते आम्ही करणारच. त्याला जनतेने समजून घ्यावे आणि आमच्या पदरात आमदारकीची ओवाळणी घालावी. एवढीच एक विनंती आहे !


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


# दिग्गज नेते ठोकणार महाराष्ट्रात तळ!

## पंतप्रधान मोदी, अमित शाह, योगींच्या १०० हून अधिक सभांचे नियोजन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि.३० :

भाजपच्या वतीने विधानसभा निवडणूक प्रचाराचा मेगा प्लॅन तयार केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह बडे नेते प्रचाराच्या रणधुमाळीत उतरणार आहेत. मोदी यांच्यासह अमित शाह, योगी आदित्यनाथ अनेक जाहीर सभांना संबोधित करणार आहेत.

मुंबई-कोकण, विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्रात मोदी ८ सभा घेणार आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावरही जास्तीत जास्त सभा घेण्याची जबाबदारी असणार आहे.

भाजपकडून विधासनभा निवडणुकीच्या प्रचारासाठी १०० हून अधिक सभांचे नियोजन



करण्यात आले आहे. मोदी ८ सभा घेणार असून गृहमंत्री अमित शाह २० तर नितीन गडकरी यांच्या ४० सभा होणार आहेत. फडणवीस सर्वाधिक ५० प्रचार सभा घेणार आहेत. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ १५ सभांना संबोधित करतील. बावनकुळेंच्या ४० सभा होतील.

नरेंद्र मोदी ७ ते १४ नोव्हेंबर महाराष्ट्रात तळ ठोकून असणार आहेत. या ८ दिवसांत ते विविध मतदारसंघात जाहीर सभा घेतील. भाजपाचे सर्व मोठे नेते केवळ भाजपच नाही तर महायुतीच्या घटक पक्षातील उमेदवारांच्या प्रचारासाठी सुद्धा सभा घेणार असल्याचे सुत्रांनी सांगितले.

## राहुल गांधी, खरगे नागपुरातून फोडणार आघाडीच्या प्रचाराचा नारळ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि.३० :

काँग्रेस पक्षाकडून आगामी ६ नोव्हेंबरला नागपुरात संविधान परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात काँग्रेस नेते राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाने काँग्रेस पक्ष राज्यात अधिकृतपणे निवडणूक प्रचाराला सुरुवात करणार आहे.

लोकसभा निवडणुकीतील विजयानंतर काँग्रेसमध्ये उत्साह संचारला आहे. लोकसभा निवडणुकीत काँग्रेस लहान भाऊ असताना विधानसभा निवडणुकीत मोठ्या भावाच्या भूमिकेत आहे. काँग्रेस आघाडीत १०३ विधानसभा जागांसाठी आपल्या उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. त्याचबरोबर अनेक जागांवर



मैत्रीपूर्ण लढतीही होत आहेत. विदर्भातील ६२ पैकी ४० जागा काँग्रेस लढवत आहे.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी येत्या ६ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार असल्याची माहिती काँग्रेसने बुधवारी दिली. यामुळे त्याच दिवशी काँग्रेस आपल्या राज्य विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा नारळ फोडणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

राहुल गांधी, खर्गे यांच्यासह इतर राज्यातील काँग्रेसचे काही खासदार तसेच काँग्रेसशासित राज्याचे मुख्यमंत्री महाराष्ट्रात आघाडीच्या प्रचाराला येणार आहेत.

## अजित पवार, एकनाथ शिंदेंचा पक्ष भाजपने संपवला - चेन्नीथला

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.३० :

महायुती संपली आहे तिचे काही अस्तित्व उरले नाही, महायुतीमध्ये केवळ भाजप निवडणूक लढवत आहे. शिंदेगट आणि अजित पवार यांच्या पक्षातून केवळ भाजपचे उमेदवार निवडणूक लढवत आहे असा टोला काँग्रेस प्रभारी रमेश चेन्निथला यांनी लगावला.

मविआमध्ये सर्व पक्ष एकत्र निवडणूक लढवत आहेत. तर दुसरीकडे महायुतीमध्ये केवळ भाजप निवडणूक लढत आहे, शिंदेगटातून भाजपचे उमेदवार लढताय, अजित पवारांच्या पक्षातून भाजपचे लोकं लढत आहे, हे सगळं त्यांचे पक्ष संपवण्यासाठी सुरू असल्याचे ते म्हणाले.

## २०२९ ला मनसेचा मुख्यमंत्री

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.३० :

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आपल्या विधानाने मतमोजणी पूर्ण होण्याआधीच एकाप्रकारे निवडणुकीचा निकाल जाहीर केला आहे. २०२४ मध्ये भाजपचा मुख्यमंत्री होणार असून हा आपला अंदाज असल्याचे त्यांनी म्हटले आहे. २०२४ मध्ये मुख्यमंत्री भाजपचाच होईल, तर २०२९ मध्ये मुख्यमंत्री हा मनसेचा असेल, असा दावाही राज ठाकरे यांनी व्यक्त केले. त्यांच्या या विधानामुळे महायुतीच्या वतुर्ळात खळबळ उडाली आहे.

**राज ठाकरे यांच्या दाव्याने महायुतीमध्ये खळबळ**



## भारत-चीन सीमेवर सैन्य माघारीची प्रक्रिया पूर्ण

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३० :

भारत-चीन सीमेवरील डेपसांग आणि डेमचोक येथून सैन्य मागे घेण्याची प्रक्रिया बुधवारी पूर्ण झाली. गुरुवारी दिवाळीच्या दिवशी चीन आणि भारताचे सैनिक एकमेकांना मिठाई खाऊ घालतील. गस्तीबाबत लवकरच ग्राऊंड कमांडरच्या अधिकाऱ्यांमध्ये चर्चा होणार आहे. ग्राउंड कमांडर्समध्ये ब्रिगेडियर आणि त्याहून कमी दर्जाचे अधिकारी असतात.

गस्तीबाबत भारत आणि चीन यांच्यात झालेल्या करारावर परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी सैन्य मागे घेणे ही पहिली पायरी असल्याचे सांगितले होते. पुढील पायरी म्हणजे तणाव कमी करणे. हा तणाव तेव्हाच कमी होईल जेव्हा भारताला खात्री होईल की चीनलाही तेच हवे आहे. तणाव कमी झाल्यानंतर सीमेचे व्यवस्थापन कसे करायचे यावर चर्चा केली जाईल. पूर्व लडाखमधील सीमावादावरून भारत आणि चीनमध्ये चार वर्षांपासून तणाव होता.

## मनसुखची हत्या त्यांनीच घडवून आणली

**अनिल देशमुखांचा फडणवीसांवर आरोप**

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि.३० :

देवेंद्र फडणवीस, परमबीर सिंह आणि सचिन वाझे हे तिघेही एकच आहेत. फडणवीसांच्या जवळचे असणारे परमबीर सिंह आणि सचिन वाझे यांना मनसुख हिरेनच्या हत्येची माहिती होती, त्यांनीच हत्या घडवून आणली, असा आरोप माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी केला आहे. हे दोघे काय करत असतात हे फडणवीस यांना माहीत असल्याचे देखील देशमुख म्हणाले.



**फडणवीसांचा सवाल...**

एका वृत्तवाहिनीशी बोलताना फडणवीस यांनी अनिल देशमुख यांना एक प्रश्न विचारला होता. अनिल देशमुख यांना माझा एकच प्रश्न आहे. मला माहीत आहे याचे उत्तर ते देणार नाहीत . मनसुख हिरेनची हत्या होणार, हे अनिल देशमुख यांना माहीत होते की नाही? याचे उत्तर त्यांनी दिले पाहिजे, असे फडणवीस म्हणाले होते.

मनसुख हिरेन हत्याप्रकरणी बोलताना अनिल देशमुख म्हणाले, मानसुख हिरेन यांची हत्या झाल्यावर त्यांचा मृतदेह सकाळी सापडला. जोपर्यंत मृतदेहाची घरच्यांकडून ओळख पटत नाही तोपर्यंत त्याबाबत माहिती देता येत नाही. फडणवीस यांना एवढेही ज्ञान नाही याचे मला आश्चर्य वाटते. फडणवीस हे स्वतः गृहमंत्री आहेत. गृहमंत्रीपदाचा किती अभ्यास आहे हे यातून दिसत असल्याची टीका अनिल देशमुख यांनी केली आहे.

## ईव्हीएम सुरक्षा वाऱ्यावर चार पोलीस निलंबित

■ महासागर प्रतिनिधी
कारंजा/वाशिम, दि.३० :

ईव्हीएमच्या सुरक्षेकरिता तैनात पोलीस कर्मचारी रात्री झोपलेले आढळल्याने चार शिपायांना निलंबीत करण्यात आले.

विधानसभा निवडणुकीसाठी पूर्व तयारीकरिता कारंजा शहर येथील शेतकरी निवासात ईव्हीएम ठेवण्यात आल्या आहेत. सुरक्षेकरितासाठी दोन सहफौजदारांसह एक हवालदार आणि एक पोलिस शिपाई असे चार कर्मचारी होते. जिल्हाधिकारी भुवनेश्वरी एस. यांनी रात्री १२ नंतर दिलेल्या भेटीत हे कर्मचारी झोपलेले आढळून आले. कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी त्यांच्यावर तत्काळ प्रभावाने निलंबनाची कारवाई करण्यात आली. याबाबतचे आदेश पोलिस अधीक्षकांनी काढले.

निलंबीत करण्यात आलेल्यांमध्ये सहायक फौजदार गजानन मनवर, सुरेश सोनोने, हवालदार गणेश थोरात आणि शिपाई जितेंद्र साखरकर यांचा समावेश आहे. ईव्हीएम देखरेख साठी ड्यूटी लावली होती . मात्र ईव्हीएम गार्डला रात्री १२ वाजेनंतर जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी भेट दिली असता गार्ड ड्यूटी अंमलदार हे त्यांना झोपलेले आढळून आले.

ईव्हीएम स्ट्राँग गार्ड ड्यूटी ही अत्यंत महत्त्वाची असल्याने त्याबाबत गार्डवरील पोलिस अंमलदारांना सक्त सूचना देण्यात आल्या असतानाही पोलिस अंमलदारांनी त्यांच्या कर्तव्यात अत्यंत गंभीर चूक केल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यात आल्याचे सांगण्यात आले.







# स्थानिक शिवसैनिक विरोधात मुख्यमंत्र्यांच्या भेटीला कथोरे

## चर्चांना उधाण, शिवसैनिक भूमिका बदलणार का याकडे लक्ष



ठाणे, दि. ३० : प्रतिनिधी

मुरबाड विधानसभा मतदारसंघात बदलापूर शिवसेना शहर प्रमुख वामन म्हात्रे यांनी आमदार किसन कथोरे यांच्या विरुद्ध बंडाचे निशाण फडकवले असतानाच सोमवारी किसन कथोरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे येथील निवासस्थानी त्यांची भेट घेतली. या भेटीत नेमकी काय चर्चा झाली याचा तपशील गुलदस्त्यात आहे. मात्र या भेटीमुळे चर्चांना उधाण आले आहे. स्थानिक शिवसैनिकांचा निर्णय बदलण्यासाठी ही भेट होती का अशीही चर्चा रंगली आहे. मुरबाड विधानसभा मतदारसंघात कधी नव्हे ते निवडणुकीपूर्वीच विद्यमान आमदार किसन कथोरे यांना मोठे आव्हान निर्माण करण्यात आले आहे. यात स्वपक्षीय भाजपासह महायुतीतील घटक पक्ष असलेल्या शिवसेना पदाधिकाऱ्यांचाही समावेश आहे.

बदलापूर शिवसेनेचे शहर प्रमुख वामन म्हात्रे यांनी आमदार किसन कथोरे यांच्या विरुद्ध बंडाचे निशाण फडकवले. तसेच आपण अपक्ष उमेदवारी दाखल करू असेही संकेत दिले. या घटनेला दोन दिवस उलटत नाही तेच आमदार किसन कथोरे यांनी म्हात्रे यांचे निकटवर्तीय असलेले आणि बदलापूर शहर शिवसेनेचे उपशहर प्रमुख तेजस म्हसकर यांचा भाजपात प्रवेश घडवून आणला. यामुळे शिवसेनेत अस्वस्थता पसरली. त्याच्या दुसऱ्याच दिवशी आमदार किसन कथोरे यांनी भाजपातर्फे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. हा अर्ज दाखल करतेवेळी शिवसेनेचे प्रमुख माजी नगरसेवक अनुपस्थित दिसले. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी वामन म्हात्रे यांनी माध्यमांशी बोलताना शिवसैनिकांची अस्वस्थता बोलून दाखवली.

शिवसेनेच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असताना आम्हाला उत्तर द्यावेच लागेल, अशी प्रतिक्रिया वामन म्हात्रे यांनी दिली होती. एकीकडे महायुतीतील शिवसेना हा महत्त्वाचा घटक पक्ष किसन कथोरे यांच्या विरुद्ध उभा राहतो की काय असा प्रश्न आहे. त्यातच शिवसेनेच्या एका पदाधिकाऱ्याला कथोरे यांनी भाजपात प्रवेश दिला. या पार्श्वभूमीवर शहर शिवसेनेत कथोरे यांचा प्रचार करायचा की नाही याबाबत एक वाक्यता नाही. स्थानिक पातळीवर महायुतीत अशी विरोधाभासी परिस्थिती असताना सोमवारी आमदार किसन कथोरे यांनी शिवसेनेचे मुख्य नेते आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची त्यांच्या ठाणे येथे निवासस्थानी भेट घेतली. यावेळी आमदार कथोरे यांनी एकनाथ शिंदे यांच्यात काय चर्चा झाली याचा तपशील कळू शकलेला नाही. मात्र स्वतः किसन कथोरे यांनी आपल्या फेसबुक खात्यावरून या भेटीची माहिती आणि फोटो पोस्ट केला. स्थानिक पातळीवर शिवसैनिकांना महायुतीचा धर्म पाळत प्रचारात सहभागी होण्यासाठी समज देण्याची विनंती मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. त्यामुळे आता या भेटीनंतर शिवसेना शहर शाखेचे स्थानिक पदाधिकारी आणि शहरप्रमुख वामन म्हात्रे काय भूमिका घेतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# मुख्यमंत्री 37 कोटींच्या संपत्तीचे मालक पण वाहन मात्र बोलेरो आणि आरमाडा

ठाणे, दि. ३० : प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीसाठी कोपरी-पाचपखाडी मतदारसंघातून राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल केला असून ३७ कोटी ६८ लाख रुपयांच्या संपत्तीचे मालक असलेल्या शिंदे यांच्याकडे मात्र बोलेरो आणि आरमाडा ही दोन वाहने आहेत. तसेच गेल्या पाच वर्षात शिंदे यांच्या संपत्तीत २४ कोटी रुपयांची वाढ झाल्याचे समोर आले आहे. शिंदे यांचे शिक्षण एमएपर्यंत झालेले आहे.

शिवसेनेतील बंडानंतर ठाणे लोकसभेची जागा जिंकून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तेच ठाणेदार असल्याचे दाखवून दिले होते. सहा महिन्यांपूर्वी झालेल्या या निवडणुकीनंतर आता विधानसभा निवडणूक होत असून या निवडणुकीत ठाण्याचा बालेकिल्ला राखण्याचे आव्हान शिंदे यांच्यापुढे आहे. त्यांच्याविरोधात ठाकरे गटाने आनंद दिघे यांचे पुतणे केदार दिघे यांना उमेदवार दिली असून याठिकाणी शिंदे विरुद्ध दिघे अशी लढत होणार आहे.

मुख्यमंत्री शिंदे यांनी सोमवारी मिरवणुकी काढून उमेदवारी अर्ज दाखल केला. या मिरवणुकीदरम्यान त्यांनी मोठे शक्तिप्रदर्शन केले. या निवडणुकीत त्यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञानुसार त्यांच्याकडे एकूण ३७ कोटी ६८ लाख ५८ हजार १५० रुपये इतकी संपत्ती आहे. त्यामध्ये जंगम मालमत्ता ९ कोटी २१ लाख ७८ हजार १५० तर, स्थावर मालमत्ता २८ कोटी ४६ लाख ८० हजार इतकी आहे. २०१९ मध्ये म्हणजेच पाच वर्षांपूर्वी त्यांच्याकडे १३ कोटी ६६ लाख ७४ हजार ९३२ इतकी मालमत्ता होती. गेल्या पाच वर्षांत त्यांच्या मालमत्तेत २४ कोटी १ लाख ८३ हजार २१८ रुपयांची वाढ झाली आहे. तसेच ३७ कोटी



६८ लाख रुपयांच्या संपत्तीचे मालक असलेल्या शिंदे यांच्याकडे मात्र बोलेरो आणि आरमाडा ही दोन वाहने आहेत. त्यांनी आरमाडा हे वाहन २००६ मध्ये तर, बोलेरो हे वाहन २०११ मध्ये खरेदी केलेले आहे. तर, पत्नी लता यांच्या नावावर एक टेम्पो, दोन इनोव्हा, एक स्कार्पिओ हे वाहन आहे. शिंदे यांचे शिक्षण एमएपर्यंत झालेले आहे.

**मुख्यमंत्र्यांच्या मिरवणुकीत चोरट्यांचा सुळसुळाट**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करण्यापूर्वी वागळे इस्टेट भागात मिरवणुक काढण्यात आली होती. या मिरवणुकीमध्ये चोरट्यांचा देखील सुळसुळाट असल्याचे स्पष्ट झाले आहे. मिरवणुकीमध्ये सहभागी झालेल्या माजी नगरसेवक तसेच शिंदे गटाच्या काही पदाधिकाऱ्यांचा साडे सहा लाख रुपयांचा ऐवज चोरीला गेला आहे. चोरीला गेलेल्या वस्तूंमध्ये १२ आणि सहा तोळ्यांच्या सोनसाखळी, ५०-५० हजारांच्या रोकडचा देखील सामावेश आहे. याप्रकरणी श्रीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे कोपरी पाचपाखाडी मतदार संघातून निवडणुक लढवित आहेत. सोमवारी त्यांनी या मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करताना महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी मिरवणुकीद्वारे शक्तीप्रदर्शन केले. शिंदे यांच्यासोबत मिरवणुकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील होते. शिवसेना (शिंदे गट), भाजप आणि राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) पदाधिकारी कार्यकर्त्यांची मोठी गर्दी झाली होती. या गर्दीचा गैरफायदा चोरट्यांनी घेतला. या मिरवणुकींमध्ये चोरट्यांचा सुळसुळाट झाला होता. सोमवारी दुपारी १२ ते ३ वाजताच्या या कालावधीत माजी नगरसेवकासह काही पदाधिकाऱ्यांच्या वस्तू चोरीला गेल्या आहेत. चोरीला गेलेल्या वस्तूंमध्ये १२ आणि सहा तोळ्यांच्या सोनसाखळ्या आणि ५०-५० हजार रुपयांच्या रोकडचा सामावेश आहे. यानंतर शिंदे गटाच्या या पदाधिकाऱ्यांनी श्रीनगर पोलीस ठाण्यात धाव घेतली. त्यानंतर याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वसई पूर्वेत विजेच्या लपंडावाने नागरिक हतबल

## दीपावलीच्या कालावधीत वीजपुरवठा सुरळीत करण्याची वालीवकरांची मागणी

वसई, दि. ३० : प्रतिनिधी

दिवाळी सण म्हणजे उत्सावांचा राजा, हिंदू संस्कृतीचा अविष्कार, तेजाचे व प्रकाशाचे प्रतीक म्हणून ओळखला जातो. समाजातील सर्व स्तरातील नागरिक दिवाळी हा सण दिव्यांची व विद्युत रोशणाईची आरास मांडून मनोभावाने पुजतात परंतु सध्या विज पुरवठा दिवसभर सारखा खंडित होत असल्यामुळे वालीवकरांना यंदाची दिवाळी अंधारात साजरी करावी लागणार का?असा प्रश्न सध्या निर्माण झालेला दिसून येत आहे.

दिवाळी काही दिवसावर येऊन ठेपली असतांना अखंडितपणे वीज पुरवठा करणे एम एस सी बी चे कर्तव्य आहे परंतु वारंवार खंडित होणाऱ्या विजेमुळे दुकानदार व व्यवसायिकांसमोर मोठा पेचप्रसंग निर्माण झालेला असून अंधाराचा फायदा घेऊन लूटमार होऊ शकते अशी भीती नागरीक व्यक्त करीत आहेत,विजेच्या खेळ खंडोब्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम झालेला असून छोट्यामोठ्या व्यवसायिकांचे धाबे दणाणले आहे. विजेच्या लोड शेडिंगमुळे कारखान्याचे उत्पादन कमी झालेले असल्यामुळे कामकाज ठप्प झालेले आहे त्यामुळे यंदाची दिवाळीच्या आनंदावर विरजण पडलेले आहे.वसई पूर्वेतील नागरिकांनी व व्यापाऱ्यांनी एम एस ई बी प्रशासनाच्या निष्क्रियतेवर झाडाची व्यक्त केली असून वारंवार तक्रार करूनही एम एस ई बी चे अधिकारी ठोस पावले उचलतांना दिसत नाहीत. याबाबतीत स्थानिक लोक प्रतिनिधिंनी एम एस ई बी च्या प्रशासनावर दबाव आणावा व विजेचा प्रवाह सुरळीत करावा अन्यथा एम एस ई बी च्या विरोधात उग्र आंदोलन करण्याचा इशारा नागरिकांनी दिलेला आहे.

# स्वच्छ, पर्यावरणशील, प्लास्टिकमुक्त दिवाळीसाठी नवी मुंबईकरांना आवाहन आणि महापालिकेकडून उपाययोजना

नवी मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी




नाविन्यपूर्ण उपक्रमांव्दारे स्वच्छतेमध्ये नेहमीच आघाडीवर असणा-या नवी मुंबई शहरातील जागरुक नागरिकांनी भारतातील सर्वात मोठा सण असणारा दिवाळी उत्सव हा 'पर्यावरणशील, फटाकेमुक्त व प्लास्टिकमुक्त' साजरा करण्याविषयी नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने जाहीर आवाहन करण्यात आले असून यादृष्टीने महानगरपालिकाही तशा प्रकारची कार्यवाही करीत आहे.

दिवाळीपूर्वी नागरिक मोठया प्रमाणात आपल्या घराची साफसफाई करत असतात. अशावेळी नागरिकांनी आपल्याला नको असलेल्या, टाकून देणार असलेल्या वस्तू नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने शहरात 92 ठिकाणी उभारलेल्या 'थ्री आर' सेंटरमध्ये आणून ठेवाव्यात, जेणेकरून त्या गरजूंपर्यंत पोहचून त्यांची दिवाळी आनंदात जाईल तसेच उर्वरित कच-याची विल्हेवाट लावणे सोयीचे ठरेल असे आवाहन करण्यात आले आहे.

शहर स्वच्छ ठेवण्यात स्वच्छतामित्र आणि स्वच्छतासखींचे फार मोठे योगदान असून कच-याचे वर्गीकरण करण्यातून तसेच महानगरपालिकेने निश्चित केलेल्या योग्य जागी कचरापेट्यांमध्ये योग्य प्रकारे कचरा टाकण्यातून आपल्या स्वच्छताकर्मींना करावे लागणारे अतिरिक्त काम कमी करून दिलासा द्यावा असे आवाहन आहे. तसेच कोणत्याही प्रकारे उघड्यावर कचरा जाळून वायू प्रदूषण वाढू न देण्याची खबरदारी घ्यावी असेही आवाहन करण्यात आलेले आहे.

दिवाळीपूर्वी शहर स्वच्छतेची विशेष सखोल स्वच्छता मोहीम आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असून शहरातील मुख्य मार्गांवरील दुभाजकांचे कॉर्नर्स व पदपथ येथील गाळ सुकून झालेली माती काळजीपूर्वक साफ करण्यात येत आहे. याकरिता मॅकेनिकल स्विपींग वाहने तसेच वॉटर स्प्रेईंग वाहने यांचा प्रभावी वापर करण्यात येत आहे. यामध्ये अग्निशमन विभागाचेही विशेष सहकार्य मिळत आहे. पावसाळी कालावधीत पावसासोबत वाहून आलेली माती रस्त्यांच्या कडेला गाळ स्वरुपात जमा होते व पाऊस थांबल्यानंतर वाहनांच्या रहदारीमुळे हवेत उडून प्रदुषणात वाढ होते. ही बाब लक्षात घेत ही रस्त्यांच्या कडेला साचलेली माती जमा करण्यात येत असून त्यानंतर या रस्त्यांची जेटींग मशीनव्दारे पाणी मारुन सफाई करण्यात येत आहे. यासाठी वापरण्यात येणारे पाणी मलप्रक्रिया केंद्रातील शुध्दीकरण केलेले प्रक्रियाकृत पाणी असून यामुळे रस्ते सफाईसोबतच पिण्याच्या पाण्याची बचतही केली जात आहे.

या अंतर्गत नेरुळ विभागात राजीव गांधी उड्डाणपूल ते छत्रपती शिवाजी महाराज चौक ते से 3 बस डेपो - जय भवानी सर्कलपर्यंत रस्ते स्वच्छता व रस्ते धुणे अशा दोन्ही प्रकारे विशेष स्वच्छता करण्यात आली. त्याचप्रमाणे अवजड वाहनांची नियमित वर्दळ असणा-या बेलापूरमधील आम्रमार्गावर उरण फाटा ते नमुंमपा मुख्यालय भागाची सखोल रस्ते सफाई करण्यात आली. यासोबतच ठाणे बेलापूर मार्ग, कोपरखैरणे – रबाळे एमआयडीसी मार्ग, महापे शिळफाटा मार्ग, वाशी कोपरखैरणे मार्ग, घणसोली पामबीच मार्ग, पटणी मार्ग अशा मुख्य मार्गांची रस्ते साफसफाई व धुणे अशा दोन्ही प्रकारे सखोल स्वच्छता करण्यात आली आहे. या भागात दररोज सकाळ, संध्याकाळ चालण्यासाठी येणा-या महिला व पुरुषांनी महानगरपालिकेच्या या सखोल स्वच्छता मोहीमेची प्रशंसा केली असून यामुळे धूळीचे प्रमाण कमी झाल्याचे अभिप्राय दिले आहेत.

# आमदार विनोद निकोले यांचा अर्ज दाखल



डहाणू, दि. ३० : प्रतिनिधी

महाविकास आघाडी, कष्टकरी संघटना, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे अधिकृत उमेदवार म्हणून विनोद निकोले यांनी १२८(अ ज) डहाणू विधानसभा मतदारसंघासाठी आपला उमेदवारी अर्ज डहाणू प्रांत कार्यालयात दाखल केला. समर्थक आणि मतदारांच्या उत्साही उपस्थितीत हा नामनिर्देशन अर्ज दाखल करण्यात आला. विनोद निकोले हे आदिवासी समाजाच्या न्याय व हक्कांसाठी दीर्घकाळ संघर्ष करणारे तसेच,समाजातील विविध समस्यांवर आवाज उठविणारे एक प्रभावी नेते आहेत. त्यांच्या या उमेदवारीतून त्यांनी आदिवासी तसेच,बिगर आदिवासी समाजातील प्रमुख समस्यांवर अधिक लक्ष देण्याची भूमिका ठाम केली आहे. रोजगार, शिक्षण, आरोग्य, वीज आणि सिंचनाच्या गरजांसाठी त्यांनी आपली कटिबद्धता पुन्हा एकदा दर्शविली आहे. समाजासाठी न्याय, सर्वांगीण विकास व सशक्तीकरण ही मूल्ये जोपासत त्यांनी मतदारसंघात आपली एक विश्वासार्ह छाप उमटविली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली मतदारसंघात प्रगती आणि विकासाचे नवीन पर्व सुरू होईल, असा विश्वास त्यांचे समर्थक आणि जनतेला वाटत आहे. आदिवासी समाजाला त्यांच्या हक्कांचे संरक्षण मिळवून देणे आणि समाजाच्या सक्षमीकरणासाठी कार्यरत राहण्याचा त्यांनी निर्धार केला आहे. मतदारसंघातील रोजगार, शिक्षण, आरोग्य, वीज आणि सिंचन या मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी कार्य करणे, शेतकऱ्यांच्या विविध समस्यांवर तोडगा काढणे आणि शाश्वत शेतीसाठी आवश्यक उपाययोजना करणे यावर लक्ष केंद्रीत करणे, मतदारसंघात विकासात्मक कार्याची वाढ आणि रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करणे, हा त्यांच्या अजेंडातील एक महत्त्वपूर्ण मुद्दा आहे. विनोद निकोले यांच्या नेतृत्वाखाली मतदारसंघात प्रगतीची वाट सुकर होईल, असा विश्वास जनतेत निर्माण झाला आहे.

निकोले यांच्या नामनिर्देशनावेळी महत्त्वपूर्ण नेत्यांची उपस्थिती लाभली. यामध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे पॉलिट ब्युरो सदस्य डॉ. अशोक ढवळे, अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या राष्ट्रीय सरचिटणीस मरियम ढवळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार गट) माजी नगराध्यक्ष मिहीर शाह, काशीनाथ चौधरी, शैलेश करमोडा, तन्मय बारी, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे संतोष मोरे, शिवसेनेचे (उद्धव ठाकरे गट) अजय ठाकूर, तसेच कष्टकरी संघटनेचे प्रमुख कार्यकर्ते ब्रायन लोबो आदी उपस्थित होते.

# नियम व अटींची पूर्तता करणाऱ्यालाच शस्त्र परवाना मिळणार

## मीरा-भाईंदर वसई विरार आयुक्तालयात यावर्षी शस्त्र परवाना धारकांची संख्या कमी

भाईंदर, दि. ३० : प्रतिनिधी

स्वरक्षणासाठी, शेतीसाठी, स्पोर्ट्स व प्रदर्शनासाठी असे शस्त्र परवाण्याचे प्रकार असून पूर्वी स्वरक्षणासाठी बंदूक परवाना काढला जायायचा परंतु आता फॅशन म्हणून व रुबाब जमविण्यासाठी शस्त्र वापरण्याची स्टाईल निर्माण झालेली आहे. शस्त्र परवाना काढत आहात परंतु तो कशासाठी हवा याचे योग्य कारण दिल्याशिवाय व आवश्यक कागदपत्रे जमा केल्याशिवाय मिळत नसल्यमुळे या वर्षी मागच्या वर्षाच्या तुलनेत कमी प्रमाणात शस्त्र परवाने काढण्यात आलेले आहेत.

महत्वपूर्ण व्यक्ती किंवा ज्याच्या जीवाला धोका आहे अशा व्यक्तींच्या आत्मसरक्षणासाठी खास करून शस्त्र परवाना दिला जातो एकदा शस्त्र परवाना मिळाला म्हणून त्याचा कसाही व कुठेही वापर करता येत नाही नियमांच्या चौकटीत राहूनच शस्त्र वापरावे लागते अन्यथा चुकीचा वापर केल्यास माफी मिळत नाही.परवाना घेणाऱ्या व्यक्तीला शस्त्राची गरज आहे का व कोणत्या कारणासाठी शस्त्र घेत आहे याची सर्व माहिती देणे बंधन कारक आहे.दरवर्षी शस्त्राचे नूतनीकरण करतांना परवाना धारकांची पडताळणी केली जाते.परवाना धारक व्यक्तीने सार्वजनिक ठिकाणी शस्त्र दिसणार नाही याची काळजी घेणे आवश्यक असून गंभीर गुन्हा होणार नाही याचीही काळजी घेणे गरजेचे आहे अन्यथा पोलीस धडक कारवाई करू शकतात. व्यक्ती स्वरक्षणासाठी 100 ते 200 गोळया,शेती रक्षणासाठी 50 ते 100 गोळया व स्पोर्ट्सच्या प्रवर्गानुसार गोळयांची परवानगी देण्यात येते.ज्या कोणाला शस्त्र परवाना काढायचा असेल त्यांनी ओळखीचा व पत्याचा पुरावा,मतदान ओळखपत्र, पासपोर्ट साईझ फोटो,मागच्या तीन वर्षाचे इन्कम टॅक्स रिटर्नची माहिती, दोन चांगल्या ओळखीच्या व्यक्तीकडून चारित्र्य प्रमाणपत्र,फिटनेस, शैक्षणिक प्रमाणपत्रे व जन्म प्रमाणपत्र या सर्व कागद पत्रांची पूर्तता केली तरच नियमांच्या अधीन राहून शस्त्र परवाना दिला जातो.

# वसईत साकारणार "भारताची वैभवशाली गौरव गाथा"

वसई, दि. ३० : प्रतिनिधी

वसई तालुका कला क्रिडा विकास मंडळाची यंदाच्या ३५ व्या कला क्रिडा महोत्सवाच्या आयोजनाच्या तयारीची सभा क्रिडामंडळ, वसई येथे संपन्न झाली. २५ व्या कला क्रिडा महोत्सवाच्या निमित्त "माही वसई" तर ३० व्या वर्षी नालासोपारा येथे कोकण पर्व कोकण सर्व साकारण्यात आले होते. तर हे कला क्रीडा महोत्सवाचे ३५ वे वर्ष असल्याने यावर्षी भारताची वैभवशाली गौरव गाथा" अर्थात "Glory of India"हि कला क्रीडा महोत्सवाचे जेष्ठ पदाधिकारी मुकेश सावे यांच्या संकल्पनेतील कलाकृती सादर करण्यात येणार आहे.

वसई कला क्रिडाचे महोत्सवाचे ज्येष्ठ पदाधिकारी मुकेश सावे यांच्या संकल्पनेतून माही वसईद्वारे वसईची संस्कृती व परंपरा, कोकण पर्व कोकण सर्व याद्वारे कोकण प्रांताची जीवनपद्धती, संस्कृती आणि परंपरा दर्शविल्यानंतर यंदा ३५ व्या कला क्रिडा महोत्सवात विवा महाविद्यालयाच्या सहकार्याने "आपल्या भारताची वैभवशाली गौरव गाथा" अर्थात "Glory of India" याद्वारे भारताच्या सांस्कृतिक वैभवाची, प्रगतीची आणि लष्करी सामर्थ्याची झलक दाखवणारी, आपल्या मनात राष्ट्रीयत्वाची भावना दृढ करणारी भव्य कलाकृती साकारण्यात येणार असल्याची माहिती सरचिटणीस प्रकाश वनमाळी यांनी दिली.

तसेच ३५ व्या वर्षानिमित्त स्मरणिका संपादित करण्यात येणार असुन त्यामध्ये कला क्रिडा महोत्सवा संदर्भातील उपयुक्त माहिती व लेख पदाधिकारी, स्पर्धा प्रमुख, कार्यकर्ते, कला क्रीडा महोत्सवास भेट देणारे पाहूणे, परिक्षक मंडळी व वसईकर कला क्रिडा रसिक यांनी द्यावेत असे आवाहन करण्यात आले.

# हुंड्यासाठी विवाहितेचा छळ करणाऱ्या सासरच्यांवर गुन्हा दाखल

भिवंडी, दि. ३० : प्रतिनिधी

लग्नात माहेरच्यांनी कमी हुंडा दिल्याच्या कारणावरून सासरच्यांनी आपसात संगनमत करून भिवंडीतील विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याची संतापजनक घटना अहमदनगर येथून समोर आली आहे.याप्रकरणी पतीसह सासरच्या ६ जणांवर नारपोली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पती गणेश घाडगे (३२),सासू शोभा भास्कर घाडगे (७०),सासरे भास्कर घाडगे (७५),मोठी नणंद राणी वाढणे (३०),लहान नणंद मोनिका मायाडे (२८),महादेव थोरवे (५५) अशी गुन्हा दाखल झालेल्या सासरच्यांची नावे आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,अश्विनी गणेश घाडगे (२५) तालुक्यातील काल्हेर येथील एका कॉम्प्लेक्स मध्ये राहत आहेत.दरम्यान त्यांचा एप्रिल २०२२ मध्ये गणेश यांच्याशी विवाह झाला असून त्या सासरच्यांसोबत एप्रिल २०२२ ते २३ ऑक्टोबर २०२३ रोजी पर्यंत अहमनगर येथील लक्ष्मी कॉलनीत राहत असतानाच पीडित विवाहितेला माहेरच्यांनी लग्नात हुंडा म्हणून भेटवस्तू व सोन्याचे दागिने कमी दिल्याच्या कारणावरून सासरच्या मंडळीने शिवीगाळसह हाताच्या चापटीने मारहाण करून विवाहितेचा मानसिक व शारीरिक छळ केला आहे.याप्रकरणी पिडीत विवाहितेच्या फिर्यादीवरून वरील ६ जणांवर नारपोली पोलिस ठाण्यात भान्यासं कलम ४९८ (अ), ३२३, ५०६, ३४ न्वये गुन्हा दाखल केला आहे.पुढील तपास पोउनि शिंदे सरनाईक करीत आहेत.

# भिवंडीत 21 लाखांच्या गुटख्यासह वाहन जप्त चालकास अटक

भिवंडी, दि. ३० : प्रतिनिधी

महाराष्ट्रात बंदी असलेल्या गुटख्याच्या तस्करीवर शांतीनगर पोलिसांनी कारवाईत २१ लाखांच्या गुटख्यासह एक टेम्पो जप्त करून चालकास अटक केली आहे.मोहसीन कल्हण खान (३५) असे अटक केलेल्या टेम्पो चालकाचे नाव आहे.तो गुजरातच्या वापी येथून अवैध गुटखा घेऊन भिवंडीत विक्रीसाठी आला होता.विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात आदर्श आचार संहिता लागू आहे,त्यामुळे पोलिसांनी प्रत्येक नाक्यावर आणि चौकात करडी नजर ठेवली आहे.याच चौकशी दरम्यान पोलिसांनी भादवड नाक्यावर संशयास्पद टेम्पो अडवून तपासणी केली असता त्यात मोठ्या प्रमाणात बंदी असलेला विमल पान मसाला आणि तंबाखू आढळले.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, छापेमारीच्या वेळी टेम्पोमधील अन्य एक व्यक्ती रामू घटनास्थळावरून पळून गेला असून, त्याचा शोध सुरू आहे.अटक केलेला चालक मोहसीन खान हा उत्तर प्रदेशातील फर्रुखाबाद जिल्ह्यातील नंदला दौद गावचा रहिवासी असून वापीमध्ये राहून टेम्पो चालवण्याचे काम करतो. आरोपीविरुद्ध शांतीनगर पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून त्याला न्यायालयात हजर केले असता त्यास सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# गृहविज्ञान विभागामध्ये राष्ट्रीय पोषण माहनिमित्त विविध कार्यक्रम संपन्न

■ **महासागर प्रतिनिधी,**
**अमरावती, दि. ३०:** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील गृहविज्ञान विभागाच्यावतीने राष्ट्रीय पोषण माहनिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विभाग प्रमुख डॉ. वैशाली धनविजय यांच्या हस्ते सप्ताहाचे उद्घाटन झाले. यावेळी डॉ. संयोगिता देशमुख, विभागातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. विविध पोस्टर, पपेट, तोरण, फ्लिप चार्टच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. अध्यक्षीय भाषणातून डॉ. वैशाली धनविजय यांनी राष्ट्रीय पोषण माह चे महत्व तसेच आरोग्यदायी आहाराचे महत्व पटवून दिले. गृहविज्ञान विभाग व एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प ग्रामीण, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमानाने परसोडा येथे पोषणावर बोलू काही हा जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला. यावेळी सरपंच मंदाताई घुले, उपसरपंच योगिता घुले, किशोर घोडके, विलास दुर्गे, नवनाथ



घनतोंडे उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी यावेळी ॲनिमिया या विषयावर पथनाट्यातून जनजागृती केली. तर अन्न व पोषण अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी जंक फुड, हेल्दी फुड या विषयावर पपेट शो सादर केला. जागतिक ह्रदय दिनानिमित्त गृहविज्ञान विभाग व झेनिथ हॉस्पिटल यांच्या सहयोगाने सांस्कृतिक भवन येथे आहार प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. प्रदर्शनीच्या माध्यमातून महत्वाच्या बाबींवर जनजागृती करण्यात आली. विद्यापीठ परिसरात कॅम्पस वॉकच्याव्दारे परिसरातील रानभाज्या कशा ओळखाव्या यावर डॉ.वैशाली धनविजय यांनी मार्गदर्शन केले. ॲनिमियावर झालेल्या चर्चासत्रात ॲनिमिया म्हणजे काय, ॲनिमिया होण्याची कारणे, लक्षणे, प्रकार, उपचार याविषयी विद्यार्थ्यांनी माहिती दिली.

पोषण माहच्या समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. वैशाली धनविजय होत्या. यावेळी विभागाद्वारे आयोजित विविध कार्यक्रमांचा चित्रफितीद्वारे आढावा घेण्यात आला. यावेळी डॉ. वैशाली धनविजय यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता सुमित गेडाम, सुमेध वडुरकर, शिल्पा इंगोले, आयतल कामदार, दिव्यानी नवले, दिपाली भैसे, सुम्बुल डेलानी, मयुरी कुरळकर यांनी परिश्रम घेतले.

# साखरकर यांनी विद्यापीठाला प्रदिर्घ सेवा दिली -कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

## सेवानिवृत्त कर्मचारी सुरेश साखरकर यांचा सेवानिवृत्तीप्रसंगी उभयता सत्कार

■ **महासागर प्रतिनिधी,**
**अमरावती, दि. ३०:** सेवानिवृत्त कर्मचारी श्री साखरकर यांनी विद्यापीठाला प्रदीर्घ सेवा दिली आहे. दैनिक वेतनिक म्हणून त्यांनी विद्यापीठात सुरुवात केली. महाविद्यालयीन विभागात प्रदीर्घ कार्य करुन आता आचार्य कक्षात ते आहेत. महाविद्यालय, शिक्षक, विद्यार्थी यांचे कल्याणाकरीता त्यांनी विद्यापीठाला दिलेली सेवा निश्चितच वाखाणण्याजोगी आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील श्री सुरेश साखरकर यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कर्तव्यपूर्ती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. व्यासपीठावर प्र-कुलगुरूडॉ. महेंद्र ढोरे, प्रमुख अतिथी म्हणून व्य. प. सदस्य डॉ. आर. डी. सिकची, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नियंत्रण अधिकारी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास



नांदुरकर, सत्कारमूर्ती श्री सुरेश साखरकर, सौ. साखरकर उपस्थित होते.

कुलगुरू पुढे म्हणाले, विद्यापीठात संख्येने कर्मचारी कमी असून, भविष्यात कंत्राटी पध्दतीने भरतीसाठी समिती स्थापन करण्यात आली असून लवकरच कार्यपूर्ती होईल, असे सांगून त्यांनी श्री सुरेश साखरकर यांना उज्वल भविष्याच्या शुभेच्छा दिल्यात. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी श्री सुरेश साखरकर यांचा शॉल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरवप्रमाणपत्र देऊन तसेच सौ. साखरकर यांचा सौ. मोनाली तोटे पाटील यांनी साडीचोळी, कुंकवाचा करंडा देऊन सत्कार केला. प्रमुख अतिथी डॉ. आर. डी. सिकची म्हणाले, मी जेव्हा शिक्षक म्हणून रुजू झालो, तेव्हापासून साखरकर यांना ओळखतो. कार्यतत्परता, नियमाची जाण हे त्यांच्या कार्याची वैशिष्टऐ आहेत. सेवानिवृत्त होणा-या कर्माचा-यांना शेवटच्या दिवशी नियमानुसार देय असलेले सर्व लाभ मिळालेच पाहिजे, यावर माझा सदैव भर राहिला आहे, असे सांगून त्यांनी सत्कारमूर्ती श्री सुरेश साखरकर यांना पुढील भविष्याच्या शुभेच्छा दिल्यात.

याप्रसंगी सत्कारमूर्ती श्री सुरेश साखरकर यांनी आपल्या सेवाकाळातील अनुभव सांगतांना सहकारी कर्मचा-यांकडू मिळालेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. नियंत्रण अधिकारी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, श्री अजय देशमुख यांनीही मनोगतातून श्री सुरेश साखरकर यांना उज्वल भविष्याच्या शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्यावतीने अध्यक्ष श्री मंगेश वरखेडे व डॉ. साक्षी ठाकुर यांनी सत्कारमूर्ती श्री सुरेश साखरकर यांना भागभांडवलाचा धनादेश देऊन सत्कार केला.

राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी, तर आभार अधीक्षक श्री धनंजय पाटील यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक तसेच सत्कारमूर्तींच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

# अकोला पश्चिम मतदारसंघात मनसेला धक्का



### प्रशंसा मनोज अंबेरे यांचा अर्ज बाद

■ **महासागर प्रतिनिधी,**
**अकोला, दि. ३० :** अकोला पश्चिम मतदारसंघात मनसेला धक्का बसला आहे. उमेदवारांच्या अर्ज छाननीमध्ये प्रशंसा मनोज अंबेरे यांचा अर्ज हा वय कमी असल्याने बाद ठरवण्यात आला आहे. यामुळे निवडणुकी आधीच मनसेला अकोल्यात धक्का बसला आहे. वयाचे २५ वर्ष पूर्ण होण्यासाठी २४ दिवस कमी पडल्याने अर्ज बाद झाला आहे.

### मनसेचे राज्यात १३३ उमेदवार रिंगणात

महाराष्ट्र नव निर्माण सेना विधानसभेची निवडणूक स्वबळावर लढणार असल्याची घोषणा राज ठाकरे यांनी केली होती.मनसेच राज्यात १३५ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. यातील अकोला पश्चिममध्ये उमेदवार प्रशंसा मनोज अंबेरे यांचा अर्ज बाद झाला आहे. तर परळीतील उमेदवारांने निवडणूक न लढविण्याचा निर्णय घेतल्याने आता मनसेचे १३३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

### मतदारसंघात भाजपमध्ये नाराजी नाट्य

अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघात भाजपमध्ये नाराजी नाट्य सुरू आहे. २००९ पासून या मतदार संघात भाजपचे गोवर्धन शर्मा निवडून आले. २०२३ मध्ये त्यांच्या निधन झाले.

त्यामुळे आता भाजपने विजय अग्रवाल यांना संधी दिली आहे. तर भाजपचे हरीश अलीचंदानी यांनी अपक्ष उमेदवार अर्ज दाखल केला आहे.. त्यातच माजी नगराध्यक्ष हरीश आलिचंदानी

अकोल्यातून भाजपचे माजी महापौर विजय अग्रवाल यांना तिकीट दिल्याने नाराज होते. आलिमचंदाणी २८ वर्षांपासून पालिकेच्या राजकारणात आहे.

महापालिका होण्याआधी दोनदा अकोल्याचं नगराध्यक्षपद भूषवलं. आलिमचंदाणी यांच्या आधी पक्षाचे ८ वर्षे शहराध्यक्ष असलेले आणि आता प्रदेश कार्यकारणी सदस्य असलेले डॉ.अशोक ओळंबे यांनी परवा पक्षाचा राजीनामा दिला होता. ओळंबे 'प्रहार'कडून भरणारा उमेदवारी अर्ज भरला.

# यंदा पशू गणना मोबाइलच्या सहाय्याने

### गोठ्यातील गायी, खुराड्यातील कोंबड्या, घोडे मोजणार

■ **महासागर प्रतिनिधी,**
**अकोला, दि. ३० :** अकोला केंद्र शासनाच्या निर्देशानुसार २१ व्या पशू गणनेच्या कामास जिल्ह्यात २५ ऑक्टोबरपासून सुरुवात झाली आहे. ज्याप्रमाणे नागरिकांचे जनगणना असते, त्याचप्रमाणे पशूची देखील होत असते. या वर्षीची गणना ही स्मार्टफोनवर केली जाणार आहे. त्यामुळे गोठ्यातल्या गायी, खुराड्यातील कोंबड्या आणि तबेल्यातील घोडे यांची माहिति स्मार्टफोनवर केली जाणार आहे. या वर्षीच्या पशुगणनेत पशुधन मोबाइलद्वारे गणले जाईल. यावर्षी मोबाइलवर माहिती भरावी लागणार आहे. प्रगणकांना मोबाईल वापरायचा वेगळाच मोबदला दिला जाणार आहे. या वर्षीची पशुगणना करण्यासाठी ३ हजार घरामागे एक प्रगणक नेमण्यात आले आहेत. शासकीय कर्मचारी, अधिकाऱ्यांना या सर्वेक्षणात प्राधान्य दिले गेले



आहेत. तसेच या वर्षीच्या पशू गणनासाठी प्रशिक्षण घेत असलेले विद्यार्थी, पदवीधारक विद्यार्थी प्रगणक म्हणून या कार्यक्रमात सहभागी होत आहे. या पशू गणना मोहिमेत गाय वर्ग म्हैस वर्ग, शेळी, मेंढी, कुक्कुट, वराह ,पाळीव कुत्री, भटकी जनावरे, पशुपालन यासाठी वापरले जाणारे यंत्र सामग्री याची पशू गणना केली जाते . गणना केल्या नंतर या आधारावरच सरकारकडून विविध योजना राबवल्या जातात. दर पाच वर्षाला ही पशू गणना केली जात आहे. पशुपालनाच्या क्षेत्रात विविध योजनांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने महत्वाची ठरत आलेली आहे. संपूर्ण खरी माहिती द्या आणि सहकार्य करा ज्यावेळेस पशू गणनेची माहिती घेण्यासाठी प्रगणक घरी येतात. ते आल्यानंतर त्यांना नागरिकांनी संपूर्ण माहिती खरी माहिती द्यावी. जेणेकरून त्या माहितीच्या आधारे पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात किती पशुधन आहेत. त्यानुसार लसीकरण औषधाचा पुरवठा केला जातो. त्यामुळे नागरिकांनी चुकीची माहिती देऊ नये. पशुगणनेसाठी सहकार्य करावे, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाकडून करण्यात आले आहे.

# म. रा. नेत्र तज्ञ संघटनेची कार्यकारिणी जाहीर

■ **महासागर प्रतिनिधी,**
**अकोला, दि. ३० :** अकोला महाराष्ट्र राज्य नेत्र संघटनेच्या अध्यक्षपदी अकोल्याचे नेत्र तज्ञ डॉ. शिरीष थोरात यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. सोलापूर येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य नेत्र तज्ञ संघटनेच्या वार्षिक संमेलनात डॉ. थोरात यांना अध्यक्षपद बहाल करण्यात आले. ऑल इंडिया नेत्रतज्ज्ञ असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. पार्थो विश्वास यांनी अध्यक्षपदाची सूत्रे डॉ. थोरात यांच्याकडे सोपवली. संघटनेच्या राज्यस्तरीय कार्यकारिणीत उपाध्यक्ष पदावर मुंबईचे डॉ. आनंद हेरूर व डॉ. अतुल कढाणे यांची निवड करण्यात आली. डॉ. विरल शहा यांची सचिव पदावर तर डॉ. शोन चिंचोले यांची कोषाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. डॉ. पीयूष बन्सल यांची सायंटिफिक कमिटीचे चेअरमन म्हणून नियुक्ती करण्यात आली. नागपूर येथील डॉ. राजेश जोशी, मुंबईचे डॉ. प्रीती कामदार, छत्रपती संभाजी नगर येथील डॉ. अजय लोहिया यांचाही नूतन कार्यकारिणीत समावेश करण्यात आला आहे. संघटनेच्या सल्लागार



अध्यक्षपदी डॉ. शिरीष थोरात

मंडळात डॉ. तात्याराव लहाने, डॉ. ए. ए. देशपांडे, डॉ. कुरेश मस्कत्ती (मुंबई), डॉ. अनिल कुळकर्णी (मिरज), डॉ. सुनयना मलिक, डॉ. संतोष भिडे ( पुणे) यांचा समावेश करण्यात आला आहे. आठ हजार नेत्रतज्ज्ञ : संपूर्ण महाराष्ट्रात सुमारे आठ हजार नेत्र रोग तज्ञ असून त्यापैकी सुमारे चार हजार नेत्रतज्ज्ञ या संघटनेचे सदस्य आहेत. संघटनेचे कार्य सोयीचे व्हावे, यासाठी राज्यात पाच विभाग तयार करण्यात आले आहेत. त्यात विदर्भ विभागासाठी डॉ. मुंदडा, डॉ. डांगरा, डॉ. भुईवार, डॉ. प्रफुल्ल डाके, डॉ. पंकज शहा यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

### निरोगी जीवन जगण्याची कला म्हणजे योग -डॉ. श्रीकांत पाटील

**अमरावती :** योग मुळात मानवी जीवनासाठी एक आध्यात्मिक शिस्त आहे, जी अत्यंत सूक्ष्म विज्ञानावर आधारीत आहे. आध्यात्मिक शिस्त मानवी मन आणि शरीर यांच्यातील सुसंवाद साधण्यावर लक्ष केंद्रित करते. शरीरिक आणि मानसिक व्याधींवर योगासने व प्राणयाम म्हणजे हुकमी उपचार ठरतात. औषधीविना शरीर आणि मन सुदृढ ठेवण्याचे काम योगा आणि प्राणायाम करतो, त्यामुळे निरोगी जीवन जगण्याची एक उपयुक्त कला म्हणजे योग असून ती सर्वांनी आत्मसात करावी, असे प्रतिपादन डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ५६ व्या पुण्यतिथी निमित्त गुरूकुंज मोझरी येथे आयोजित योगाभ्यास व प्राणायाम वर्गातील कार्यक्रमात बोलत होते. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या प्रेरणेने व आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीक्षेत्र गुरूदेव आश्रम गुरूकुंज मोझरी येथे १६ ते २२ ऑक्टोबरदरम्यान सर्वांसाठी दररोज सकाळी २ तास योगाभ्यास, योग प्रात्याक्षिक, आहार या विषयावर आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने मार्गदर्शन करण्यात आले.

# अंडरपास, सर्विस रोडचे काम सुरू करा



## मृतांच्या नातेवाइकांना तात्काळ आर्थिक मदतीची मागणी

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नांदुरा, दि. ३०:** शेतमजूर महिलांना घेऊन जाण्यासाठी आलेल्या उभ्या ट्रॅक्टरला पाठीमागून भरधाव येणाऱ्या ट्रकने जबर धडक दिली. या अपघातात दोन महिला शेतमजूर जागीच ठार झाल्या असून १३ महिला जखमी झाल्याची घटना आज २४ ऑक्टोबर रोजी सकाळी पावणे सहा वाजेच्या सुमारास राष्ट्रीय महामार्गावरील वडी येथे घडली. या घटनेमुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलन केले. या आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक चार तास ठप्प पडली होती.

सध्या सोयाबीन काढणी, मका सोंगणी तसेच कापूस वेचणीचा हंगाम सुरू आहे. शेतमजूर मोठ्या सकाळीच आपल्या कामावर जातात. नायगाव येथे कामावर जाण्यासाठी वडी येथील महिला शेतमजुरांना घेऊन जाण्यासाठी नायगाव येथील एम एच२८ ए७०७१ या क्रमांकाचा ट्रॅक्टर सकाळीच वडी येथे आला होता.

शिदोरी सोबत घेऊन वडी येथील महिला शेतमजूर ट्रॉलीमध्ये चढत असताना नांदुऱ्या कडून मलकापूर कडे जाणाऱ्या एका अज्ञात ट्रकने शेतमजुरांच्या ट्रॅक्टर ट्रॉलीस पाठीमागून जबर धडक दिली. ही धडक एवढी जबरदस्त होती की, या अपघातात सरिता दत्तात्रय भोकरे व शारदा विजय तायडे या दोन महिला जागीच ठार झाल्या. अपघाताची माहिती मिळताच ग्रामस्थांनी अपघाताच्या ठिकाणी धाव घेत महामार्गावर रास्ता रोको केला. मृतांच्या नातेवाइकांना तात्काळ भरीव आर्थिक मदत देण्यात यावी. तसेच अपघातातील जखमींचा संपूर्ण उपचाराचा खर्च महामार्ग प्राधिकरणाने करावा, वडी येथे महामार्गावर अंडरपास करून सर्विस रोडची व्यवस्था करावी, अशा मागण्या ग्रामस्थांनी केल्या.

जोपर्यंत मागण्या पूर्ण होत नाही, तोपर्यंत महामार्गावरील वाहतूक सुरू होऊ होणार नाही, अशी भूमिका ग्रामस्थांनी घेतली होती.

# इफेड्रीन ड्रग्ज प्रकरणाचे दुबई कनेक्शन

## दुबईचा शेरा', मो. शफीला केले आरोपी

■ **महासागर प्रतिनिधी,**
**अकोला, दि. ३० :** बार्शीटाकळी येथील इफेड्रीन ड्रग्ज कारखान्यावर पोलिसांनी २३ ऑक्टोबर रोजी छापा टाकला होता. त्यातून पाच किलो ५४८ ग्रॅम इफेड्रीन ड्रग्जचा साठा जप्त करून चार आरोपींना अटक केली होती. आता स्थानिक गुन्हे शाखेच्या तपासात त्याचे दुबई कनेक्शन असल्याचे समोर आले आहे. पोलिस त्या दिशेने तपास करत असून दुबई येथील शेरा नामक इसमाला आता आरोपी केले आहे.



मोहम्मद शफी याच्या बंद जिनिंग फॅक्टरीत ड्रग्जचा कारखाना सुरू होता. पोलिसांनी येथून मुख्य आरोपी अदील मोहम्मद शमीम अन्सार (३६) व त्याचा साथीदार पवन मानिक मुदनर, (३०) रा. मुंबई यांच्यासह अकोल्यातील निसार नियाजी मुख्तार नियाजी व मोहम्मद इरफान मो. युसूफ, फिरोज खान शब्बीर खान यांना रंगेहात अटक केली होती. कारवाई दरम्यान यातील आरोपीला दुबई येथील शेरा नामक इसमाने फोन केला होता. तसेच त्याने काही संदेशही पाठवले होते. ते मॅसेज पोलिसांना कोट्यवधी रुपये देऊन मॅनेज करण्यासंदर्भात होते. ही बाब पोलिसांच्या तपासात समोर आल्याची माहिती आहे. पोलिसांनी आरोपींची सखोल चौकशी केली असता व त्यांचे मोबाइल तपासले असता त्यात काही धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. या प्रकरणाचा सूत्रधार हा दुबईत असून तो ड्रग्जचा काळाबाजार करायचा हे देखील तपासात समोर येत आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपींचा बार्शीटाकळी येथील मोहम्मद शफी याच्याशी कसा संपर्क झाला याचाही तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस करत आहेत. पोलिसांनी आता या प्रकरणी मोहम्मद शफी व दुबई येथील शेरा यालाही या प्रकरणात आरोपी केले आहे.

# पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ लॉन टेनिस (पुरुष) स्पर्धेकरीता विद्यापीठाची चमू घोषित

■ **महासागर प्रतिनिधी,**
**अमरावती, दि. ३०:** आय.टी.एम. विद्यापीठ, ग्वालियर येथे ०७ ते ११ नोव्हेंबर, २०२४ दरम्यान होणा-यापश्चिम विभाग आंतर विद्यापीठ लॉन टेनिस (पुरुष) स्पर्धेकरीता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संघाची चमू घोषित करण्यात आली आहे.

चमूमध्ये जी.एस. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगांवचा हितेश दसमलानी, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा प्रॉमित बोरडोलोई, साहिल फरहाज व अनुज सिंगरोल, बी.आर. कला एन.ही. वाणिज्य व बी.पी. महाविद्यालय, दिग्रसचा विवेक मस्के, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावतीचा तन्मय खरतडे आणि डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावतीचा यश अलोणे यांचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व खेळाडूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-





कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे.

चमूचा प्रशिक्षण वर्ग ॲडव्हॉन्स टेनिस ॲकेडमिक, बापू कॉलनी, दिपनगर नं. १, किड्स केअर स्कुल जवळ, अमरावती येथे दि. ०४ ते ०५ नोव्हेंबर दरम्यान होणार आहे. प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.

# सराफा बाजारात १५ कोटी रुपयांची उलाढाल

■ **महासागर प्रतिनिधी,**
**अकोला, दि. ३० :** सर्वत्र दिवाळीचा उत्साह आहे. धनत्रयोदशीला सोने खरेदी शुभ मानली जाते. यामुळे मंगळवारी सराफ बाजारात सोने-चांदीखरेदीसाठी ग्राहकांनी हजेरी लावली. दरम्यान सोन्याच्या किमतीत वाढ आणि महिन्याच्या शेवटचे दिवस असल्याने ग्राहकांनी शुभ मुहूर्तावर लहान खरेदीला प्राधान्य दिले. यामुळे मागल्या वर्षीच्या तुलनेत यंदा बाजारात संमिश्र खरेदी झाली. जिल्ह्यात धनत्रयोदशीच्या एका दिवसात जवळपास १२ ते१५ कोटीची उलाढाल नोंदवण्यात आली आहे. मंगळवारी सकाळपासून सराफ बाजारात ग्राहकांची गर्दी दिसून आली. तरी मागील वर्षीच्या तुलनेत यंदा सराफा मार्केटमध्ये अल्प मंदी असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. मागील वर्षी १० ग्रॅम सोन्याचे भाव ६० हजार होते, यंदा ते ८० हजारापर्यंत पोहचले. तरी सोने खरेदीसाठी नाममात्र का असेना खरेदीकडे कल होता. जिल्ह्यात शेतकरी वर्गाकडून या दिवशी सोने खरेदी केली जाते. मात्र, यंदा सोयाबीनचे कमी भाव आहे, तसेच अजून बऱ्याच शेतकऱ्यांचा माल विकल्या गेलेला नाही. यामुळेही सोने खरेदीला कमी प्रतिसाद असल्याचे सांगण्यात येते. ग्राहकांचा सोनं खरेदीचा कल बघता दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सराफ व्यावसायिकांकडून ग्राहकांसाठी वेगवेगळ्या आकर्षक डिझाइनमध्ये सोन्याचे दागिने उपलब्ध करून दिले. यंदा ग्राहकांचा कल फॅन्सी दागिने खरेदीकडे आढळून आला. चांदीची लक्ष्मी, चांदीचा लक्ष्मीची शिक्के सुद्धा उपलब्ध करून देण्यात आले, हे खरेदी करण्याकडे ग्राहकांची पसंती दिसून येत आहे.
**- शैलेश खरोटे, अध्यक्ष, सराफा असोसिएशन.**

वाहन खरेदीला प्रतिसाद शहरातील विविध शोरूममध्ये वाहन खरेदीसाठी ग्राहकांची रीघ लागली असून दिवाळीच्या मुहूर्तावर वाहन खरेदी जोरात सुरू आहे. पेट्रोल गाड्यांच्या किंमती, दररोज लागणारा खर्च, पर्यावरण संरक्षण विचारातून काही दिवसांमध्ये इलेक्ट्रिक गाड्या खरेदीकडे लोकांचा कल वाढल्याचे दिसते. दिवाळीच्या मुहूर्तावर गाड्यांची मोठी खरेदी-विक्री झाली. दिवसाला प्रत्येक शोरूम कडून ५० पर्यंत गाड्यांची विक्री होते आहे.

# लोकशाही जीवंत हिच राष्ट्रीय एकात्मता!



**प्रविण बागडे**
**नागपूर. 9923620919**
pravinbagde@gmail.com

देशात दरवर्षी ३१ ऑक्टोबर रोजी 'राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा केला जातो. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या वारशाचा सन्मान करण्यासाठी भारत सरकारने २०१४ मध्ये अधिकृतपणे 'राष्ट्रीय एकात्मता दिवसा'ची घोषणा केली. भारताच्या राजकीय एकात्मतेत महत्त्वाची भूमिका बजावलेल्या भारताचे माजी उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस साजरा केला जातो.

------------------------

सरदार वल्लभभाई पटेल यांचा भारतातील विविध समुदायांच्या एकतेवर दृढ विश्वास होता. स्वातंत्र्यानंतर संस्थानांना भारतीय संघराज्यात समाकलित करण्याचे आव्हानात्मक कार्य त्यांनी पेलले. या राज्यांना सामील होण्यासाठी त्यांच्या मुत्सद्दी कौशल्ये आणि मुत्सद्देगिरीने महत्त्वाची भूमिका बजावली, ज्यामुळे देशाची प्रादेशिक अखंडता सुनिश्चित झाली. अखेर पटेल यांच्या अथक प्रयत्नांनी अखंड आणि सामंजस्यपूर्ण भारताचा पाया घातला. ५५० हून अधिक संस्थानांचे देशात विलीनीकरण करण्याच्या त्यांच्या अतुलनीय कामगिरीचा गौरव करण्यासाठी हा दिवस 'राष्ट्रीय एकता दिवस' किंवा 'राष्ट्रीय एकात्मता दिवस' म्हणून साजरा केला जातो.

भारतासारख्या वैविध्यतेने परिपूर्ण अशा देशात तेथील लोकांमधील एकता अत्यंत महत्त्वाची आहे. ज्यावेळी अनेक संस्थानांचे तुकडे झाले होते, त्यावेळी सरदार वल्लभभाई पटेल यांनी अखंड भारताच्या संकल्पनेचे समर्थन केले. त्यामुळे हा दिवस वल्लभभाई पटेल आणि इतर कार्यकर्त्यांनी देशाला जोडण्यासाठी केलेल्या संघर्ष आणि बलिदानाच्या स्मरणार्थ साजरा केला जातो.

विविधतेत एकताच्या भावनेला प्रोत्साहन देऊन राष्ट्रीय अखंडता राखण्याला महत्त्व देणारा हा दिवस आहे. अखंड आणि सशक्त भारताचे कट्टर समर्थक असणाऱ्या सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्याच्या सन्मानार्थ हा दिवस त्यांचा वाढदिवसाचे अवचित्य साधून 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून भारत सरकारने जाहीर केला.



भारताच्या गृह मंत्रालयाने राष्ट्रीय एकता दिवसासाठी दिलेल्या अधिकृत निवेदनात असे नमूद केले आहे की राष्ट्रीय एकता दिवस ₹एकता, अखंडतेसाठी आणि संभाव्य धोक्यांना तोंड देण्यासाठी आपल्या देशाच्या अंतर्निहित शक्ती आणि लवचिकतेची पुन्हा पुष्टी करण्याची संधी देईल. आपल्या देशाची सुरक्षा. त्या दिवशी, सरकारी कार्यालयांमध्ये एक प्रतिज्ञा वाचली जाते. मी शपथ घेतो की, मी देशाची एकता, अखंडता आणि सुरक्षितता जपण्यासाठी स्वतःला समर्पित करीन आणि माज्या देशबांधवांमध्ये हा संदेश पोहोचवण्याचा प्रयत्न करेन. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दूरदृष्टी आणि कृतीमुळे शक्य झालेल्या माझ्या देशाच्या एकीकरणाच्या भावनेने मी ही शपथ घेत आहे. मी माझ्या देशाची अंतर्गत सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी माझे स्वतःचे योगदान देण्याचा संकल्प करतो.

इंदिरा गांधी यांच्या हत्येचा दिवस म्हणून ३१ ऑक्टोबर हा दिवस राष्ट्रीय संकल्प दिवस किंवा राष्ट्रीय प्रतिज्ञा दिन म्हणूनही साजरा केला जातो. अनेक शाळा आणि महाविद्यालये, विशेषतः काँग्रेस संचालित राज्यांमध्ये, इंदिरा गांधींच्या स्मरणार्थ रॅली आणि कार्यक्रम आयोजित करतात. २०१८ मध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त्य नरेंद्र मोदी यांनी गुजरातमधील नर्मदा नदीजवळ स्थित भव्य स्टॅच्यू ऑफ युनिटीचे उद्घाटन केले. एक भारत, श्रेष्ठ भारत ही पटेल यांची प्रसिद्ध घोषणा आजही राष्ट्राला प्रेरणा देते.

आयर्न मॅन ऑफ इंडिया म्हणून ओळखले जाणारे जगप्रसिद्ध नाव म्हणजे सरदार वल्लभभाई पटेल. अनेक भारतीय संस्थानांचे देशात विलीनीकरण करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. ज्यामध्ये हैदराबादसह इतर संस्थानांचाही समावेश आहे. सरदार वल्लभभाई पटेल हे केवळ स्वातंत्र्यसैनिकच नव्हते तर दूरदृष्टी असलेले नेतेही होते.

३१ ऑक्टोबर १८७५ रोजी गुजरातमध्ये जन्मलेले पटेल हे एक समर्पित वकील होते. ते सदैव न्याय, समता आणि एकता यांच्या बाजूने उभे राहिले. भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीतही त्यांचे योगदान होते. कारण त्यांनी संविधान सभेचे प्रमुख सदस्य म्हणून काम केले आणि संविधानाचा मसुदा तयार करण्यासाठी जबाबदार असलेल्या समितीचे अध्यक्षपदही भूषवले होते. सर्वांना आज त्यांच्या जयंतीनिमित्त 'राष्ट्रीय एकता दिना च्या हार्दिक शुभेच्छा.

●●●●●●●●●

# वुमन ऑफ द मिलेनियम



इंदिरा गांधी १९६६ मध्ये भारताच्या तिसऱ्या पंतप्रधान म्हणून निवडल्या गेल्या. त्या भारताच्या पहिल्या आणि आजपर्यंतच्या एकमेव महिला पंतप्रधान आहेत. जानेवारी १९६६ ते मार्च १९७७ पर्यंत आणि पुन्हा जानेवारी १९८० ते ऑक्टोबर १९८४ मध्ये त्यांची हत्या होईपर्यंत त्यांनी पंतप्रधान म्हणून काम केले.

१९४७ ते १९६४ या काळात नेहरुंच्या पंतप्रधानपदाच्या काळात इंदिरा गांधींना प्रमुख सहाय्यक मानले जात होते आणि त्यांच्या अनेक परदेश दौऱ्यांवर त्या नेहरुंसोबत असायच्या. १९५९ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली. १९६४ मध्ये त्यांच्या वडिलांच्या मृत्यूनंतर गांधींची राज्यसभा सदस्य म्हणून नियुक्ती झाली आणि माहिती व प्रसारण मंत्री म्हणून लाल बहादूर शास्त्री यांच्या मंत्रिमंडळाच्या त्या सदस्या बनल्या. १९६६ च्या सुरुवातीला (शास्त्री यांच्या निधनानंतर) झालेल्या काँग्रेस पक्षाच्या संसदीय नेतृत्वाच्या निवडणुकीत त्यांनी आपले प्रतिस्पर्धी मोरारजी देसाई यांचा पराभव करून इंदिरा गांधी नेत्या बनल्या आणि शास्त्री यांच्या मृत्यूनंतर भारताचे पंतप्रधान म्हणून त्यांची जागा घेतली.

पंतप्रधान या नात्याने इंदिरा गांधी त्यांच्या राजकीय आडमुठेपणासाठी आणि सत्तेच्या अभूतपूर्व केंद्रीकरणासाठी ओळखल्या जात होत्या. पूर्व पाकिस्तानमधील स्वातंत्र्य चळवळ आणि स्वातंत्र्याच्या लढाईच्या समर्थनार्थ त्यांनी पाकिस्तानशी युद्ध केले, ज्यामुळे भारताचा विजय झाला आणि बांगलादेशची निर्मिती झाली. या विजयामुळे दक्षिण आशियामध्ये भारताचा प्रभाव वाढून भारत हा येथील एकमेव प्रादेशिक शक्ती बनला.

अलिप्ततावादी प्रवृत्तींचा हवाला देत आणि क्रांतीच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून इंदिरा गांधींनी १९७५ ते १९७७ पर्यंत आणीबाणीची घोषणा केली. आणीबाणीच्या काळात मूलभूत नागरी हक्क निलंबित केले गेले आणि प्रसारमाध्यमांवर निर्बंध लावले गेले. या काळात मोठ्या प्रमाणावर अत्याचार केले गेले. १९८० मध्ये मुक्त आणि निष्पक्ष निवडणुकांनंतर इंदिरा गांधी या पुन्हा सत्तेवर आल्या. ऑपरेशन ब्लू स्टारमध्ये त्यांनी सुवर्ण मंदिरात लष्करी कारवाईचे आदेश दिल्यानंतर त्यांच्याच अंगरक्षकांनी आणि शीख राष्ट्रवाद्यांनी ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी त्यांची हत्या केली.

बांग्लादेशच्या उभारणीवेळी त्यांची भूमिका आणि देशाला अणुशक्ती संपन्न बनविण्याचा त्यांचा निर्णय भारताला प्रगतीपथावर नेणारा होता. १९९९ मध्ये बीबीसीने आयोजित केलेल्या ऑनलाइन सर्वेक्षणामध्ये इंदिरा गांधींना वुमन ऑफ द मिलेनियम असा किताब देण्यात आला. २०२० मध्ये गेल्या शतकाची व्याख्या करणाऱ्या जगातील १०० शक्तिशाली महिलांमध्ये टाइम मासिकाने इंदिरा गांधींचा समावेश केला.

इंदिरा गांधी यांचा जन्म इंदिरा नेहरू म्हणून १९ नोव्हेंबर १९१७ रोजी एका काश्मिरी पंडित कुटुंबात अलाहाबाद येथे झाला . त्यांचे वडील, जवाहरलाल नेहरू हे ब्रिटिश राजवटीविरोधातील भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक प्रमुख नेते होते आणि पुढे ते भारताच्या अधिराज्याचे (आणि नंतर प्रजासत्ताक ) पहिले पंतप्रधान बनले. त्या नेहरू दाम्पत्याच्या एकुलत्या एक कन्या होत्या. आई कमला नेहरू यांच्यासोबत अलाहाबादमधील आनंद भवन येथे इंदिरा मोठ्या झाल्या. त्यांचे बालपण एकाकी आणि दुःखी होते. वडील जवाहरलाल नेहरू हे अनेकदा दूर असायचे. ते राजकीय चळवळींमध्ये दिग्दर्शन तर करत होते किंवा तुरुंगात तर असायचे. तर त्यांची आई नेहमी आजाराने अंथरुणाला खिळलेली होती; पुढे त्यांचा क्षयरोगामुळे लवकर मृत्यू झाला.

इंदिराजींना मुख्यतः घरीच शिक्षक शिकवायला येत होते आणि १९३४ मध्ये मॅट्रिक होईपर्यंत त्या अधूनमधून शाळेत जात होत्या. इंदिरा गांधी या दिल्लीतील मॉडर्न स्कूल, अलाहाबादमधील सेंट सेसिलिया आणि सेंट मेरी ख्रिश्चन कॉन्व्हेंट स्कूल, जिनेव्हा येथील इंटरनॅशनल स्कूल, बेक्स येथील इकोले नूव्हेल आणि मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या पूना आणि बॉम्बे येथील प्युपिल्स ओन स्कूल या शाळांमधील विद्यार्थिनी होत्या. त्या शांतिनिकेतन येथील विश्व भारती येथे शिकण्यासाठी गेल्या, जे पुढे १९५१ मध्ये विश्वभारती विद्यापीठ बनले. रवींद्रनाथ टागोर यांनी त्यांच्या मुलाखतीदरम्यान इंदिरा यांचे नाव प्रियदर्शनी ठेवले.

युरोपमध्ये असताना इंदिरा गांधी आजाराने त्रस्त होत्या आणि त्यांना सतत डॉक्टरांची भेट घ्यावी लागत असे. त्यांना बरे होण्यासाठी वारंवार स्वित्झर्लंडला जावे लागले, त्यामुळे त्यांच्या अभ्यासात व्यत्यय आला. 1940 मध्ये जेव्हा जर्मनीने वेगाने युरोप जिंकत होता तेव्हा त्यांच्यावर उपचार सुरू होते. इंदिरा यांनी पोर्तुगालमार्गे इंग्लंडला परतण्याचा प्रयत्न केला पण जवळपास दोन महिने त्या अडकल्या होत्या. १९४१ च्या सुरुवातीस त्या इंग्लंडमध्ये दाखल झाल्या आणि तिथून ऑक्सफर्डमध्ये शिक्षण पूर्ण न करता त्या भारतात परतल्या. नंतर विद्यापीठाने त्यांना मानद पदवी दिली. २०१० मध्ये, ऑक्सफर्ड विद्यापीठातील दहा नामांकित आशियाई पदवीधरांपैकी एक असलेल्या ऑक्सशियन म्हणून त्यांची निवड करून गौरव केला.

ब्रिटनमधील त्यांच्या वास्तव्यादरम्यान, इंदिरा गांधी वारंवार त्यांचे भावी पती फिरोज गांधी यांना अनेकदा भेटत असत. त्यांना त्या अलाहाबादमधून ओळखत होत्या आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये ते शिकत होते. त्यांचा विवाह अलाहाबाद येथे आदि धर्म रितीरिवाजांनुसार पार पडला, जरी फिरोज हे गुजरातच्या पारशी कुटुंबातील होते. या जोडप्याला राजीव गांधी आणि संजय गांधी ही दोन मुले होती.

इंदिरा गांधींचे बालपण आपल्या घराच्या स्वातंत्र्यलढ्याच्या संस्कारांतच झाले. पुढे त्यांनी लहान मुलामुलींची वानरसेना चळवळ सुरू केली. निदर्शने, मोर्चे काढणे, बंदी घातलेल्या गोष्टींची वाहतूक करणे वगैरे गोष्टी ही सेना करीत असे.

इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्यानंतर लगेच काँग्रेसमध्ये फूट पडली. १९६७ च्या निवडणुकात काँग्रेसचे ६० जागांचे नुकसान झाले. ५४५ पैकी २९७ जागांवर विजय मिळवून सत्ता मिळाली. मोरारजी देसाई यांना उपपंतप्रधानपद आणि अर्थमंत्रिपद द्यावे लागले. तरी अखेर १९६९ मध्ये मोरारजी सोबतच्या वादांनी काँग्रेसची दोन शकले झाली. इतर पक्षांचा पाठिंबा मिळवून त्यांनी शासन वाचवले.

१९७१ च्या सुमारास पाकिस्तानी सैन्याने तत्कालीन पूर्व पाकिस्तानात जनतेवर अत्याचाराचे सत्र आरंभले. शेख मुजीबुर रेहमान हे पूर्व पाकिस्तानातून असल्यामुळेच बहुमत असूनही त्यांना पंतप्रधान होण्यापासून थांबवले गेले. पूर्व पाकिस्तानातून सुमारे १ कोटी निर्वासित भारतात आले. त्यांचा भार भारतावर पडत होता तरी पाकिस्तान भारतालाच दूषणे देत होता. दरम्यान अतिरेक्यांनी भारताच्या प्रवासी विमानाचे अपहरण करून ते पाकिस्तानात नेऊन जाळले. अखेर १९७१ च्या डिसेंबर मध्ये भारताने युद्धाची घोषणा केली. अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष रिचर्ड निक्सन यांनी पाकिस्तानला पाठिंबा देत इंदिरा गांधींना संयुक्त राष्ट्राच्या कारवाईची धमकी देऊन पाहिली, पण इंदिरा गांधी बधल्या नाहीत.

३१ ऑक्टोबर १९८४ रोजी, इंदिरा गांधींचे दोन शीख अंगरक्षक, सतवंत सिंग आणि बेअंत सिंग यांनी सफदरजंग रोड, नवी दिल्ली येथील पंतप्रधानांच्या निवासस्थानाच्या बागेत कथितपणे ऑपरेशन ब्लू स्टारचा बदला म्हणून त्यांच्या सेवा शस्त्रांनी त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. ब्रिटिश चित्रपट निर्माते पीटर उस्टिनोव्ह यांची मुलाखत घेण्यात येणार होती, जो आयरिश दूरचित्रवाणीसाठी माहितीपट चित्रित करत होता. बिअंटने त्याच्या बाजूच्या हाताने तिच्यावर तीन वेळा गोळी झाडली; सतवंतने 30 राउंड फायर केले. पुरुषांनी शस्त्रे टाकली आणि आत्मसमर्पण केले. त्यानंतर, त्यांना इतर रक्षकांनी एका बंद खोलीत नेले जेथे बेअंटची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली.

कणखर नेत्या आणि अनेक कल्याणकारी निर्णय घेणाऱ्या प्रधानमंत्री म्हणून त्या नेहमी स्मरणात राहतील.

●●●●●●●●●

# मतदारसंघ हा आमदार/खासदारसंघ नाही!



श्री. नंदलाल, माजी आयुक्त, राज्य निवडणूक आयोग आणि माजी सदस्य भारत परीसिमन आयोग

भारतातील लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांची पुनर्रचना भारत परीसिमन आयोग (डीलिमिटेशन कमिशन ऑफ इंडिया) च्या माध्यमातून करण्यात आली. या नवीन मतदारसंघांच्या पुनर्रचनेनुसार २००९ पासून लोकसभा आणि विधानसभांच्या निवडणुका भारत निवडणूक आयोगामार्फत घेण्यात येत आहेत.

महाराष्ट्राच्या राज्य निवडणूक आयोगाचे तत्कालीन आयुक्त नंदलाल हे भारत परीसिमन आयोगाचे सदस्य होते. त्यांच्यासमवेत ज्येष्ठ पत्रकार वसंतरावदादा देशपांडे आणि मी नेहमी चर्चा करीत असू. नंदलाल हे अत्यंत परखड, प्रामाणिक आणि सच्चे सनदी अधिकारी म्हणून सर्वांना परिचित आहेत. त्यांनी मतदारसंघांबद्दल परखडपणे स्पष्ट केले होते. मतदारसंघ हा मतदारांसाठी असलेला मतदारसंघ आहे, तो कुणाच्या सातबाऱ्यावर दिलेला नाही. तो आमदार संघ नाही की खासदार संघ नाही. त्यामुळे कुणाच्या मनात हा मतदारसंघ माझ्या बापजाद्यांपासून मला आंदण दिलेला आहे, असा समज कृपया, कुणी करुन घेऊ नये.

या भारतात एक मतदान केंद्र असे आहे, ज्या क्षेत्रात एकच मतदार आहे, दोन तीन मतदारांसाठी सुद्धा मतदान केंद्रे निवडणूक आयोगाने तयार केली आहेत. मतदारांच्या सुविधेसाठी निवडणूक आयोगाकडून अनेक बाबी, उपाययोजना करण्यात येतात. वयोवृद्ध, गर्भवती महिला, दिव्यांग अशा मतदारांसाठी इमारतींच्या तळमजल्यावर मतदान केंद्रे तयार करण्यात आली आहेत. आता तर पंचाहत्तरी नंतरच्या ज्येष्ठ मतदारांना आपापल्या घरुन मतदानाची व्यवस्था करण्यात आली आहे.

मतदान सर्वाधिक व्हावे, शंभर टक्के व्हावे म्हणून यापूर्वी अनिल काकोडकर, माधुरी दीक्षित नेने, राही सरनौबत, प्रशांत दामले, मृणाल कुलकर्णी, गौरी सावंत, निशिगंधा वाड, ललिता बाबर, वीरधवल खाडे, मधु मंगेश कर्णिक, स्मृती मानधना, उषा जाधव, यांच्यासह अनेक नामवंतांमार्फत जागृती करण्यात आली आहे, याचे कारण मतदाराला मतदार राजा म्हणून संबोधण्यात येते. आजकाल एखाद्याला उमेदवारी दिली नाही तर तो बंडाचा झेंडा घेऊन उभा राहतो. अथवा विशिष्ट मतदारसंघासाठी हट्ट धरण्यात येतो. अशावेळी भारत परीसिमन आयोगाचे सदस्य आणि राज्य निवडणूक आयोगाचे तत्कालीन आयुक्त नंदलाल यांचे हे परखड मत महत्वाचे ठरते.

नंदलाल हे शिस्तप्रिय अधिकारी, कर्तव्य कठोर अधिकारी म्हणून ओळखले जातात. म्हणूनच त्यांचा राज्यकर्त्यांशी खटका उडत असे. याचे परिणामही नंदलाल यांना भोगावे लागले. 2009 च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुका पुनर्रचित मतदारसंघानुसार घेण्यात आल्या. हे मतदारसंघ पुनर्रचित करतांना भारत परीसिमन आयोगाने देशातील प्रत्येक मतदाराचा विचार केला. यासंदर्भातील माहिती नंदलाल यांनी सांगतांना आपल्याकडे देशात एक एक दोन दोन मतदारांसाठी मतदान केंद्रे बनविण्यात आली असल्याचे आवर्जून नमूद केले.

महाराष्ट्रात विलासराव देशमुख हे मुख्यमंत्री असतांना नंदलाल हे राज्य निवडणूक आयुक्त होते आणि लातूर हा विलासराव देशमुख यांचा मतदारसंघ. विशेष म्हणजे लातूर लोकसभा मतदारसंघ भारत परीसिमन आयोगाने राखीव म्हणून जाहीर केला. विलासराव देशमुख यांना तो राखीव ऐवजी सर्वसाधारण मतदारसंघ हवा होता. डॉ. पतंगराव कदम आणि बाळासाहेब थोरात हे विलासरावांचे निकटवर्तीय नेते. ते नंदलाल यांच्याशीही संबंध ठेवून होते. त्यामुळे बाळासाहेब थोरात आणि डॉ. पतंगराव कदम यांनी विलासरावांसाठी नंदलाल यांच्याकडे रदबदली केली. तेंव्हा नंदलाल यांनी भूमिका स्पष्ट केली. मतदारसंघ हे मतदारसंघ आहेत, मतदारांसाठी आहेत आणि मतदार हा राजा आहे.

एखादी व्यक्ती एखाद्या मतदारसंघातून निवडून आली म्हणजे तो काही त्याच्या मालकीचा होत नाही. राजकीय नेत्यांनी ही गोष्ट मुद्दामहून ध्यानात ठेवावी. नंदलाल यांची ही भूमिका महत्त्वाची आहे आणि आज आपल्या लोकशाहीत सर्वांसाठी महत्त्वाची आहे. लोकसभेच्या/विधानसभेच्या एकेका जागेवरुन जे वाद उफाळून येत आहेत त्या पार्श्वभूमीवर नंदलाल यांची भूमिका महत्त्वाची आहे.



**योगेश वसंत त्रिवेदी**
**मुंबई.**
**९८९२९३५३२१.**

**(लेखक ज्येष्ठ राजकीय विश्लेषक आहेत)**

●●●●●●●●●

## वाचक लिहितात

### किल्ले बांधण्याची प्रथा जपायला हवी !

गडकोट किल्ले हा महाराष्ट्राचा ऐतिहासिक ठेवा आहे. शून्यातून स्वराज्य निर्माण करणारे छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्या सवंगडी मावळ्यांच्या पराक्रमांच्या आणि त्यागाच्या खुणा असलेले हे किल्लेच आपले खरे वैभव आहे. प्रत्येक गड किल्यांच्या स्वतंत्र इतिहास असून या प्रत्येक गड किल्ल्याने जसा येथील भूमिपुत्रांचा पराक्रम आणि वैभव अनुभवले आहे, तशा परकीयांकडून दिल्या गेलेल्या हाल अपेष्टाही भोगल्या आहेत. छत्रपती शिवरायांच्या पराक्रमाची आठवण म्हणून गेल्या काही वर्षांत दिवाळीच्या काळात किल्ले बांधण्याची प्रथा राज्यात सुरु झाली. दिवाळीचा आणि किल्ले बांधण्याच्या प्रथेचा तसा काही संबंध नसला तरी त्यानिमित्ताने बालमनावर पराक्रमाचे, स्वाभिमानाचे आणि त्यागाचे संस्कार निर्माण होण्यास मदत होते.

उभारलेल्या किल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुर्तीसह अष्टप्रधान मंडळ आणि मावळे यांच्या प्रतिकृती ठेवल्या जातात ज्या शिवरायांच्या आदर्श राज्यकारभाराची जाणीव करून देतात. त्यामुळे या प्रथेचे जतन करणे आवश्यक आहे; आजमितीला किल्ले बनवण्याची प्रथा राज्यातील काही भागांमध्येच जिवंत असलेली पाहायला मिळते. हल्लीची पिढी ही मैदानी खेळांपेक्षा मोबाईल, टी.व्ही. आणि व्हिडीओ गेम्सच्या दुनियेत हरवणारी आहे. तिला यातून बाहेर काढायचे असेल, तर तिला अशा काही प्रथांची माहिती करून द्यायला हवी. जेणेकरून मुलांच्या कलागुणांना वाव तर मिळेलच शिवाय त्यांच्यामध्ये आपल्या इतिहासाविषयी प्रेम निर्माण होऊन पराक्रमाचे आणि नीतिमत्तेचे संस्कार होण्यास मदत होणार आहे.

■ **सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई.**

-------------------------

### उमेदवार येती घरा... त्यांना जाब विचारा !

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज सादर करण्याची मुदत बुधवारी संपली . पक्षाने तिकीट दिले असो वा नसो, जनतेची कामे केली असोत किंवा नसोत, समस्यांकडे लक्ष पुरवले असो की नसो, पण समाजसेवा करण्याची या अनेक उमेदवारांची हौस काही जात नाही . उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यानंतर प्रत्यक्ष प्रचाराला सुरूवात होणार आहे आणि सगळे उमेदवार आपल्या दारापर्यंत मतांचा जोगवा मागण्यासाठी येतील.

मात्र, मतदारांनी हा माझा, तो परका... अशी भावना न ठेवता आपल्या भागातील मुलभूत प्रश्नांविषयी त्यांना जाब विचारावा . मतदानाच्या आदल्या रात्री सर्रास पैशांचे वाटप केले जाते . लक्षात ठेवा, आज बाजारात बैल ४० हजार, म्हैस ६० ते ८० हजार, बकरा ८ ते १५ हजार, कुत्रे ५ ते २५ हजार, डुक्कर ३ ते ६ हजार असा रेट आहे . उमेदवारांकडून मात्र ५०० ते हजार रूपये घेवून आपण आपले मत विकणार असू तर आपली किंमत कुत्रे आणि डुकरांपेक्षाही कमी आहे, याचे भान बाळगावे . पैसे घेवून मत विकणार असाल तर नंतर आपल्या समस्यांवर जाब विचारण्याचा आपल्याला कोणताच अधिकार नाही.

■ **विश्वपाल खोब्रागडे, नागपूर .**

# आताच्या काळातील राजकीय घडामोडी

कोणत्याही समाजातील कोणत्याही राजकीय पक्षांतील नवीन वा जुन्या चेहऱ्यांनी युवक असो वा जेष्ठ राजकिय तसेच सामाजिक खेळाडू वृत्तीने जुने विकासात्मक मुद्दे, विषय, कामे, दुरुस्त करत अपडेट करुन नविन संकल्प, नविन विकासात्मक धेय्य घेऊन काम केले पाहिजे.

ग्रामीण रस्ते, अभ्यासिका, शेतकरी, शेतमजूर, भूमिहीन, शेत तलाव, व्यावसायिक प्लॅनिंग प्लॅटफॉर्म, उद्योग, झेड पी शाळा अपडेट करून जिवंत करणे, रुग्णालय अपडेट, आयटी इंजिनियरिंग ईतर कॉलेज आणणे, प्रत्येक रोडवरील गाव खेड्यात सुसज्ज असे प्रवासी निवारे बांधणे, नदी नाल्यावरील पुल, बंधारे रुंदीकरण, खोलीकरण करणे, मजबुत दर्जेदार सभा मंडपे बांधणे, अशी सर्व कामे कमीशन न घेता करणे, कायदा सुव्यवस्था सुरक्षित करणे, असे विकासात्मक धेय्य निश्चय मनात ठेवून काम करणाऱ्या लोकांनी कमीतकमी राजकारणाच्या मैदानात जात हा शब्द न ठेवत आता राजकारणाच्या माध्यमातून पुढे येत समाजविकासात्मक, समाजकल्याणकारी, समाजपयोगी, शैक्षणिक, आरोग्य, कृषी, आर्थिक, उद्योग, खेळ, क्रीडा व कल्याणकारी योजना अमलात आणण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा. योजना पूर्णत्वास नेण्यासाठी युवक वा जेष्ठांनी पुढे येत सहभाग घेणे अतिशय महत्त्वपूर्ण व गरजेचे आहे, मग ते कोणत्याही समाजाचे वा कोणत्याही पक्षांच असोत.

ज्या गल्लीत गेले तिथे मत परिवर्तन घडवून आणता आले पाहिजे, निस्वार्थ भावनेने समाजासाठी झटता आले पाहिजे. फक्त एकच की समाज सेवकांना व राजकीय सेवकानां संपत्ती व जात गोळा करण्याचा मोह नसावा. घोळ नेमका इथच होत आहे. माझ्या मतदार संघातील प्रत्येक व्यक्ती माझा आहे, माझ्या मतदारसंघातील प्रत्येक समाज माझा आहे आणि मी त्यांच्यासाठी दररोज २४ तास सज्ज आहे, असा विश्वास निर्माण करता यावा. कृतीतूनही तो उतरवता आला पाहिजे . फक्त कागदोपत्रीच किंवा सोशल मिडीयावर न राहता प्रत्यक्षात मैदानावर सेवेसाठी सज्ज आहे, असे धेय्य मनात ठेवून कार्यरत, सज्ज राहा . तेव्हाच कुठ आपण लोकप्रिय व्हाल.

आपले आपल्यालाच लोकप्रिय उपाधी देत आहेत यात काय अर्थ? हे अनेक वर्षांपासून चालुच आहे. लोकप्रिय उपाधी ही आपल्या संपर्कात नसणाऱ्या लोकांनी, समाजाने दिली पाहिज, तीच खरी लोकप्रियता होय.

सेवा हो धन हमारां
संतोष मन हमारां !
सब से ही बंधुता हो
यही वंदना हमारीं !!

--------------------

**दिपक सदाफळे (जिवरक्षक)**
**पिंजर, जि.अकोला.**
**संस्थापक अध्यक्ष**
**संत गाडगे बाबा आपात्कालीन शोध व बचाव पथक**
**9822229471**

●●●●●●●●●

# लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल

भारताचे पहिले उपपंतप्रधान, पहिले गृहमंत्री, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची आज जयंती.

सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी आणंद या छोट्याशा गावात झाला. त्यांचे वडील झव्हेरिभाई यांनी १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता. त्यामुळे लहानपणीच त्यांना देशभक्तीचे बाळकडू मिळाले. त्यांच्या संपुर्ण कुटुंबावर स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव होता. सरदार पटेल हे हुशार विद्यार्थी होते. त्यांनी वकिलीचे शिक्षण पूर्ण करून बोरसाड येथे वकिली सुरू केली.

एक अभ्यासू वकील म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले पुढे ते बॅरिस्टर झाले. बॅरिस्टर झाल्यावर अहमदाबाद येथे त्यांनी वकिली सुरू केली. अल्पावधीतच एक निष्णात वकील म्हणून त्यांची कीर्ती देशभर पसरली. विकिलीसोबत त्यांना राजकारणाचीही आवड होती त्यामुळे त्यांनी अहमदाबाद पालिकेची निवडणूक लढवली त्यांनी ती निवडणूक सहज जिंकली. राजकारणात आल्यावर त्यांना जनतेचे मूलभूत प्रश्न समजू लागले.

१९१७ साली खेडा जिल्ह्यात प्रचंड पाऊस झाला त्यामुळे खरिपाचे पीक वाया गेले. पुढे उंदराचा सुळसुळाट आणि किटकांमुळे रब्बीचे पीकही गेले त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले. त्यातच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या हाती २५ टक्क्यांपेक्षाही कमी उत्पादन येईल अशी परिस्थिती निर्माण झाली. नैसर्गिक आपत्तीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना शेतसाऱ्यात सूट मिळावी, शेतसाऱ्याची वसुली पुढे ढकलावी यासाठी त्यांनी १८ हजार शेतकऱ्यांच्या सह्या असलेले निवेदन सरकारकडे दिले पण सरकारने त्याची दखल न घेता शेतसारा वसुलीसाठी शेतकऱ्यांवर जप्तीचे आदेश दिले त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला.

महात्मा गांधी यांनी सक्तीच्या शेतसारा वसुली विरोधात खेडा येथे सत्याग्रह चळवळ सुरू केली. या चळवळीचे नेतृत्व त्यांनी सरदार पटेल यांच्याकडे सोपवले. शेतकऱ्यांचे हे आंदोलन त्यांनी अत्यंत निधारनि यशस्वी केले. या आंदोलनात त्यांनी केलेल्या नेतृत्वाने महात्मा गांधी भारावून गेले. पुढे महात्मा गांधी यांच्या प्रत्येक चळवळीत त्यांनी हिरीरीने भाग घेतला. नेतृत्वाप्रमाणेच त्यांचे वक्तृत्वही प्रभावी होते.

आपल्या वक्तृत्वाने जनसामान्यांना प्रभावित करणाऱ्या सरदार पटेलांनी १९२८ साली सायमन कमिशन विरोधात पुकारलेल्या बारडोली सत्याग्रहादरम्यान लोकांना आपल्या महान विचारांनी प्रभावित केले त्यामुळे इंग्रजांनी अवाजवी वाढवलेल्या करांना न भरण्यावर जनता सहमत झाली त्यामुळे ब्रिटिश व्हाइसरॉयला पराभव पत्करावा लागला.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

या आंदोलनात आपल्या सशक्त नेतृत्वाने वल्लभभाई पटेल जनतेत चांगलेच प्रसिद्ध झाले आणि बारडोलीतील लोक त्यांना सरदार म्हणू लागले त्यामुळे त्यांच्या नावापुढे सरदार जोडले जाऊ लागले. १९३० साली सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला म्हणून त्यांना इंग्रजांनी अटक केली. त्यांना पाच वर्षांचा तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला त्यावेळीही त्यांना अटक झाली. १९४६ झाली स्थापन झालेल्या हंगामी सरकारमध्ये ते गृहमंत्री होते.

गृहमंत्री या नात्याने त्यांनी भारत पाक फाळणीच्या चर्चेमध्ये निर्णायक भूमिका बजावली. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात ते उपपंतप्रधान बनले. त्यांच्याकडे गृहखाते, माहिती आणि नभोवाणी, संस्थांनचा प्रश्न व निर्वासितांचा प्रश्न व निर्वासितांचे प्रश्न सारखे महत्वाचे खाते देण्यात आले. स्वातंत्र्य भारताचे गृहमंत्री झाल्यावर सरदार पटेल यांनी सर्वात आधी भारतातील वेगवेगळ्या संस्थानातील राजांना आपल्या दूरदर्शीपणाचा आणि बुद्धिमत्तेचा वापर करून भारतात विलीन होण्याची सूचना केली.

बहुतांश संस्थानांनी याला सहमती दर्शवून भारतात विलीन झाले पण जुनागड, हैदराबादचा निजाम, जम्मू काश्मीर च्या राजांनी भारतात विलीन होण्यास नकार दिला. सरदार पटेलांनी आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या बळावर सैन्याचा वापर करीत या तिन्ही संस्थानांना भारतात विलीन केले. सरदार पटेल यांनी तत्कालीन ५६५ संस्थाने भारतात विलीन करून एकसंध भारत निर्माण केला त्यांची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच होती. त्यांच्या याच कामगिरीने त्यांना लोहपुरुष ही पदवी देण्यात आली.

१९५० साली त्यांचे स्वास्थ्य बिघडू लागले. २ नोव्हेंबर १९५० ला त्यांचे स्वास्थ्य इतके बिघडले की ते अंथरुणावरुन उठण्यास देखील असमर्थ होते. पुढे १५ डिसेंबर १९५० रोजी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली. सरदार पटेल यांना विनम्र अभिवादन!

●●●●●●●●●

## अशोकायन

### पहा जमलं तर ..!

**कोरोनाच्या संसर्गाने**
**फुफुस्से झाली कमजोर**
**फटाक्याच्या आवाजाने**
**वाढे बिपी दम्याचा जोर ..**

**फटाक्यामुळे वाढे**
**प्रदुषणाचा आलेख**
**म्हणून टाळायला हवा**
**फटाक्यांचा अतिरेक ..**

**टाळूनी खर्च अनाठायी**
**वंचितांना दिली मिठाई**
**हास्य पाहता चेहऱ्यावर**
**समाधान मिळेल का नाही?**



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

## वागले की दुनिया मालिकेत टेडी बेअरच्या रहस्यमय पार्सलमुळे साई दर्शनमधील महिलांमध्ये कुतूहल वाढले



**मुंबई, दि. ३० :** सोनी सबवरील वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से मालिकेत वागले या मध्यमवर्गीय कुटुंबाचा दैनंदिन संघर्ष आणि त्यांचे यशापयश दाखवले आहे. अलीकडच्या भागांमध्ये वागले यांच्या घरी एका रहस्यमय टेडी बेअरचे पार्सल येते. ते कुणी आणि कुणासाठी पाठवले आहे, याचे तपशील नसल्यामुळे साई दर्शन सोसायटीमधल्या महिलांमध्ये कुतूहल आणि गोंधळ माजतो.

साई दर्शनमधल्या महिला असा अंदाज बांधतात की, हे टेडी बेअर वंदना वागले (परिवा प्रणती) आणि राधिका वागले (भारती आचरेकर) यांना त्यांच्या पतीने म्हणजे राजेश (सुमित राघवन) आणि श्रीनिवास (अंजन श्रीवास्तव) यांनी पाठवले असावे. कारण या दोघींचा आपल्या पतीशी वाद झालेला असतो. तर, साई दर्शनच्या दुसऱ्या महिलांना मात्र त्यात तथ्य वाटत नाही. वागले कुटुंबातल्या प्रत्येकाला खात्री वाटू लागते की तो रहस्यमय टेडी आपल्यासाठीच पाठवलेला असणार आणि या भावनेने घरात कुजबूज, अंदाज होऊ लागतात आणि एक गोड रोमान्सची भावना सगळ्यांना जाणवू लागते. रहस्य अधिकाधिक गूढ होऊ लागते, तेव्हा सगळ्या महिला ते टेडी बेअर कोणी पाठवले असावे याचा शोध घेऊ लागतात आणि त्यावेळी त्यांना समजते की, ते त्यांच्यापैकी कोणासाठीच पाठवण्यात आलेले नाही.

## स्वयं क्रियेशन ! चहा आणि बरच काही !



नमस्कार ! आपली कला जेव्हा तुमची ओळख आणि अर्थाजना चे साधन बनते तेव्हा काम करायला एक वेगळच बळ मिळत.. पण ते करतांना आपल्या माणसांच पाठबळ आवश्यक आहे, प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे स्त्री चा तसेच माझ्या (मी : विदुला पाठक) प्रवासात अनेक हरहुन्नरी स्त्रीयांचा तसेच माझ्या मिस्टरांचा हे इवलेसे यश जे काही मी मिळवले यात मोलाचा वाटा आहे. मला आधी पासूनच फुलांची मनापासून आवड होती, फुल ही आपल्या आनंद देतात.. व्यक्त व्हायचं माध्यम सुखात, दुःखात क्षणोक्षणी सोबत करतात, कायम स्मरणात राहतात.. मी जेव्हा हे काम सुरू केल तेव्हा लॅकडाऊन होते आपण व्यवसाय करतांना काही हेल्दी-हर्बलहोममेड द्यावे म्हणून पहिले आयुर्वेदिक चहा मसाला. व हर्बल टी सुरु केल. पण चहात कॅफेन असत तर पुर्णपणे नैसर्गिक आणि हेल्दी-टेस्टीफुलांचा चहा बनवला.. त्यात आलेल यश आणि ग्राहकांची आवड पाहता एक एक चहा बनवत गेले. आज आपल्या कडे ३०-४० प्रकारचे चहा आणि विविध मसाले आहेत. आज स्वयं क्रियेशन ! चहा आणि बरच काही! चे भारतातील ४०-५०शहरातील हजारोंच्या वर ग्राहकांना समाधानी करण्याचे भाग्य आम्हाला लागले. त्यांनी दिलेल्या संधी बद्दल मनपूर्वक आभार! तसेच आमचे प्रोडक्ट (परदेशात) १०-१२ देशात पाठवायचे सौभाग्य आम्हास लाभले. व तेथील भारतीयांनी आपल्या प्रोडक्ट ला पसंत दर्शवली तसेच कॅनडा ला आम्ही पाठवलेला आयुर्वेदिक चहा मसाला तेथील ....... मध्ये ठेवायची संधी आम्हास मिळाली. यंदाची दिवाळी! उत्साहाची, मांगल्याची, निरामय आरोग्याची परिवारा संगे हसऱ्या क्षणांना सोबत हवी स्वयं आयुर्वेदिक चहाची... तसेच दरवर्षीप्रमाणेच दिवाळीत भेट द्यायला आमचे खास हॅम्पर्स तयार करून मिळेल.

## या दिवाळीत तुमचे सेलिब्रेशन दुप्पट करा




OPPO चे जागतिक दर्जाचे मोबाईल खरेदी करा आणि रु.१० लाख व इतर आकर्षक बक्षिसे जिंकण्याची संधी मिळवा! नालासोपारा येथील ए.एम. कॉर्पोरेशनमधून OPPO फोन खरेदी करून सलीम मिराशी रु.१० लाखांचे भाग्यवान विजेते ठरले आहेत.

## व्हेरांडा लर्निंग सोल्युशन्सचे कोटी रूपयांचा महसूल लक्ष्य गाठण्याचे उद्दिष्ट्य

**चेन्नई , दि. ३० :** शैक्षणिक तंत्रज्ञान कंपनी असलेल्या व्हेरांडा लर्निंग सोल्युशन्स लि. शैक्षणिक क्षेत्रात एंड-टू-एंड सोल्यूशन्स ऑफर करणारी एक सूचीबद्ध एंटरप्राइझ असून कंपनीने २०२५ या वर्षात ६०० कोटी रूपयांचा महसूल गाठण्याचे उद्दिष्ट्य ठेवले आहे. व्हेरांडा हायर एज्यू.ने अलीकडेच ऑस्ट्रेलियातील सिडनी येथील युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजीच्या भागीदारीत दोन अत्याधुनिक कमी कालावधीचे अभासक्रम सुरू केले आहेत. प्रो. जितेंद्र कांतीलाल शाह, प्रा. अशोक मिश्रा आणि सुश्री एन. अलामेलू यांच्यासह शिक्षण नेत्यांच्या समावेशासह कंपनीने आपले मंडळ मजबूत केले आहे. कंपनीने मध्य पूर्वमध्ये प्रवेश केला आणि यूएईमध्ये सीए तयारी अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी जुमेरा युनिव्हर्सिटी कनेक्टसह भागीदारी केली. श्री आदित्य मलिक यांची ग्रुप चीफ ऑपरेटिंग ऑफिसर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मे २०२३ मध्ये कंपनीने ४०० कोटी रुपये किमतीच्या सात कंपन्या विकत घेतल्या असून व्हेरांडा ग्रुपने २०२४ या वर्षामध्ये ६,९३,८७४ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले आहे . तर २०२५ च्या पहिल्या तिमाहीमध्ये ११३,२६२ विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले. २०१८ मध्ये कलापथी एजीएस समुहाने स्थापन केलेल्या कंपनीमध्ये सुमारे ५५ टक्के हिस्सा आहे. अधिग्रहणाद्वारे कंपनीचा झपाट्याने विस्तार झाला आहे. मे २०२३ मध्ये, या समुहाने ४०० कोटी रुपये किमतीच्या सात कंपन्या विकत घेतल्या. २७ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या ६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत कंपनीने १००० कोटी रुपयांपर्यंत वाढीव कर्ज घेण्याची मर्यादा मंजूर केली. नॉन-कन्व्हर्टेबलडिबेंचर्स, बाँड्स किंवा इतर साधनांच्या इश्यूद्वारे त्याची वाढ आणि विस्तार योजनांसाठी हा निधी असणार आहे. कंपनीने उत्कंठावर्धक वाढीच्या संधींचा फायदा घेत २०२५ च्या पहिल्या तिमाहीमध्ये मजबूत परिचालन महसूल आणि आर्थिक कामगिरी कायम ठेवली आहे. या कालावधीत कंपनीचा परिचालन महसूल ११८.९९ कोटी रुपयांवरून ७२.६९ टक्क्यांची वाढ केली आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत ही वाढ ६८.९० कोटी रुपये होती. २०२५ घ्या पहिल्या तिमाहीमध्ये कंपनीचा इबिटा ५ पटीने वाढून २७.६१ कोटी रुपयांवरून त्यात लक्षणीय वाढ झाली. गेल्या वर्षी याच तिमाहीत ५.६४ कोटी रुपयांच्या वाढीची नोंद झाली होती. व्हेरांडा लर्निंग सोल्युशन्सचे कार्यकारी संचालक आणि अध्यक्ष श्री. सुरेश कलपाथी म्हणाले, कंपनीने आर्थिक वाढीच्या रोमांचक संधींचा फायदा घेत २२५ च्या पहिल्या तिमाहीमध्ये मजबूत ऑपरेशनल आणि आर्थिक कामगिरी कायम ठेवली आहे. पारंपरिकपणे ऑफ-सीझन कालावधी असूनही पहिल्या तिमाहीत नेत्रदीपक वाढ झाली. ही भरीव वाढ कंपनीची वर्धित ऑपरेशनल कार्यक्षमता आणि तिच्या धोरणांची प्रभावी अंमलबजावणी हायलाइट करते.

## विनय कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे सेबीकडे आयपीओसाठी डीआरएचपी दाखल

**महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :** विनय कॉर्पोरेशन लि. ही कंपनी दुचाकी, तिचाकी वाहनांच्या, तसेच प्रवासी व व्यावसायिक वाहनांच्या सुट्या भागांचे डिझाइन व उत्पादन करते; तसेच देशात व परदेशांत ही या उत्पादनांचा पुरवठा करते. कंपनीच्या पोर्टफोलिओ मध्ये स्टीयरिंग व्हील स्विचेस, गियर शिफ्टिंग पॅडल्स, लाइट कंट्रोल युनिट्स, ब्रेक पेडल स्विचेस व सेन्सर्स, मल्टीमीडिया प्लग आणि एअर बॅग ऑन/ऑफ स्विचेस (दृश्यमान किंवा झाकलेले स्विच) अशा मेकॅट्रानिक उत्पादनांचा तसेच वायरिंग हार्नेस, फ्यूज बॉक्स, वायर, केबल्स, टर्मिनल आणि कनेक्टर अशा कनेक्टिव्ह उत्पादनांचा समावेश आहे. विनय कॉर्पोरेशनने आपला ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (डीएचआरपी) सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) या बाजार नियामक संस्थेकडे दाखल केला आहे. या प्राथमिक समभाग विक्रीच्या ऑफर मध्ये प्रत्येकी१० रुपये दर्शनी मूल्य असलेले व एकुणात १५० कोटी रुपयांची किंमत असलेलेफ्रेश इश्शू मधील इक्विटी शेअर्स आणि कंपनीच्या शेअर होल्डर्सकडे असलेले ऑफर फॉर सेलसाठी उपलब्ध असलेले २२,२१३,८५२ इक्विटी शेअर्स यांचा समावेश आहे.

रेड हेरिंग प्रॉस्पेक्टसद्वारे ऑफर केले जाणारे इक्विटीशेअर्स बीएसई लिमिटेड (बीएसई) आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (एनएसई) या स्टॉकएक्सचेंज वर सूची बद्ध करण्याचा प्रस्ताव आहे. (सूचीचे तपशील) आयसीआयसीआय सिक्युरिटीज लिमिटेड आणि क्सिस कॅपिटल लिमिटेड हे या इश्यूचे बुकर निंगलीड मॅनेजर(बीआरएलएम) आहेत.

## सोनी सबवरील श्रीमद् रामायण मालिकेत लव आणि कुशला श्रीराम आणि सीतेच्या वियोगाचे सत्य समजले

**महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :** सोनी सबवरील श्रीमद् रामायण मालिकेत श्रीराम (सुजय रेऊ) आणि सीता (प्राची बंसल) यांची दिव्य कथा विशद केली आहे. अलीकडच्या भागांमध्ये प्रेक्षकांनी पाहिले की लव (शौर्य मंडोरिया) आणि कुश (अथर्व शर्मा) भव्य दिव्य अशा अश्वमेध यज्ञात सहभागी होण्यासाठी आणि आपले आदर्श श्रीराम आणि सीता यांचे दर्शन



घेण्यासाठी अयोध्येस जायला निघतात. अयोध्येला जात असताना रस्त्यात लव आणि कुश एकाराक्षसापासून एका मुलाचे प्राण वाचवून त्याच्या अंध माता-पित्याला मदत करतात. ते माता-पिताकृतज्ञतेने त्यांना सरस्वती देवीची वीणा भेट देतात. ते अयोध्येच्या जवळ येतात, तेव्हाच श्रीरामांनी अश्वमेध यज्ञासाठी निवडलेला अश्व सुटून या दोन भावांकडे पोहोचतो. एका प्रेरणेने लव आणि कुश त्या घोड्यावर सीता राम असे लिहितात, ज्यातून आपल्या आराध्यावरील त्यांची अढळ श्रद्धा दिसून येते. जेव्हा ते अयोध्येस पोहोचतात, तेव्हा महालात प्रवेश करण्यास त्यांना मज्जाव करण्यात येतो. सर्वांचे लक्ष वेधून घेण्यासाठी हे दोघे कोवळे भाऊ त्या दिव्य विणेवर सूर छेडून गाऊ लागतात आणि आपल्या गाण्यातून रामायण कथन करतात. त्यांचे ते दिव्य संगीत ऐकून हनुमान (निर्भय वाधवा) भावुक होतो आणि श्रीरामाला या दोन दिव्य मुलांविषयी सांगतो. अयोध्येत ही दोन दिव्य मुले आली असल्याचे तो सांगतो. अखेरीस, जेव्हा लव आणि कुश श्रीरामाला भेटतात, तेव्हा त्यांची नजर सीतेच्या लखलखत्या सुवर्ण प्रतिमेवर पडते.

## सा रे ग म प मेंटॉर्स सचिनजिगर यांनी स्पर्धक श्रद्धाला ह्या शो नंतर आपल्या बॅन्डमध्ये समाविष्ट होण्याची दिली ऑफर

झी टीव्हीवरील सा रे ग म प ने आपल्या नवीन पर्वासह झोकात पुनरागमन केले असून यात सचिनजिगर, सचेत परंपरा आणि गुरू रंधावा हे ताज्या दमाचे मेंटॉर्सचे पॅनल आणि विपुल रॉय व सलमान अली यांना सूत्रधारांच्या रूपात पाहायला मिळेल. हा मंच काही अविस्मरणीय परफॉर्मन्सेससाठी सज्ज आहे. प्रेक्षक आणि मेंटॉर्सचे प्रेम जिंकण्यासाठी स्पर्धक अगदी मन लावून आपले ॲक्ट्स करत आहेत. ह्या वीकेन्डला प्रेक्षकांना एक वेगळी पर्वणी पाहायला मिळेल कारण मेंटॉर्स आणि स्पर्धक सगळेच दिवाळी स्पेशल एपिसोडमध्ये सणासुदीच्या उत्साही मूडमध्ये असतील.



सर्व स्पर्धकांमुळे प्रभावित झालेल्या मेंटॉर जिगरने सांगितले की कसा सा रे ग म प चा मंच हा स्पर्धकांना वास्तविक जगासाठी तयार करत आहे, जिथे ते ह्या शोमध्ये शिकलेल्या सर्व गोष्टी वापरून व्यासपीठावर आणि स्टुडिओमध्ये आत्मविश्वासाने परफॉर्म करू शकतील. सर्वच स्पर्धकांनी आपले सर्वोत्तम पाऊल पुढे टाकले असले तरी स्पर्धक श्रद्धाचा के सेरा सेरा आणि सात समुंदर पार ह्या गाण्यांवरील परफॉर्मन्स पाहून मेंटॉर्स सचिन आणि जिगर यांनी तिला हा शो संपल्यानंतर आपल्या लाईव्ह बॅन्डचा हिस्सा बनवण्याचे ठरवले. तिच्या परफॉर्मन्सनंतर सचिन आणि जिगर म्हणाले, आम्हांला एकच गोष्ट सांगायची आहे. आमची अशी इच्छा आहे की सा रे ग म प च्या ह्या सुंदर प्रवासाच्या समारोपानंतर तू आमच्या लाईव्ह शोज्चा एक हिस्सा बन.श्रद्धाच्या गायनाने प्रेक्षक आणि मेंटॉर्स प्रभावित झाले.

## आजचे राशिभविष्य

**मेष :** आज तुम्हाला प्रिय व्यक्तीकडून चांगली बातमी मिळेल. नोकरीत बढतीचे योग येतील. कौटुंबिक जीवनात आनंददायी काळ जाईल. जुन्या मित्राची भेट होईल. नोकरीचा शोध पूर्ण होईल.

**वृषभ :** आज नोकरीत बदली होण्याची शक्यता आहे. महत्त्वाच्या कामासाठी घरापासून दूर जावे लागेल. कोणत्याही महत्त्वाच्या कामाची जबाबदारी नवीन व्यक्तीला देण्याचे टाळा.

**मिथुन :** भागीदारीच्या स्वरूपात व्यवसाय करण्याची शक्यता आहे. उपजीविकेच्या क्षेत्रात काम करणा-या व्यक्तीने सहका-यांशीसामंजस्याने वागले तर त्याला नवीन आशेचा किरण मिळेल.

**कर्क:** कोणाचीही दिशाभूल करू नका. कौटुंबिक खर्चात वाढ होईल. बौद्धिक कार्य करणा-यव्यक्तींना समाजात विशेष सन्मान मिळेल. वाहन खरेदीची इच्छा पूर्ण होईल.

**सिंह :** तुमची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी तुम्ही अधिक काळजी कराल. आज पैशाची कमतरता जाणवेल. गायन क्षेत्राशी संबंधित लोकांना उच्च यश आणि सन्मान मिळेल.

**कन्या :** स्वत:वर विश्वास ठेवा. इकडे-तिकडेगोष्टींमध्ये अडकू नका. व्यवसायात उत्पन्न आणि खर्चात सामान्यता राहील. जुने कर्ज फेडण्यात यश मिळेल. उत्पन्नाच्या स्त्रोतांकडे लक्ष द्या.

**तुळ :** आजच्या दिवसाची सुरुवात काही चांगल्या बातमीने होईल. राजकीय क्षेत्रात काम करणा-यांना जनतेचा मोठा पाठिंबा मिळेल. कार्यक्षेत्रात सहका-यांशी जवळीक वाढेल. बेरोजगारांना रोजगार मिळेल.

**वृश्चिक :** आजचा दिवस तुमच्यासाठी शुभ आणि लाभदायक असेल. कामाच्या ठिकाणी कठोर परिश्रम करूनही तुम्हाला अनुकूल परिणाम मिळणार नाहीत. विचार सकारात्मक ठेवा.

**धनु :** आज तुम्हाला चांगली बातमी मिळेल. रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. नोकरीतील अडथळे दूर होतील. व्यवसायात नवीन सहकारी लाभदायक ठरतील. व्यवसायात प्रगतीसह लाभ होईल.

**मकर :** निधीअभावी इमारत बांधकामासाठी साहित्य आणता येणार नाही. तुम्हाला कुटुंबातील सदस्याकडून पैसे आणि भेटवस्तू मिळतील. आज महत्त्वाचे काम इतरांवर सोडू नका.

**कुंभ :** बोलण्यावर नियंत्रण ठेवा. कोणाशीही कठोर शब्दांत बोलू नका. आज भांडवलात वाढ होईल. तुम्हाला कुटुंबातील सदस्याकडून मोठ्या प्रमाणात पैसे मिळतील.

**मीन :** कुटुंबात नवीन सदस्य येण्याची शक्यता आहे. दूरदेशी प्रवासाचे योग येतील. व्यवसायात उत्पन्नाचे नवीन स्रोत उघडतील. प्रलंबित पैसे परत मिळतील. कामाच्या ठिकाणी अधिक सावधगिरी बाळगली पाहिजे.

## झी टीव्हीवरील कलाकार सांगत आहेत भाऊबीजेच्या त्यांच्या गोड आठवणी!



भाऊबीज हा गोड सण आहे भावाबहिणींमधील खास नात्याचा. ह्या दिवशी बहिणी आपल्या भावाच्या समृद्धीसाठी प्रार्थना करतात, त्यांच्या कपाळावर टिळा लावतात आणि त्यांचे औक्षण करतात आणि आपल्या भावाच्या दीर्घायुष्य आणि समृद्धीची मनोकामना करतात. त्या बदल्यात भाऊ आपल्या बहिणींना भेटवस्तू देतात. त्याबद्दल सांगताना झी टीव्हीवरील कलाकार जाने अनजाने हम मिलेमधील भरत अहलावत, कुंडली भाग्यमधील पारस कलनावट, वसुधामधील प्रिया ठाकूर आणि जागृती एक नयी सुबहमधील आर्य बब्बर यांनी त्यांच्या आठवणी आणि ह्यावर्षीच्या आपल्या योजनांबद्दल सांगितले. झी टीव्हीवरील जाने अनजाने हम मिले मध्ये राघवच्य भूमिकेतील भरत अहलावत म्हणाला, भाऊबीज हा एक असा दिवस आहे जेव्हा माझी धाकटी बहिण परंपरा आणि मस्ती यांचा गोड मिलाफ बनते. ती सकाळी पूजा करते आणि त्याचसोबत आमचा दिवस सुरू होतो आणि तिचा गंभीर चेहरा पाहून मला खरंतर हसायलाच येतं. मला अजूनही आठवतंय जेव्हा ती लहान होती, तेव्हा ती मला तिला हव्या असलेल्या गोष्टींची यादीच द्यायची आणि मग माझी आई मला तिच्यासाठी ते सगळं घेण्यासाठी घेऊन जायची. मला वाटतं ह्या सगळ्या छोट्या छोट्या गोष्टीच आपल्या मनात आयुष्यभर राहतात. तिच्याबद्दल एक गोष्ट मला सर्वांत जास्त आवडते आणि ती म्हणजे माझी बहिण माझी सगळ्यात मोठी चीअरलीडर आहे. मला माझी आगामी मालिका जाने अनजाने हम मिले जेव्हा मिळाली तेव्हा ती सगळ्यात जास्त आनंदात होती. ती माझ्या आजूबाजूला असलेली सर्वांत आनंदी व्यक्ती आहे. जगातील कुठल्याही गोष्टीसाठी मी आमच्या नात्याला कधीच काहीही होऊ देणार नाही.झी टीव्हीवरील कुंडली भाग्य मध्ये राजवीरच्या भूमिकेतील पारस कलनावट म्हणाला, माझी बहिण प्रगती दी ही माझ्यापेक्षा पाच वर्षांनी मोठी आहे आणि गेल्या पाच वर्षांपासून माझे जीजू (नवजोत शर्मा) यांच्यासोबत लग्न झाल्यानंतर ती युनायटेड स्टेट्समध्येच स्थायिक झाली आहे. भाऊबीजेचा सण मला तिचे प्रेम आणि त्याग यांची आठवण करून देतो, ज्यामुळे आज मी जे काही आहे ते बनलो आहे.

आमच्या आईबाबांचे मन वळवण्यापासून एका छोट्या मुलासारख्या माझ्या इच्छा पूर्ण करण्यापर्यंत ते अगदी स्वतःच्या इच्छा दूर सारण्याबद्दल तिने नेहमीच मला प्राथमिकता दिली आहे.

## शब्दकोडे क्रमांक १९६१



**आडवे शब्द :-**
२) एक रत्न
४) दूरदृष्टी, शहाणपण
६) महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेली देवी
९) पवित्र
११) शिव्याशाप
१३) भविष्य पाहण्याची एक विद्या
१४) पेरणी
१५) शंभर
१७) मनाचा ओढा
१८) महाराष्ट्राची राजभाषा
२०) उंट हाकणारा
२२) अभिप्राय
२३) पंख
२४) केस
२५) छोटी बैलगाडी
२६) चूक च्या विरुद्ध, सह
२८) कुजके पाणी
३१) शासन चालविणारा गट
३३) कणीदार
३६) जमिनीवरील कर
३८) कारस्थान
३९) अथवा, किंवा
४०) गोमाता
४१) हत्ती
४३) चलाख, हुशार
४५) स्वप्न (हिं )
४८) नुकतेच सरलेले दिवस
५०) सरळ वासा
५१) घेरी, भोवळ
५२) फिकीर, काळजी
५४) राजाची पत्नी
५५) विजयादशमी
५७) कौरव-पांडवांची कथा
५९) चालू दिवस
६२) पर्ण
६३) टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास
६७) लोटी
६९) स्वस्तच्या विरुद्ध
७०) एक धान्य
७१) गुणाकार
७२) कमी पणा
७४) पाकळी, सैन्याचा विभाग
६५) वाईट
७६) मध्यस्थ
७७) सप्तस्वरातील पहिला स्वर
७८) गाढव

**उभे शब्द :-**
१) शंकराचे एक नाव,
२) फायदेशीर
३) एक ज्वालाग्रही पदार्थ
४) बैलाचा सण
५) सुंदर तरुणी
६) भराव
७) डावा
८) शनीचे रत्न
९) एक चतुर्थांश
१०) रवाळ
१२) सूर्य
१४) सोटा, काठी
१६) अगदी त्याप्रमाणेच
१९) उघड उघड, बिनदिक्कतपणे
२१) उपयोग
२२) राज्ञी
२३) परकीय, दुसरा
२४) पळसाचा डिंक
२७) भरभराट
२८) तोटी,
२९) मेहनत
३०) बटवा
३२) रड्या मनुष्य
३४) बटवडा
३५) वेडा
३७) रात्रीचा पाऊस
४२) जपजाप्य
४४) अस्वल
४६) रागी, नागली
४७) कळलाव्या मुनी
४८) थरथरणारा आवाज
४९) लक्ष्मीचे एक नाव
५३) दशक
५४) राजवाडा
५६) युद्ध
५७) हात आणि पंजा यांना जोडणारा अवयव
५८) हमाल
६०) पाणी
६१) सध्या
६४) दुनिया
६५) धाक, वचक
६६) माझा
६८) त्वरित
६९) हत्तीच्या गंडस्थळातील स्राव
७१) अधिकाराचे स्थान
७३) बोटावरचे कडक आवरण

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# कस्तुरीचा चिपीच्या ग्रामस्थांसोबत दीपोत्सव

## महिलांना भाऊबीज भेट

■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला, दि. ३१:** भारतीय संस्कृतीत दिवाळी हा सण सर्वात मोठा व आनंद देणारा. लहान थोर, गरीब श्रीमंत सर्वच सणाची आतुरतेने वाट बघतात. घराचे रंगकाम, सुशोभीकरण, नवनवीन वस्तू, कपड्यांची खरेदी, फराळ व मिठाई , फटाके आदींची या निमित्ताने रेलचेल असते. समाजातील सर्वच लोक हा सण मोठ्या उत्साहात साजरा करतात. ज्यांची आर्थिक स्थिती सुदृढ आहे त्यांना हा आनंद सहज लुटता येतो. पण गरीब व मोलमजुरी करणाऱ्या कुटुंबाच्या दिवाळीचे काय? त्यातही सामाजिक प्रवाहापासून दूर व अतिदुर्गम भागात राहणाऱ्या उपेक्षित व वंचित आदिवासी



बांधवांच्या दिवाळीचे काय..? कस्तुरीने नेमकी हीच बाब हेरली आणि धनतेरसच्या पूर्वसंध्येला तेल्हारा तालुक्यातील अतिदुर्गम आदिवासी गाव चिपी' येथील गावकऱ्यांसोबत दिवाळीचा सण साजरा केला.

या दीपोत्सवात कस्तुरीचे संस्थापक प्रा. किशोर बुटोले, माजी आमदार वसंतराव खोटरे, गजानन मानकर, संजय गायकवाड, संजय ठाकरे, यशवंत देशपांडे, डॉ. छाया देशमुख, शीला गहिलोत, अनघा सोनखास्कर, चेतना आनंदानी आदींनी सहभाग घेतला. सणाच्या निमित्ताने कस्तुरी आणि चिपीच्या आदिवासी बांधवांमध्ये अतिशय भावनिक व सलोख्याचे संबंध प्रस्थापित झाले. उपक्रमाची सांगता स्वयंसेवक व मान्यवरांच्या सत्काराने करण्यात आली. कस्तुरीच्या या सेवाभावी प्रकल्पास कर्मयोग परिवार, कृष्णार्पण प्रतिष्ठान, स्व. अथर्व अनिल मुळे मल्टिपर्पज फाउंडेशन या सामाजिक संस्था व अनेकांची साथ मिळाली.

आदिवासी नृत्य, सांस्कृतिक कार्यक्रम या कार्यक्रमानिमित्त या संपूर्ण गावाला मिष्टान्न भोजन, लहान मुलांना नवे कपडे व महिलांना भाऊबीजेची भेट म्हणून साडीचोळी दिली. यानिमित्ताने तेथील आदिवासींच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचा कस्तुरीने प्रयत्न केले.

याप्रसंगी तेथील लहान मुलांनी फटाके फोडून आणि आदिवासी बांधवांनी पारंपारिक आदिवासी नृत्य व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून कस्तुरी परिवाराचे मोठ्या उत्साहात स्वागत केले.

# आशा स्वयंसेविकांसह गट प्रवर्तकांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा द्या

■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती, दि. ३१ :** अमरावती आशा व गटप्रवर्तक यांच्या विविध प्रलंबित मागण्या शासन स्तरावर अजूनही प्रलंबित आहेत. दिवाळी जवळ आली असून शासनाने आशा, गट प्रवर्तकांना दिवाळी भाऊबीज म्हणून मागण्या पूर्ण कराव्या, अशी मागणी केली आहे. आयटकचा निर्धार मेळावा शिंगणापूर येथील काळा मारोती मंदिर सभागृहात घेण्यात आला. या वेळी मंगला बावनेर, प्रफुल्ल देशमुख यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी शेकडो आशा व गटप्रवर्तक महिलांनी आपल्या भावना व्यक्त करत आंदोलनांना उजाळा दिला. आशा व गट प्रवर्तकांनी वर्षभर रस्त्यांवर उतरून आंदोलन केले. ऊन, वारा, पाऊस सहन केला. शासनाने परीक्षा पाहिली. मात्र, यादरम्यान तीन महिने संप करून विजय मिळवला आहे. आशांना हजार व गट प्रवर्तकांना १० हजार रुपये वाढ व दीपावली सानुग्रह अनुदान व गट प्रवर्तकांना कंत्राटी कर्मचारी दर्जा देण्याचे लेखी आश्वासन आरोग्यमंत्र्यांनी दिले होते. मात्र, ते पूर्ण पाळले नाही व ५ हजार रुपये वाढ केली. परंतु, उर्वरित



मागण्या प्रलंबित आहेत. शासनाने पासून आशा, गट प्रवर्तकांना एक रुपयाही वाढ दिलेली नाही. त्यामुळे केंद्र सरकार विरोधात तीव्र लढा उभारण्याचा निर्धार मेळाव्यात केला आहे. गटप्रवर्तक यांना कंत्राटी कर्मचाऱ्याप्रमाणे नियुक्ती देऊन राष्ट्रीय आरोग्य अभियानात समायोजन करण्याची मागणी केली. मागणी मान्य न केल्यास राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा आशा, गट प्रवर्तकांनी दिला. या मेळाव्याचे प्रास्ताविक सत्यभामा पिंजरकर यांनी केले. सूत्रसंचालन सीमा गुरटे यांनी केले, तर आभार पद्मा माहुलकर यांनी मानले. या वेळी दीपिका यावतकर, संध्या तेलखडे, सुनीता ठाकरे, संगीता वानखेडे, अर्चना सातपुते, संगीता वानखेडे, साधना बोरकर. रत्नमाला पुंडकर, अर्चना बूब, रेखा गावंडे, मंगला सांबसकर, शोभा शर्मा, वंदना भगत यांच्यासह शेकडो आशा गट प्रवर्तक महिला उपस्थित होत्या.

# पोलिसांच्या रूटमार्चने वेधले लक्ष



■ महासागर प्रतिनिधी,

**ढाणकी , दि. ३१:** सध्या विधानसभेच्या सार्वत्रीक निवडणुकीची धामधुम सुरू आहे. या पार्श्वभुमीवर निवडणुका येथोचित व सुरळीत पार पाडण्यासाठी पोलिस स्टेशन बिटरगावचे ठाणेदार संतोष मनवर यांच्या नेतृत्वात ढाणकीतील मुख्य रस्त्याने रुटमार्च काढण्यात आला. दि.२८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता पोलिस रूटमार्चचे आयोजन करण्यात आले होते. शिस्तबद्ध पोलिस परेडमुळे लोकांचे लक्ष या पोलिस कर्मचाऱ्यांनी वेधून घेतले होते. २० नोव्हेंबर रोजी महाराष्ट्रात २८८ जागेसाठी मतदान होणार आहे. या निवडणूक काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये. सार्वत्रिक निवडणुकीच्या काळात आदर्श आचारसंहितेचा भंग होवू नये यासाठी पोलिस प्रशासन ॲक्शन मोडवर आहे.

पोलिसांचा जरब राहावा या हेतूने उमरखेड उपविभागीय पोलिस अधिकारी हनुमंत गायकवाड यांच्या निर्देषानुसार ढाणकीतील मुख्य रस्त्याने पोलिस रूटमार्चचे आयोजन करण्यात आले होते. या पोलिस रूटमार्चमध्ये दंगल नियंत्रक पथकातील मोठ्या फौज फाट्यासह पोलिस स्टेशन बिटरगावचे ठाणेदार संतोष मनवर, पोलिस उपनिरीक्षक शिवाजीराव टिपूर्णे, बिट जमादार खरात, निलेश भालेराव, रवी गिते, दत्ता कुसराम आदी पोलिस कर्मचारी रूटमार्च मध्ये सहभागी होते.

# कृत्रिम लक्षवेधी तोरण, माळांनी सजला बाजार

■ महासागर प्रतिनिधी,

**यवतमाळ , दि. ३१ :** दिवाळीनिमित्त गृहसजावटीला मुख्य प्रवेशद्वारापासून सुरुवात होते. सण-उत्सवांन घराच्या दरवाजावर आंब्याच्या पानांचे तोरण बांधले जाते. मात्र, आता सगळीकडे सिमेंटचे जंगल वाढल्याने शहरातून आंब्याची झाडे हद्दपार झाली आहेत. अर्थात, आता घराच्या सजावटीसाठी कापडी, प्लास्टिक, क्रिस्टलच्या फुलांचे तोरण बांधण्याची सवय पडली आहे.



पूर्वी दिवाळी व इतर सणाला घरांमध्ये झेंडूची फुले आणून हमखास घरच्या घरी तोरण तयार करण्यात येत असत. पण आता या खऱ्या फुलांची जागा बऱ्यापैकी नकली आणि चायनीज तोरणांनी घेतली आहे.

साधारण ६० रुपयांपासून २५० रुपयांपर्यंत ही तोरण उपलब्ध आहेत. बाजारात क्रिस्टल तोरण दुरून चमकते व समोरच्या व्यक्तीचे मन मोहून टाकते. विविध रंगात असलेले क्रिस्टल तोरणावर कॉपरचे लटकते मोती लावलेले असतात.

त्यामुळे ते अधिक सुंदर व आकर्षक वाटतात. लाकडावर आंब्याच्या पानाच्या आकारात गणपती असे तोरण ही असते. बाजारात अशा तोरणांना मोठी मागणी आहे.

पिवळ्या माळांचा लूक कापड व प्लास्टिक फ्लॉवरच्या तोरणात पिवळ्या - नारंगी झेंडूच्या फुलांच्या माळा, प्लास्टिकची आंब्याची पाने असल्याने नॅचरल लुक या तोरणाला आलेला असतो.

स्वस्तिक व ओमच्या आकारात असलेल्या पताकांमुळे हे तोरण अधिक आकर्षक दिसते.

# पाच मतदारसंघात मविआ तर दोन जागी महायुतीला बंडखोरांची भिती

■ महासागर प्रतिनिधी,

**यवतमाळ , दि. ३१ :** विधानसभा निवडणुकांची घोषणा झाल्यापासून तर निवडणुकीसाठी नामांकन दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत तडजोडी करीत शेवटच्या क्षणी उमेदवारी जाहीर केल्यानंतरही महायुती आणि महाविकास आघाडीला जिल्ह्यातील सात पैकी तब्बल सहा विधानसभा मतदारसंघात बंडखोरी रोखण्यात यश आलेले नसल्याचे आजच्या नामांकन अर्जांवरुन दिसत आहे. असे असले तरी अद्यापही बंडखोरांची मनधरणी करण्यासाठी पाच दिवसांचा कालावधी असल्याने त्यानंतर अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी लढतीचे चीत्र स्पष्ट होणार आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी नामांकन अर्ज दाखल करण्याचा मंगळवारी दि. २४ ऑक्टोबर हा शेवटचा दिवस होता. या कालावधीमध्ये जिल्ह्यातील सर्व सातही विधानसभा मतदारसंघात एकूण नामांकन अर्ज दाखल करण्यात आले आहेत. त्यात सर्वाधीक अर्ज यवतमाळ विधानसभेत तर सर्वात कमी अर्ज वणी विधानसभा मतदारसंघात भरण्यात यवतमाळ ५० पुसद २४ उमरखेड ५८ वणी २६ राळेगाव २४ दिग्रस ३१ आर्णी ३७ एकूण २६० आल्याचे दिसत आहे. या नामांकन अर्जानंतर जवळपास सर्व




सातही विधानसभा मतदारसंघातील लढतीचे चीत्र काही प्रमाणात स्पष्ट झाले असले तरी दिग्रस विधानसभा वगळता उर्वरीत यवतमाळ, राळेगाव, वणी, आर्णी, उमरखेड आणि पुसद या सर्व सहा विधानसभा मतदारसंघात बंडखोरांनी आव्हाण उभे केले आहे. त्यात यवतमाळ विधानसभा मतदारसंघात महायुतीचे मदन येरावार आणि महाविकास आघाडीचे बाळासाहेब मांगुळकर मैदानात असून महायुतीच्या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे संदीप बाजोरीया यांनी अर्ज दाखल करुन बंडखोरी केली आहे. राळेगाव विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीची उमेदवारी मागणाऱ्या किरण कुमरे यांनी बंडखोरी करीत वंचीतला हात देत उमेदवारी दाखल केली. वणी विधानसभेत महाविकास आघाडीच्या उमेदवारीची प्रतिक्षा करणाऱ्या काँग्रेसच्या संजय खाडे यांनी उमेदवारी उबाठा गटाला दिल्याने उर्वरित,

शेवटच्या दिवशी १३७ नामांकन दाखल नामांकन अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या एकाच दिवसात १३७ नामांकन अर्ज दाखल झाले.

त्यामध्ये उमरखेड विधानसभेत ३२ नामांकन अर्ज दाखल झाले. याप्रमाणे दिग्रस विधानसभेत १७, यवतमाळमध्ये १७, आर्णीमध्ये १५, वणीमध्ये ५, पुसदमध्ये २२ तर राळेगाव विधानसभा मतदारसंघात २४ नामांकन अर्ज आज दाखल करण्यात आले. एकाच दिवशी मोठ्या संखेने नामांकन अर्ज दाखल झाल्याने दाखल झालेल्या नामांकन अर्जांचा आकडा वाढला आहे.

# दर्यापुरात निराधार, वृद्धांना धान्य-किराणवाटप

## दीनदुबळ्यांच्या चेहऱ्यावर फुलवला आनंद

■ महासागर प्रतिनिधी,

**दर्यापूर , दि. ३१ :** संत गाडगेबाबा यांच्या कृतीशील सेवेचा आदर्श घेत दीपावलीच्या पावन पर्वावर दर्यापूर येथे निराधार गोरगरीब अपंग, वृद्ध, गरजूंना संपूर्ण धान्य किराणा किटचे निःशुल्क वितरण करण्यात आले.

येथील कौशल्यादेवी जगन्नाथ मालपाणी चॅरिटेबल ट्रस्टतर्फे या सामाजिक संस्थेने कार्यक्रमाचे आयोजन केले होते.



कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबा व जगन्नाथशेठ मालपाणी यांच्या प्रतिमेचे पूजन दीप प्रज्वलनाने झाली. श्री गाडगे महाराज मिशन मुंबईचे उपाध्यक्ष तथा नागरवाडी येथील इंद्रभुवनचे शिल्पकार बापूसाहेब देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या कार्यक्रमाला कौशल्यादेवी जगन्नाथ मालपाणी चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष रामूसेठ मालपाणी, जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष तथा संचालक सुधाकर पाटील भारसाकळे, बाळासाहेब हिंगणीकर, समाज प्रबोधनकार संदीपपाल महाराज, रामपाल महाराज व मित्रपरिवाराचे सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते.

यंदाही गोरगरीब, दीनदुबळ्यांची दिवाळी गोड व्हावी, या हेतूने सेवाभावी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमादरम्यान बापूसाहेब देशमुख व सहकारी यांनी हरिनामाचा गजर करत उपस्थितांना व्यसनमुक्तीचा संदेश दिला.

त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गरजूंना धान्य किराणा किटचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मधुकर पाचे यांनी केले, तर आभार नामदेवराव उटाळे यांनी मानले.

याप्रसंगी गजानन देशमुख, प्रशांत देशमुख, सागर देशमुख, प्रकाश महात्मे, कौशल्यादेवी मालपाणी, शारदादेवी मालपाणी आदींसह कौशल्यादेवी चॅरिटेबल ट्रस्टचे सर्व सदस्य तथा दर्यापूर येथील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमासाठी श्यामशेठ मालपाणी, इंजिनिअर रेवस्कर, नंदूशेठ सोमानी, बल्लू लोथे, कन्हैया बुंदेले, नितेश वानखडे आदींचे सहकार्य लाभले.

# कुंभार समाजातील गुणवंतांचा सत्कार संपन्न

■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती, दि. ३१:** कुंभार समाजातील गुणवंत विद्यार्थी, खेळाडू, राजकीय प्रतिनिधी, व्यवसायी, उद्योजक इ.गुणवान व्यक्तींना समाज गौरव, समाज भूषण पुरस्काराने स्मृतिचिन्ह, सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र,शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन समाजातील मान्यवर व्यक्तींच्याहस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुंभार समाजाचे अध्यक्ष श्री सुधाकर शेंडोकार, उपाध्यक्ष ॲड गजाननराव तांबटकर, सचिव सुरेन्द्र सरोदे,समाजोन्नती समितीचे अध्यक्ष श्री पंजाबराव काकडे, सचिव डॉ श्रीरामजी कोल्हे, महिला अध्यक्षा श्रीमती प्रभाताई भागवत,गोरोबा काका पतसंस्थेचे अध्यक्ष श्री भगवानजी जामकर, सचिव श्री अरुणराव पोहनकर, माजी अध्यक्ष श्री देविदास धामणकर, श्री देविदासजी काळकर, डॉ संजय साळविकर, श्री रमेशराव,तांबट, बेंगलोर, श्री केशवराव मदनकर, दयापूर येथील सुप्रसिद्ध उद्योजक श्री अरुणभाऊ चोंडके उपस्थित होते.

।श्री संत गोरोबा काका प्रवेशद्वार झाल्याचा आनंद।

अमरावतीच्या माजी खासदार यांच्या विकास निधीतून मंजूर संत गोरोबा काका प्रवेशद्वार आज साकार झाले. गेल्या अनेक वर्षांपासूनची



कुंभार समाजाची मागणी पूर्ण केल्या बद्दल श्री सुधाकर शेंडोकार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात आनंद व्यक्त करून आभार मानले. यावेळी त्यांनी गोरोबा भवनाच्या बांधकामासाठी निधी, मंदिरासमोर सिमेंट रोड व प्रवेशव्दाराजवळ बस स्टॉप निर्मितीची मागणी केली.

**समाज गौरव, समाज भूषण पुरस्काराने सन्मानीत**

सुप्रसिद्ध उद्योजक अरुणभाऊ चोंडके, रामचंद्र कापडे, दशरथ मानकर,सौ.दुर्गाताई लोंदे, मारोती तांबट,संतोष सरोदे, , किशोर तळोकार यांना समाज गौरव तर सेवानिवृत्त सैनिक श्री व्यंकटेश वाघ यांना समाज भूषण तसेच स्व.केशव खोपे कारंजा लाड यांना मरणोत्तर समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**समाज भवनाच्या बांधकामासाठी देणगी**

समाजातील दानशूर व्यक्ती श्री केशव मदनकर यांनी गोरोबा भवन बांधकामासाठी वडिल स्व.श्री रामकृष्णाजी मदनकर यांचे स्मृतीप्रीत्यर्थ रु.१०११११/- धनादेश संस्थेचे कोषाध्यक्ष श्री सतिश गावंडे यांचे सुपुर्द केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव श्री सुरेन्द्र सरोदे केले, आपल्या भाषणात त्यांनी संस्थेचा पूर्व इतिहास तसेच भविष्यातील योजना याबद्दल माहिती दिली.कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन प्रा.सुरेश नांदुरकर व प्रतिभा चांदुरकर तर आभार संस्थेचे उपाध्यक्ष ॲड गजानन तांबटकर यांनी मानले.

# सिंदखेड राजामध्ये एबी फॉर्मचे महानाट्य; शिवसेना-अजितपवार गट समोरासमोर

**सिंदखेड राजा: शिंदे सेनेचे शशिकांत खेडेकर यांचा अर्ज ) सिंदखेड राजा अजितदादा गटाचा अर्ज दाखल**

■ महासागर प्रतिनिधी,

**बुलढाणा, दि. १३ :** महायुतीमधील सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघाच्या उमेदवारीचा तिढा सोमवारी रात्री उशिरा सुटल्याचे चित्र समोर आले होते. राष्ट्रवादी अजित पवार गटासोबत झालेल्या कथित चर्चेअंती शिंदे गटाने माजी आमदार शशिकांत खेडेकर यांना एबी फॉर्म दिला. यामुळे सिंदखेड राजा मतदारसंघातील युतीचा जागा वाटपाचा तिढा सुटला असल्याची चर्चा रंगली असतानाच आज शिंदे सेनेच्या उमेदवारासह राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गटा)च्या उमेदवारानेही आपापल्या पक्षांच्या एबी फॉर्मसह अर्ज भरल्याने मोठाच राजकीय गोंधळ उडाला.

महायुतीमधील या एबी फॉर्मच्या महानाट्यामुळे सिंदखेड राजात आता शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन्ही पक्ष एकमेकांसमोर उभे ठाकले असून महायुतीत महा पेच तयार झाला आहे. आता यापैकी कोणता मित्र माघार घेतो याकडे राजकीय वर्तुळासह मतदारांचे लक्ष लागले आहे.



आज शिवसेना शिंदे गटाच्या वतीने माजी आमदार शशिकांत खेडेकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गटातर्फे काँग्रेसचे युवा नेते मनोज कायंदे यांनी अगदी आपापल्या पक्षाच्या एबी फॉर्म उमेदवारी अर्ज भरले. वाजतगाजत आणि बऱ्यापैकी शक्ती प्रदर्शन करून दोन्ही मित्र पक्षातर्फे अर्ज दाखल करण्यात आले आहे . यामुळे युतीतील तिढा सुटला अशी काल रात्रीची स्थिती असताना तिढा अधिकच गुंतागुंतीचा झाला असे चित्र आज दिवसा दिसून आले. आज मंगळवारी, उमेदवारी अर्ज भरण्याच्या अंतिम दिवशी हे एबी फॉर्म नाट्य रंगले आणि त्याने युतीच्या वर्तुळात एकच खळबळ उडाली.याचे पडसाद आता मुंबई ते बारामती पर्यंत उमटण्याची पुरेपूर शक्यता आहे.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **SHUBHANGI HEMANT DHATARK.** NOW MY NEW NAME IS **SHUBHANGI HEMANT DHATRAK.**
**ADD :** PLOT NO.122/2 MITRA NAGAR, MANEWADA ROAD, BHAGWAN NAGAR, NAGPUR - 440027

MY OLD NAME WAS **ZAINAB BADRUDDIN KHAN.** NOW MY NEW NAME IS **ZAINAB MOHD BADRUDDIN KHAN.**
**ADD :** 71, VENUVAN SOCIETY KATOL ROAD NAGPUR 440013

MY OLD NAME WAS **BAADRUDDIN KHAN.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMED BADRUDDIN KHAN.**
**ADD :** 71, VENUVAN SOCIETY KATOLROAD NAGPUR 440013

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# 'मिर्झापूर' आता चित्रपट रूपात

ओटीटी प्लॅटफॉर्मवरील लोकप्रिय मालिका मिर्झापूरचे ३ यशस्वी सीझन झाले आहेत. आता या मालिकेच्या चाहत्यांसाठी निर्मात्यांनी एक मोठी भेट आणली आहे. एक्सेल मूव्हीजने मिर्झापूरची अधिकृत घोषणा करणारा एक घोषणा टीझर रिलीज केला आहे. आगामी चित्रपटात मुन्ना भैय्या ऊर्फ दिव्येंदू शर्माचे पुनरागमनदेखील निश्चित झाले आहे. हे पात्र मालिकेतून काढून टाकण्यात आले होते. एक्सेल मूव्ही प्रॉडक्शन हाऊसने नुकतीच मिर्झापूर या चित्रपटाची घोषणा केली. मिर्झापूर हा चित्रपट लवकरच येत आहे. घोषणेसोबतच निर्मात्यांनी एक टीझरदेखील जारी केला, ज्यामध्ये कालिन भैया उर्फ पंकज त्रिपाठी म्हणत



आहेत, 'तुम्हाला गादी, आदर, शक्ती, नियंत्रणाचे महत्त्व माहिती आहे. तुम्हीही मिर्झापूरला तुमच्या गादीवर बसलेले पाहिलं असेल, पण यावेळी तुम्ही गादीवरून उठला नाही तर धोका असेल. यावर गुड्डू भैया उर्फ अली फजल म्हणतो, 'तुझं म्हणणं बरोबर आहे कालीन भैया, रिस्क घेणं हा आमचा यूएसपी आहे, आता काहीही झालं तरी सारा खेळ बदलला आहे. आता काय, आता मिर्झापूर तुझ्याकडे येणार नाही, तुला मिर्झापूरला यावे लागेल. रिलीज झालेल्या टीझरनुसार, मिर्झापूर चित्रपटात मालिकेतील महत्त्वाचे पात्र मुन्ना भैय्याचे पुनरागमनदेखील दिसेल, ज्याची भूमिका दिव्येंदूने साकारली होती. मालिकेच्या दुसऱ्या सीझनमध्ये त्याची व्यक्तिरेखा मारली गेली. अभिषेक बॅनर्जी, कंपाउंडरची भूमिका साकारत आहे, ज्याचे पात्र पहिल्या सीझनमध्ये मारले गेले होते, तोदेखील चित्रपटात पुनरागमन करणार आहे. प्रदर्शित झालेल्या टीझरमध्ये दिव्येंदूच्या भूमिकेत मुन्ना भैया म्हणत होता की, 'आम्ही हिंदी चित्रपटांचे खलनायक आहोत आणि हिंदी चित्रपट फक्त थिएटरमध्येच बघितले जातात. आम्ही अमर आहोत आणि आता इथून मिर्झापूरच्या गादीवर राज्य करू, असे ते म्हणाले होते. धार तीक्ष्ण आहे, कंपाउंडर नाही का? घोषणेनुसार मिर्झापूर हा चित्रपट २०२६ मध्ये मोठ्या पडद्यावर प्रदर्शित होणार आहे. एक्सेल मूव्हीच्या बॅनरखाली रितेश सिधवानी आणि फरहान अख्तर यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे. गुरमीत सिंग या चित्रपटाचे दिग्दर्शन करणार आहेत. ही घोषणा झाल्यापासून मिर्झापूर गुगल आणि सोशल मीडिया साइटवर ट्रेंड करत आहे. गेल्या अनेक आठवड्यांपासून मिर्झापूर चर्चेत नव्हते, मात्र, या चित्रपटाच्या घोषणेने चाहत्यांची आवडती व्यक्तिरेखा पुन्हा पाहण्याची उत्सुकता वाढली आहे.




# अॅडव्हेंचरस हिना!



अभिनेत्री हिना खानला स्तनाचा कर्करोग झाला आहे. गेल्या अनेक आठवड्यांपासून तिच्या तिसऱ्या स्टेजच्या कॅन्सरवर उपचार सुरू आहेत, मात्र यादरम्यान अभिनेत्री तिचे सर्व छंद पूर्ण करत आहे. काही काळापूर्वी रॅम्प वॉक केल्यानंतर हिना आता तिच्या ऍडव्हेंचर सहलीसाठी चर्चेत आहे. तिच्या अलीकडील सुट्टीत, अभिनेत्रीने स्कूबा डायव्हिंग, घोडेस्वारीसह अनेक साहसी क्रियाकलाप केले आहेत, ज्याचे फोटो आणि व्हिडिओ व्हायरल होत आहेत. मात्र, हिनाला धोकादायक कृत्ये करताना पाहून तिचे चाहते खूपच चिंतेत आहेत. नुकतेच हिना खानने तिच्या व्हेकेशनचे फोटो आणि व्हिडिओ शेअर केले आहेत. नुकताच स्कूबा डायव्हिंगचा एक व्हिडिओ शेअर करताना हिनाने लिहिले आहे की, मला माहित नाही की जास्त ड्रायव्हिंग काय आहे, या बेटाचे सौंदर्य किंवा साहसासाठी माझे स्वतःचे अमिट प्रेम. ते जे काही आहे, ते त्याचे मूल्य आहे. हे फोटो समोर आल्यानंतर अनेक यूजर्स हिना खानच्या धाडसाचे कौतुक करत आहेत, तर अनेक यूजर्स तिच्यासाठी चिंतेत आहेत. एका यूजरने तिच्या व्हिडिओमध्ये लिहिले की, प्रिय हिना, आम्हाला माहित आहे की तू मजबूत आहेस, परंतु कृपया वॉटर स्पोर्ट्सपासून दूर राहा. स्वतःची काळजी घ्या. हिना खानने १ ऑक्टोबर रोजी सेवा सहस कल्चर सेलिब्रेशनमध्ये रॅम्प वॉक केला होता. यावेळी त्यांना कॅन्सर सर्व्हायव्हर सोनाली बेंद्रे आणि ताहिरा कश्यप यांचा आधार मिळाला. यावेळी कार्तिक आर्यन, जो त्याच्या 'भूल भुलैया ३' या चित्रपटाचे प्रमोशन करत होता, तो देखील या कार्यक्रमाचा एक भाग बनला होता. कार्यक्रमादरम्यान हिना खान कार्तिक आर्यनला भेटण्यासाठी आली होती, त्याच क्षणी तिचा तोल गेला, त्यामुळे ती पडून थोडक्यात बचावली. तिचा तोल ढासळत असल्याचे पाहून कार्तिक आर्यनने तिला साथ दिली. जेव्हा हा व्हिडिओ व्हायरल झाला तेव्हा चाहते कार्तिकचे खूप कौतुक करत होते. हिना खानने तिच्या स्तनाच्या कर्करोगाच्या निदानाची माहिती सोशल मीडियाच्या माध्यमातून दिली होती. केमोथेरपीमुळे त्यांचे केस गळत होते, त्यामुळे तिचे केसही कापले गेले.

# 'करण अर्जुन' परतणार मोठ्या पडद्यावर

बॉलिवूडचा सुपरस्टार सलमान खान आणि शाहरूख खान यांचा सुपरहिट सिनेमा 'करण अर्जुन' तब्बल ३० वर्षांनी पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी तयार आहे. सलमान खान याने सोशल मीडियावर याची घोषणा केली असून चित्रपटाचा टिझर सुद्धा शेअर केलाय. पुढील महिन्यात प्रेक्षकांना हा सिनेमा चित्रपट गृहांमध्ये पाहता येणार आहे. सलमान खानने आपल्या पोस्टमध्ये लिहिले की, 'राखी जी यांनी खरं सांगितलं होतं की 'मेरे करण अर्जुन आएंगे'. हा चित्रपट जगभरातील चित्रपट गृहांमध्ये री-रिलीज होण्यासाठी तयार आहे'. 'करण अर्जुन' हा एक कल्ट क्लासिक चित्रपट असून याची कहाणी ही करण (सलमान खान) आणि अर्जुन (शाहरुख खान) यांच्या भोवती फिरते. हे दोघे आपल्या आईची रक्षा करताना ठाकूर संग्राम सिंह सोबत लढाई करतात आणि त्यात मारले जातात. त्यांच्या मृत्यूनंतर आईला आश्वासन देण्यात येते की तिचे करण अर्जुन परत येतील. चित्रपटात त्यांचा पुनर्जन्म होऊन त्यांना गावाच्या दिशेने जाताना दाखवले आहे, जिथे त्यांची आई आपल्या दोन्ही मुलांची वाट वाट पाहत असते. या चित्रपटात अभिनेत्री काजोल आणि ममता कुलकर्णी या देखील मुख्य भूमिकेत आहेत. ३० वर्षांनी 'करण अर्जुन' हा चित्रपट री रिलीज होणार असल्याने यावर अभिनेता हृतिक रोशन याने आनंद व्यक्त केला आहे. हृतिकने वडील राकेश रोशन यांच्यासोबत 'करण अर्जुन' या चित्रपटात काम केले होते. करण अर्जुन पुन्हा चित्रपटगृहांमध्ये दाखल होण्यासाठी आता सज्ज झाला आहे. चित्रपट गृहात येऊन सिनेमाचा अनुभव घ्यावा असे आव्हान त्याने प्रेक्षकांना केलंय.



# प्रदर्शनापूर्वीच बॉक्स ऑफिसवर दमदार कमाई

अभिनेता कार्तिक आर्यन यंदाच्या दिवाळीत रुह बाबा या भूमिकेतून चाहत्यांचं मनोरंजन करणार आहे. सिनेमाच्या पहिल्या दोन भागांना प्रेक्षकांचं भरभरुन मनोरंजन केलं. आता तिसऱ्या भागाच्या प्रतीक्षेत चाहते आहेत. 'भूल भुलैय्या ३' सिनेमात कार्तिक आर्यन याच्यासोबत अभिनेत्री विद्या बालन, माधुरी दीक्षित आणि तृप्ती डिमरी देखील मुख्य भूमिकेत दिसणार आहे. सिनेमाचा ट्रेलर आणि गाणी प्रदर्शित झाल्यानंतर चाहते सिनेमाच्या प्रतीक्षेत आहे. सिनेमा १ नोव्हेंबर रोजी प्रदर्शित होणार आहे. 'भूल भुलैय्या ३' सिनेमा प्रदर्शित होण्यापूर्वीच अॅडव्हान्स बुकिंमध्ये सिनेमाच्या २८ हजारांपेक्षा जास्त तिकिटांची विक्री झाल्याची माहिती समोर येत आहे. १ नोव्हेंबर रोजी 'भूल भुलैय्या ३' आणि अभिनेता अजय देवगन स्टारार 'सिंघम अगेन' देखील प्रदर्शित होणार आहे. त्यामुळे दोन्ही सिनेमांमध्ये काटे की टक्कर पाहायला मिळणार आहे. म्हणजे सिनेमाने प्रदर्शनापूर्वीच ७१.५६ लाख रुपयांचा गल्ला जमा केला आहे. त्यामुळे सिनेमा प्रदर्शित झाल्यानंतर किती कोटी रुपयांपर्यंत मजल मारेल पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. सांगायचं झालं तर, 'भूल भुलैय्या ३' सिनेमाची अॅडव्हान्स बुकिंग सुरु झाली आहे. सध्या चित्रपटाचा प्री-सेल सुरू आहे. पीव्हीआर आणि सिनेपोलीसमध्ये अद्याप तिकिटांची विक्री सुरु झालेली नाही. रिपोर्टनुसार, बुक माय शोवर एका तासात १.२ हजार पेक्षा जास्त तिकिटं विकण्यात यश आलं आहे. सांगायचं झालं तर, 'भूल भुलैय्या ३' आणि 'सिंघम अगेन' दोन्ही सिनेमांमध्ये तगडी स्टार कास्ट आहे. त्यामुळे बॉक्स ऑफिस कोणता सिनेमा बाजी मारेल पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. पण दोन्ही सिनेमांमध्ये 'भूल भुलैय्या ३' सिनेमा बॉक्स ऑफिसवर तगडी कमाई करु शकतो अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. 'भूल भुलैय्या ३' सिनेमात कार्तिक आर्यन, तृप्ती डिमरी, माधुरी दीक्षित, विद्या बालन, राजपाल यादव, संजय मिश्रा आणि विजय राज मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. सिनेमाचं बजेट १५० कोटी रुपये आहे. तर 'सिंघम अगेन' सिनेमात अजय देवगन, अक्षय कुमार, अर्जुन कपूर, टायगर श्रॉफ, दीपिका पादुकोण यांसारखे तगडे सेलिब्रिटी आहे. त्यामुळे दोन्ही सिनेमे प्रदर्शित झाल्यानंतर कोणत्या सिनेमाला प्रेक्षकांचं अधिक प्रेम मिळेल पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.




# येणार 'सीआयडी सीझन २'

टीव्ही इंडस्ट्रीची 'सीआयडी' ही लोकप्रिय मालिका पुन्हा एकदा प्रेक्षकांना खिळवून ठेवण्यासाठी येत आहे. ही मालिका गेल्या अनेक वर्षांपासून प्रेक्षकांची मने जिंकत आहे. आता सहा वर्षांनंतर मालिकेचा नवा सिझन येत आहे. वाहिनीने डिसेंबरच्या मध्यात पहिला भाग प्रसारित करण्याचा निर्णय घेतला आहे. या सीझनमध्ये सुमारे ६० एपिसोड बनवले जातील. हे एपिसोड दर आठवड्याला दोनदा, शनिवार आणि रविवारी प्रसारित केले जातील. शूटिंगदरम्यान टीम मुंबईतील विशिष्ट ठिकाणे, उद्याने आणि बाजारपेठांमध्ये चित्रीकरण करणार आहे. यावेळी शोमध्ये नवीन पात्र, नवीन कथा आणि मनोरंजक ट्विस्ट असतील. प्रेक्षकांचे दुप्पट मनोरंजन करणे, असा निर्मात्यांचा हेतू आहे. नवीन सीझनच्या कथेमध्ये अभिजीत (आदित्य श्रीवास्तव) आणि दया (दयानंद शेट्टी), जे आधी चांगले मित्र होते, ते आता एकमेकांचे कट्टर शत्रू झाले आहेत. नव्या प्रोमोनुसार, एकेकाळी अतूट असणारा त्यांच्यातील बंध आता तुटला आहे. सीआयडीचा पायाच डळमळीत झाला आहे. एसीपी प्रद्युम्न (शिवाजी साटम) देखील एका नव्या अंदाजामध्ये प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. सोनी टीव्हीवर १९९८ मध्ये सीआयडी ही मालिका सुरू झाली आणि २०१८ पर्यंत ही मालिका चालू होती. या शोने केवळ प्रेक्षकांची मने जिंकली नाहीत तर एका पंथ मालिकेचा दर्जाही मिळवला. एसीपी प्रद्युम्न आणि दया ही व्यक्तिरेखा आजही लोकांमध्ये लोकप्रिय आहेत.




# झी मराठीवर सुरू होणार हॉरर मालिका

झी मराठी वाहिनी लवकरच नवीन मराठी हॉरर मालिका तुला जपणार आहे प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. या मालिकेचा प्रोमो प्रदर्शित झाला असून त्यात एका आई आणि तिच्या मुलीची कहाणी असल्याचे दिसून येते. प्रोमोने प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला पोहोचवली आहे. आहट, मानो या ना मानो, या एकेकाळच्या गाजलेल्या हॉरर हिंदी मालिका. आता तर आहट हे मराठीमधून प्रेक्षकांना पाहाता येणार आहे. कारण हॉरर मालिका कोणाला बघायला नाही आवडतं. त्यात जर ती मराठी असेल तर मग बातच काही ओर असते. 'रात्रीस खेळ चाले', 'ती परत आलीये' किंवा 'सातव्या मुलीची सातवी मुलगी' या मालिकांना चाहत्यांकडून प्रेम मिळाल्यानंतर आता आणखी एक नवीन हॉरर मालिका प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. ही मालिका म्हणजे प्रेक्षकांसाठी झी मराठीकडून दिवाळी गिफ्टच असणार आहे. झी मराठीवर ही मालिका प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. 'तुला जपणार आहे' असं या मालिकेचं नाव आहे. दिसत नसली तरीही असणार आहेतुला जपणार आहे असं या मालिकेच्या प्रोमोमध्ये म्हटलं गेलं आहे. झी मराठीच्या ऑफिशियल सोशल मीडिया अकाऊंटवरुन या नव्या मालिकेचा पहिला प्रोमो शेअर करण्यात आला आहे. प्रोमो पाहून नक्कीच या मालिकेच्या कथेचा अंदाज येतो. प्रोमो पाहिल्यानंतर प्रेक्षकांची उत्सुकता अजून शिगेला पोहोचली आहे. प्रोमोमध्ये जंगलातील एका वाड्यात एक लहान मुलगी आणि एक साडी नेसलेली बाई दिसत आहे. एका आरश्यासमोर त्या दोघीही उभ असल्याचं प्रोमोमध्ये पाहायला मिळत आहे. त्यामुळे कदाचित ही एका आई आणि तिच्या लहान लेकीची गोष्ट असल्याचे लक्षात येते. या मालिकेतील पात्र आणि या मालिकेची वेळ अजून गुलदस्त्यातच आहे. तसेच या नवीन मालिका येणार म्हटल्यावर सुरु असलेल्या मालिकांपैकी कोणती मालिका बंद होणार याबद्दलही प्रेक्षकांच्या मनात उत्सुकता आहे. तसेच या मालिकाचा प्रोमोसुद्धा बऱ्यापैकी चर्चेत आहे. प्रोमोमध्ये असलेले म्युझिक आणि व्हिडीओमुळे या मालिकेबद्दल नवनवीन अंदाज बांधले जात आहेत. सध्या अनेक नव्या मालिका प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. अलिकडेच झी मराठी वाहिनीवर 'सावळ्याची जणू सावली' ही मालिका सुरू झाली. त्यानंतर 'लक्ष्मी निवास' ही नवी मालिकाही लवकरच सुरू होणार आहे. अशातच झी मराठीने चाहत्यांसाठी हे आणखी एक सरप्राइज आणलं आहे. त्यामुळे या मालिकेबद्दल नक्कीच प्रेक्षकांना उत्सुकता आहे. अनेकांनी प्रोमोवर कमेंट करत मालिका पाहण्यासाठी उत्सुक असल्याचे सांगितले.






## जागा उबाठाला, काँग्रेसचे राजेंद्र मुळक मैदानात

# रामटेकमध्ये आघाडीत बिघाडी?

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ३० :**
रामटेक विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तसेच माजी अर्थ राज्यमंत्री राजेंद्र मुळक यांनी बंडाचे निशान फडकावले आहे. त्यामुळे आघाडीत बिघाडीचे संकेत असून उबाठाची चिंता वाढली आहे.




रामटेक विधानसभा मतदारसंघातून राजेंद्र मुळक यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. मुळक यांच्या रॅलीत रामटेक लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस खासदार श्यामकुमार बर्वे, माजी मंत्री सुनील केदार, रश्मी बर्वे यांच्यासह काँग्रेसचे अनेक नेते व कार्यकर्ते उपस्थित होते.

रामटेक विधानसभा मतदारसंघावर काँग्रेसने दावा केला होता. मात्र, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने रामटेक सोडण्यास नकार दिला. हा मतदारसंघ सोडावा व राजेंद्र मुळक यांना उमेदवारी द्यावी यासाठी शेवटपर्यंत नेत्यांच्या वाटाघाटी सुरू होत्या. परंतु, काँग्रेसला यात यश आले नाही. शेवटी राजेंद्र मुळक यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. खासदार बर्वे हे जिल्ह्याचे काँग्रेस नेते व माजी मंत्री सुनील केदार यांचे कट्टर समर्थक आहेत. हे बघता रामटेकमध्ये काँग्रेसने उद्धव ठाकरे सेनेचे उमेदवार विशाल बरबटे यांच्या विरोधात बंड पुकारल्याची चर्चा आहे.

रामटेकची जागा शिवसेनेकडे गेल्यावर राजेंद्र मुळक व सुनील केदार यांनी उद्धव ठाकरे यांची भेट घेतली होती. शिवसेनेची जागा काँग्रेसला द्यावी अशी मागणी करण्यात आली. ठाकरेंना अनेकदा विनंतीही करण्यात आली. शिवसेना आणि काँग्रेसमध्ये वाटाघाटी सुरू असताना मुळक यांच्या उमेदवारीसाठी उद्धव ठाकरे राजी होतील अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती.

स्वतः मुळकसुद्धा आशेवर होते. मात्र, यात यश न आल्याने अखेर मुळक यांनी अपक्ष अर्ज दाखल केला. त्यांच्या रॅलीमध्ये खासदार बर्वे आणि काँग्रेसचे कार्यकर्ते असल्याने शिवसेनेची चिंता वाढण्याची शक्यता आहे.

राजेंद्र मुळक हे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या अत्यंत जवळचे समजले जातात. ते मुख्यमंत्री असताना मुळक अर्थराज्यमंत्री होते. सर्वप्रथम मुळक हे उमरेड विधानसभा मतदारसंघातून निवडून आले होते. त्यानंतर झालेल्या पुनर्रचनेत हा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव झाला. नंतर मुळक कामठी मतदारसंघातून निवडणूक लढले. मात्र, ते पराभूत झाले. त्यानंतर त्यांनी रामटेक मतदारसंघाची निवड केली. दहा वर्षांपासून या मतदारसंघात त्यांनी काँग्रेसची बांधणी केली. आता ते अपक्ष म्हणून रिंगणात असून, कायम राहतात की माघार घेतात, हे लवकरच स्पष्ट होईल.

## आरक्षण बचाव महत्वाचा मुद्दा..

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :**
आगामी विधानसभा निवडणुकीत संविधान बचाव नाही, तर आरक्षण बचाव हा महत्त्वाचा मुद्दा असणार आहे, असे वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले.



गत लोकसभा निवडणुकीत वंचित आणि एमआयएमची युती होती. मात्र, विधानसभेला कोणत्याही आघाडीत सहभागी न होण्याचा निणर्यावर प्रकाश आंबेडकर म्हणाले, त्यावेळी आमच्याबरोबर अनेक ओबीसी संघटना होत्या. एमआयएम हा प्रामाणिक पक्ष नव्हता; त्यांनी पळ काढला. अल्पसंख्याकांपर्यंत पोहोचण्यासाठी आम्हाला इतर पक्षांची गरज नाही.

लोकसभा निवडणुकीवेळी संविधान बचावासाठी मतदारांनी महत्त्व दिले. यावेळी आरक्षण वाचविण्यासाठी मतदान करतील. सवर्ण पक्ष आणि काँग्रेस, भाजपा हे आरक्षणविरोधी पक्ष आहेत. मुस्लिम आणि दलित मतदार पुन्हा आमच्याकडे वळतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# आता मला सीएम पदाची कोणतीही लालसा नाही

**वकीलीचे स्वप्न भंगले**

**देवेंद्र फडणवीस यांचे मुलाखतीत स्पष्टीकरण**

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :**
भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांच्यावर ते मुख्यमंत्रीपदासाठी आसुसलेले असल्याची नेहमीच टीका केली जाते. पण आता खुद्द फडणवीस यांनीच आपल्याला आता या पदाची कोणतीही लालसा राहिली नसल्याचे स्पष्ट केले आहे.



सद्यस्थितीत माझ्या मनात मुख्यमंत्री होण्याचे कोणतेही स्वप्न किंवा लालसा उरली नाही. पक्ष देईल ती जबाबदारी मी नेटाने सांभाळेन, असे ते म्हणालेत.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी सलग ५ वर्षे राज्याचा मुख्यमंत्री होतो. महाराष्ट्रात आतापर्यंत केवळ २ मुख्यमंत्र्यांनाच ५ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करता आला. त्यापैकी एक वसंतराव नाईक व दुसरा मी. त्यामुळे आता माझ्या मनात मुख्यमंत्री होण्याचे स्वप्न किंवा लालसा काहीही उरले नाही. आता मला जी जबाबदारी दिली जाईल, ती मी पूर्ण करेन. महायुती ज्याच्या नावाची मुख्यमंत्री म्हणून घोषणा करेन, त्याच्या पाठिशी मी ठामपणे उभा राहीन.

आर्थिक क्षेत्रात काम करणे ही माझी आवड होती. वकिली करणे हे माझे स्वप्न होते. पण ते भंगले. त्यामुळे मी मागील २५ वर्षांपासून विधानसभेत राज्याच्या जनतेची वकिली करत आहे, असे फडणवीस म्हणाले.

महाविकास आघाडीचे नेते माझ्यावर जाणिवपूर्वक टीका करत असल्याचा आरोपही देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केला. भाजप हा सत्ताधारी महायुतीमधील ताकदवान पक्ष आहे. त्यामुळे महाविकास आघाडीचे नेते भाजपवर सर्वाधिक टीका करत आहेत. त्यातही त्यांच्या थिंक टँकने विशेषतः माझ्यावर म्हणजे देवेंद्र फडणवीस यांच्यावर वैयक्तिक हल्ले करण्याचे, माझी प्रतिमा मलिन करण्याचे निर्देश दिलेत. माझ्यावर टीका केल्यामुळे भाजप व महायुतीची ताकद कमी होईल असे त्यांना वाटते, असे फडणवीस या यासंबंधीच्या प्रश्नाला उत्तर देताना म्हणाले.

## कोण उमेदवार.. पाडव्यालाच सांगणार!

■ **वृत्तसंस्था, जालना, दि. ३० :**
मराठा आंदोलक मनोज जरांगे यांची ३१ ऑक्टोबर रोजी दलित, मुस्लिम, मराठा समीकरणाबाबत बैठक होणार आहे. समीकरणाशिवाय पर्याय नाही. ही बैठक अधिकृत असेल. या बैठकीत काय निर्णय होईल, हे उद्याच कळेल. दिवाळीपर्यंत कुणीही आंतरवाली सराटीत येऊ नये, असे आवाहनही मनोज जरांगे यांनी समाजबांधवांना केले आहे.



३१ ऑक्टोबरची बैठक झाल्यानंतर बैठकीतील निर्णय एक दिवस उशिरा सांगणार आहे. दुसऱ्या दिवशी दिवाळी असून आनंदाचा दिवस आहे. त्यामुळे बैठकीतील निर्णय पाडव्याच्या दिवशी सांगितला जाईल. कोणत्या मतदारसंघात कोण उमेदवार देणार हे देखील त्याचदिवशी सांगणार असल्याचेही मनोज जरांगे म्हणाले.

माझा पाठिंबा देण्यासाठी काही लोक पैसे मागत असल्याचा आरोपही जरांगे यांनी केला आहे. उद्याची बैठक झाल्यानंतर सर्व काही स्पष्ट होईल, असेही जरांगे यांनी सांगितले.

दरम्यान, मराठा आंदोलक मनोज जरांगे यांची प्रकृती आज खालावली आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आंतरवाली सराटी येथे इच्छुकांची भेटीगाठी गर्दी होत आहे. ३१ ऑक्टोबरला आपला निर्णय सांगणार असल्याने जरांगे यांनी म्हटले होते. त्यासाठी गेल्या काही दिवसांपासून त्यांचे दौरे देखील सुरू आहेत.

सततच्या दौऱ्यांमुळे झालेले जागरण आणि दगदगीमुळे त्यांची प्रकृती खालावली आहे. त्यांची डॉक्टरांकडून तपासणी करण्यात आली आहे. सततची दगदग आणि धावपळीमुळे त्यांच्या अंगात ताप असून अशक्तपणा देखील जाणवत आहे.

### राजकारणात काहीही शक्य

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३० :**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पुन्हा एकत्र येणार का? याबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना प्रतिक्रिया दिली आहे. मी ज्योतिष नाही, राजकारणात काहीही होऊ शकते असे सूचक वक्तव्य उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे.

# भाजपचे १४८, काँग्रेसचे १०३ उमेदवार

**एकनाथ शिंदेंचे ८०, अजित पवारांचे ५३; उद्धव ठाकरेंचे ८९, शरद पवार गटाचे ८७**

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :**
महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत संपल्याने आता निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादीतील बंडखोरीमुळे यावेळी ६ मोठे पक्ष रिंगणात आहेत. त्यामुळेच बंडखोरांची संख्या अधिक आहे. राज्यात जवळपास सर्वच जागांवर बंडखोर उभे आहेत.

आता सर्वांच्या नजरा अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या तारखेकडे (४ नोव्हेंबर) लागल्या आहेत. त्यानंतर लढत कशी असेल ते स्पष्ट होईल. यंदाच्या निवडणुकीत ७९९५ उमेदवारांनी अर्ज दाखल केलेत. शेवटच्या दिवशी ४९९६ जणांनी अर्ज भरले.

उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत संपल्यानंतरही महायुती आणि एमव्हीएने जागावाटपाचा फॉर्म्युला उघड केला नाही. उमेदवारांवर नजर टाकल्यास, महायुतीमध्ये १४८ उमेदवारांसह भाजप सर्वात मोठा पक्ष आहे, तर आघाडीमध्ये १०३ उमेदवारांसह काँग्रेस सर्वात मोठा पक्ष आहे. दोन्ही पक्ष २०१९ च्या विधानसभा निवडणुकीपेक्षा कमी जागांवर लढत आहेत. गेल्या वेळी भाजपने १६४ जागांवर आपले उमेदवार उभे केले होते तर काँग्रेसने १४७ जागांवर आपले उमेदवार दिले होते.

याशिवाय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेने ८०, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस ५३, उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष ८९, तर शरद पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने ८७ जागांवर उमेदवार जाहीर केले आहेत. गेल्या निवडणुकीत शिवसेना (संयुक्त) आणि राष्ट्रवादी (संयुक्त) प्रत्येकी १२४ जागांवर लढले होते.

महायुतीने यावेळी आपल्या मित्र पक्षांसाठी ५ जागा सोडल्या आहेत. दुसरीकडे, आघाडीचे छोटे मित्र ६ जागांवर निवडणूक लढवत आहेत. महायुतीच्या २ आणि आघाडीच्या ३ जागांवर अजूनही परिस्थिती स्पष्ट झालेली नाही.

**अनेक जागेवर बंडखोर**

शिवसेना आणि राष्ट्रवादीतील बंडखोरीमुळे यावेळी 6 मोठे पक्ष रिंगणात आहेत. या कारणास्तव बंडखोर अधिक आहेत. राज्यात जवळपास प्रत्येक जागेवर बंडखोर उभे आहेत. ४ नोव्हेंबरपर्यंत किती जण अर्ज मागे घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यानंतरच लढत कशी असेल हे कळेल.

दोनवेळा भाजपचे खासदार राहिलेले गोपाळ शेट्टी यांनी बोरीवलीतून बंडखोरी केली आहे. एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे गटनेते राजू पारवे यांनी उमरेडमधून तर माजी एन्काउंटर स्पेशालिस्ट प्रदीप शर्मा यांच्या पत्नी स्वीकृती शर्मा यांनी अंधेरी पूर्वमधून बंडखोरी केली. चिंचवडमधून नाना काटे यांनीही बंडखोरी केली असून, विदर्भातील अनेक मतदारसंघात बंडखोरांनी आपापले शड्डू ठोकले आहेत.

सर्वे भवन्तु सुखिन
सर्वोत्तम शिक्षा, अच्छे संस्कार, अनुशासित वातावरण
|| श्री माँ ||
उड्डान The Rising
सर्वे भवन्तु सुखिनः
LPS EDUCATION
The Lord's Public School & Junior College
Sindhi Colony, Bhandara
Dr. Ashish S Paliwal
MA English, BEd, BPEd, MEd, MPhil, PhD, DSM, LLB
Nursery to 12th
CBSE Affiliation No. 1131261
11 IITIANS, 13 MBBS AND MANY MORE...
Genius Under Construction



# डॉ. विकास आमटे आणि निफाडकर यांच्या हस्ते वटवृक्षाच्या छायेखाली पुस्तकाचे प्रकाशन



■ **महासागर प्रतिनिधी, वरोरा, दि. ३० :**
श्रध्देय बाबा आमटे प्रसिद्धीपासून दूर होते. ते नेहमी म्हणत, माझ्यावर चित्रपट काढण्यापेक्षा माझ्या माणसांवर काढा, तसा बायोपिक काशिनाथ सारख्या सहकाऱ्यांवर काढावा, माझ्यावर सुद्धा नको, अशी इच्छा आनंदवनाचे सचिव डॉ. विकास आमटे यांनी व्यक्त केली.

बाबा आमटे यांचे वाहनचालक काशिनाथ शिव यांच्या 'वटवृक्षाच्या छायेखाली' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ गझलकार प्रदीप निफाडकर, लातूरचे इतिहास अभ्यासक डॉ. सोमनाथ रोडे, अमरावतीचे लेखक डॉ. गोविंद कासट, आनंद निकेतन महाविद्यालयाचे निवृत्त प्रा. श्रीकांत पाटील, वरोऱ्याचे आचार्य ना. गो. थुटे व तपोवन अमरावतीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गवई उपस्थित होते. हे पुस्तक पुण्याच्या प्रकाशन तर्फे प्रसिद्ध झाले असून त्यांचे शब्दांकन दीपक शिव यांनी केले आहे.

डॉ. विकास आमटे यांच्या ७७ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून हा प्रकाशन समारंभ झाला. यावेळी विविध वक्ते, साहित्यिक आणि संस्थांतर्फे डॉ. आमटे यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. विकास आमटे म्हणाले, काशिनाथ यांच्यासारख्या आनंदवनातील लोकांना मी गुरु मानतो, या लोकांनी आम्हाला खूप शिकवले. आमच्या प्रसिद्धीपेक्षा या लोकांना प्रकाशात आणायला हवे.

आजचा समारंभ म्हणजे दिवाळी पूर्वीचे अभ्यंगस्नान आहे, असे नमूद करून निफाडकर म्हणाले, हे एका प्रमाणिक माणसाचे पुस्तक आहे. पण त्याहीपेक्षा या पुस्तकाचे महत्व हे आहे की एका कन्नड माणसाने ९० व्या वर्षी मराठीत पुस्तक लिहीले, ते मराठीला अभिजात दर्जा मिळाल्यानंतरचे सर्वात सुंदर पुस्तक आहे.

विकासभाऊंकडे आठवणींचा खजिना आहे. अनेक साहित्यिकांची पत्रे आहेत.त्या विषयी बोलताना निफाडकर यांनी कालच वाढदिवसाच्या पूर्व संध्येला गप्पा मारताना विकासभाऊ यांनी त्या आठवणींचे पुस्तक लिहिण्यास मान्यता दिली आहे. भाऊंच्या पुढच्या वाढदिवशी ते यावे, अशी व्यवस्था करण्यात येईल, असे यावेळी जाहीर केले.

डॉ. सोमनाथ रोडे यांनी पुस्तकाचे विवेचन केले. इतर मान्यवर वक्त्यांनी पुस्तकाला शुभेच्छा दिल्या. श्रध्देय बाबा आमटे यांच्या माणूस माझे नाव, दहा दिशांच्या रिंगणात या पुढेच माझी धाव... या गीताने कार्यक्रमाची सुरूवात झाली. आनंदवनातील दिव्यांगांनी निर्माण केलेल्या भेटवस्तू आणि वटवृक्षाचे रोप देऊन पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले.

इन लकिरोने हमको सताया बहोत...
आओ लकीरें मिटा दे...हे संवेदनशील गीत स्वरानंदवनच्या चमूने सादर केले.

दीपक शिव यांनी प्रास्ताविकात आनंदवनाला पंच्याहत्तर वर्ष पूर्ण झाल्याबद्दल ७५० पुस्तके भेट स्वरूपात दिल्याचे सांगितले. सूर्यांशचे अध्यक्ष कवी इरफान शेख यांनी स्वागत केले. पुस्तकाचे लेखक काशिनाथ गुंडप्पा शिव यांनी पुस्तकात न आलेल्या काही आठवणींना उजाळा दिला.

या कार्यक्रमात सूर्यांश साहित्य व सांस्कृतिक मंच, चंद्रपूर तसेच झाडीबोली साहित्य मंडळ, वरोरा,या संस्थाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते या शिवाय नागपूर, चंद्रपूर, भद्रावती, वरोरा येथील श्रोते उपस्थित होते. चित्रकार सुदर्शन बारापात्रे व हरिश्चंद्र ढोबाळे यांनी डॉ. विकास आमटे यांचे चित्र तयार करून ते त्यांना भेट दिले. समारंभास नागपूरच्या दै. महासागरचे संस्थापक संपादक श्रीकृष्ण चांडक, अंबाजोगाईचे सामाजिक कार्यकर्ते दगडू लोमटे यांच्यासह नांदेडचे अनेक साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. अधीक्षक रवींद्र नलगिंटवार यांनी सूत्रसंचालन केले तर प्रा. तानाजी बायस्कर यांनी आभार मानले.

नगर परिषद, उमरेड
जि. नागपूर
कचरा विलगीकरण जनजागृती अभियान
निर्मितीच्या ठिकाणीच कचऱ्याचे विलगीकरण करा. वर्गीकृत केलेला कचरा पालिकेच्या नियमित येणाऱ्या घंटा गाडीला सोपवा.
कार्यालय नगरपरिषद उमरेड, जि- नागपूर
जाहीर आवाहन
उमरेड नगर परिषद हद्दीतील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, उमरेड शहरात स्वच्छ सर्वेक्षण २०२४ व माझी वसुंधरा अभियान ५.० सुरु असून सदर अभियानामध्ये उमरेड शहरास उत्कृष्ठ मानांकन मिळण्याकरिता नगर परिषद उमरेड प्रयत्नशील आहे. परंतु अभियानाकरिता काही बाबींची पूर्तता करण्याकरिता नागरिकांचा सहभाग असणे आवश्यक आहे, जेणेकरून त्यामुळे शहराचे मानांकन उंचवण्यास मदत होईल. शहराच्या मानांकनाचा दर्जा कायम ठेवण्याकरिता अभियानमधील खालील नमूद बाबींची पूर्तता करून नागरिकांनी सहभाग नोंदवावा.
१) घंटागाडीमध्ये कचरा ओला व सुका स्वरुपात वेगवेगळा करून द्यावा. (At Source 100% Segregation)
२) घराघरातील ओल्या कच-यापासून खत निर्मिती करावी. (Home Composting)
३) पावसाच्या पाण्याचे योग्यरित्या व्यवस्थापन करावे. (Rain Water Harvesting )
४) घरातील सांडपाण्याचे व्यवस्थापन करण्याकरिता शोष खड्डे निर्मित करणे.
५) सिंगल युज प्लास्टिकचा वापर टाळणे.
६) ई- वाहनांचा वापर करणे.
७) शहरात जास्तीत जास्त झाडे लावून झाडांचे संगोपन व संवर्धन करणे.
८) बांधकाम व विध्वंसक कच-याचे योग्यरित्या व्यवस्थापन करणे.
९) नियमित मालमत्ता कर व पाणीपट्टी कराचा भरणा करून जप्तीची कारवाई टाळावी.
१०) सार्वजनिक ठिकाणी कुठेही धुंकु नये.
सर्व नागरिकांनी वरील बाबींची पूर्तता करून नगरपरिषद उमरेडला सहकार्य करावे.
स्वा /- मुख्याधिकारी
नगर परिषद उमरेड






अर्चना मेंढे
मुख्याधिकारी तथा प्रशा. अधिकारी
नगर परिषद उमरेड, जि. नागपूर

नागपूर
महासागर वृत्तसागर
■ गुरुवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२४ ■



# समीर मेघे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ३० :

महाराष्ट्र विधानसभा निवडणुक २०२४ करीता हिंगणा विधानसभा मतदारसंघासाठी तिसऱ्यांदा महायुती मधील भाजपा उमेदवार म्हणुन समीर मेघेंची पहिल्या यादीत पक्षाने निवड घोषीत केली. त्यांनी भाजपा निवडणुक उमेदवार म्हणुन मंगळवार २९ ऑक्टोबर रोजी त्यांचा नामाकंन अर्ज निवडणुक निर्णय अधिकारी ५०- हिंगणा विधानसभा मतदारसंघ, हिंगणा यांचेकडे दाखल केला.

पक्षाच्या या निर्णयाचे सर्वच कार्यकर्ते आणि महायुतीमधील सर्वच घटक पक्षाचे कार्यकर्त्यांनी स्वागत केले. त्यांचा नामाकंन अर्ज दाखल करतांना उपस्थित राहण्यासाठी मतदार संघातील गावामधुन स्वयंस्फुतीर्ने कार्यकर्त्यांनी नियोजन करुन ते उपस्थित राहीले. समीर मेघे यांचेवर प्रेम करणारे असंख्य पुरुष व महिला मतदारांनी हिंगण्याकडे धाव घेतली.




प्रचंड संख्येते जमलेले नागरीक व कार्यकर्ते महाराजा सेलीब्रेशन वानाडोंगरी येथुन शिवाजी पुतळा हिंगणापर्यंत रॅलीत सहभागी होवुन शक्ती प्रदर्शन केल्याचे दिसुन आले. दरम्यान समीर मेघे यांनी हिंगणा येथील श्री. क्षेत्र गणेश मंदीर हनुमान गड येथे दर्शन घेवुन आशीर्वाद घेतले तसेच घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संत रविदास महाराज यांचे रायपुर येथील पुतळ्यास पुष्पहार घालुन अभिवादन केले. त्यानंतर रॅली शिवाजी महाराज पुतळा हिंगणा येथे पोहचल्यानंतर महाराष्ट्राचे दैवत शिवाजी महाराज यांचे पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन आशीर्वाद घेतला.

नामाकंन अर्ज दाखल करतांना राज्याचे उपमुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी सुध्दा रॅलीस संबोधीत करतांना समीर मेघे यांना प्रचंड बहुमताने निवडुन आणावयाचे आहे, असे आवाहन केले.

# गोवंश तस्कर पोलिसांच्या जाळयात

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. ३० :

कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत तारसा मार्गाने तारसा कडुन येणाऱ्या गोवंश जनावरांची अवैध वाहतुक करणारी पिकअप वाहनाला कन्हान पोलीसांच्या डीबी पथकाने पकडुन दोन आरोपींना अटक करुन ७,२०,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

प्राप्त झालेल्या माहिती नुसार शनिवार (दि.२६) ते रविवार (दि.२७) ऑक्टोंबर ला पहाटे सकाळी ४ वाजता च्या दरम्यान कन्हान पोलीस डी.बी पथक परिसरात रात्रग्रस्त पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली कि, एक चार चाकी पिकअप वाहन तारसा कडुन कन्हान कडे येत आहे. सालवा पेट्रोल पंप जवळ नाकाबंदी केली असता एक चारचाकी वाहन तारसा रोड कडुन कन्हान कडे संशयास्पदरित्या येतांना दिसल्याने वाहन चालकास थांबण्याचा इशारा केला असता दोन्ही इसम वाहन रस्त्यावर सोडुन शेतात पळुन गेले.




पोलीसांनी अशोक लेलैंड कंपनीचे मॉडेल बडा दोस्त पिकअप वाहन क्रमांक एम ४० सीटी ५००७ ची पाहणी केली असता डाल्यामध्ये ११ गोवंश बैल जातीचे कत्तली करिता निर्दयतेने कोंबुन नेतांना मिळुन आल्याने पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करुन ११ गोवंश किंमत २,२०,००० रुपए आणि पिकअप वाहन किंमत ५,००,००० रुपए असा एकुण ७,२०,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन ध्यान फाउंडेशन गौशाला खरबी भंडारा येथे दाखल करण्यात आले.

सहायक पोलीस निरीक्षक राहुल चव्हान यांचा तक्रारी वरून पोलीसांना दोन आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला. पोलीसांनी वाहन क्रमांक वरुन आरोपीची ओळख पटवुन आरोपी १) अब्दुल हमीद हबीब शेख (वय २८) रा.कामठी, २) विक्की राजु वैरागडे (वय ३०) रा.टिमकी पाचपावली नागपुर यांची गोपनीय माहिती काढुन ताब्यात घेतले. पोलीसांनी विचारपुस केली असता दोघांनी गुन्ह्याची कबुली दिल्याने पोलीसांनी अटकेची कारवाई करुन दोघांना जेलबंद केले. सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीण पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार, अप्पर पोलीस अधिक्षक रमेश धुमाळ यांचा मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष गायकवाड, पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील, सहायक पोलीस निरीक्षक राहुल चव्हान, हरिष सोनभद्रे, महेश बिसेन, अमोल नागरे, सतिश तलेवार, अश्विन गजभिए, आकाश शिरसाट सह आदि पोलीस कर्मचारी यांनी ही कारवाई यशस्वीरित्या पार पाडली.

# 'वाचन संस्कृती : काल आणि आज' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

महिला महाविद्यालय नंदनवन, नागपूर येथे इतिहास विभाग आणि ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न, भारताचे माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त, अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजविणे तसेच विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे व वाचनाचे महत्त्व वाढविणे हा होता. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.अपर्णा चौधरी ग्रंथपाल, बिंझाणी महिला महाविद्यालय नागपूर या लाभल्या होत्या. त्यांनी आपल्या व्याख्यानात जगात मिसाईल मॅन म्हणून ओळखले जाणारे ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा खडतर जीवन प्रवासात त्यांना वाचनाने कसे समृद्ध केले यावर प्रकाश टाकला. तसेच विविध साहित्यिकांच्या साहित्यातून आपले जीवन कसे समृद्ध करता येईल, वाचनात आनंद कसा शोधायचा, सोबतच ज्ञान संपादनही करायचे याविषयी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. स्वानुभवातून विविध उदाहरणाद्वारे विद्यार्थिनींना वाचनाचे महत्त्व पटवून दिले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या, डॉ.




वंदना भागडीकर या होत्या. त्यांनी विद्यार्थिनींना वाचनाची आवड कशी निर्माण करता येईल याविषयी मार्गदर्शन केले. दररोज पुस्तक वाचण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्तविक महाविद्यालयाच्या ग्रंथपाल डॉ.स्मिता गिरी यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार इतिहास विभाग प्रमुख डॉ. मंगला गोरे यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचा प्राध्यापक वर्ग तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# युनायटेड फोरम ऑफ बँक युनियनचा संप स्थगित

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

राज्य सरकारशी झालेल्या यशस्वी वाटाघाटी नंतर युनायटेड फोरम ऑफ बँक युनियनचा संप स्थगित करण्यात आल्याची युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सचे निमंत्रक देवीदास तुळजापुरकर यांनी दिली आहे. लाडकी बहिण योजनेच्या संदर्भात, कोणतीही घटना अत्यंत गांभीयार्ने हाताळली जाईल हे प्रमुख आश्वासन या चर्चेत देण्यात आले. महाराष्ट्र शासनाने मंगळवार, २९ ऑक्टोबर रोजी युएफबीयू महाराष्ट्रच्या प्रतिनिधींसोबत बैठक बोलावली होती. संघटनेने २५ ऑक्टोबर रोजी आझाद मैदान, फोर्ट येथे आयोजित केलेल्या महाधरणे आंदोलनाची दखल घेत बैठक बोलावण्यात आली. मारहाण करणाऱ्या दोषींवर त्वरित कारवाई करावी आणि सर्व बँक कर्मचाऱ्यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात यासाठी महाधरणा आंदोलन आयोजित केले गेले होते. या बैठकीला महिला व बाल कल्याण विभागाचे सचिव डॉ. अनुप कुमार यादव, महाराष्ट्र सरकारचे सहसचिव आनंद भोंडवे आदी उपस्थित होते. बँक कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी सुरुवातीला तीन महिन्यांसाठी आउटसोर्स सुरक्षारक्षक नियुक्त करून सुरक्षा वाढवण्याचा सल्ला बँकांना दिला जाईल, जिल्हाधिकाऱ्यांना आणि पोलिस आयुक्तांना बँक कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्याचे निर्देश देईल.

# पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचे आवाहन




■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ३० :

स्वच्छ सर्वेक्षण २०२४ व माझी वसुंधरा ५.० अभियानाच्या अंतर्गत स्थानिक नगर परिषदेकडून वानाडोंगरी हद्दिदील सर्व शाळेत हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

त्या मधिल संदिप कोहाड शाळांमध्ये पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्यासाठी जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. शहरातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी फलकांच्या माध्यमातून पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचा संदेश दिला. यामध्ये विद्यार्थ्यांनी हॅपी ग्रीन दिवाळी हा संदेश फलकांवर लिहून जनजागृती केली. नगर परिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी भारत नंदनवार यांच्या मार्गदर्शनात हा उपक्रम राबविण्यात आला.

नागरिकांनी फटाके वाजवू नयेत, तसेच पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करावी, असे आवाहन सर्व नप कर्मचारी व फीडबॅक फाउंडेशन टीम मार्फत करण्यात आले.

## सरदार वल्लभभाई पटेल यांना आदरांजली

**नागपूर :** मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने 31 ऑक्टोबर 2024 रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी केली. "भारताचे लोहपुरुष" म्हणून ओळखले जाणारे सरदार पटेल यांनी अनेक संस्थानांना एकत्र आणून भारताची एकता घडवली. या दिनानिमित्त, एकता आणि सामाजिक समृद्धीच्या भावनेला साकार करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेः 30 ऑक्टोबर 2024 रोजी नागपूरचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक मनीष अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली प्रतिज्ञा विधी घेण्यात आला. सर्व सहभागी सदस्यांनी राष्ट्रीय एकतेची शपथ घेतली, ज्याची सांगता राष्ट्रगीताने झाली. 29 ऑक्टोबर 2024 रोजी "रन फॉर यूनिटी" रॅली डीआरएम कार्यालयापासून नागपूर स्थानकापर्यंत घेण्यात आली. अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक पी.एस. खैरकर आणि वरिष्ठ विभागीय कार्मिक अधिकारी सांझी यांनी या रॅलीला हिरवा झेंडा दाखवून प्रारंभ केला.

# कवी कुलगुरू कालिदास स्मारकाचे श्रमदानातून स्वच्छता अभियान

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ३० :

सुप्रसिद्ध लेखक व ख्यातनाम कादंबरीकार पद्मभूषण डॉ. भैरप्पा यांना महर्षी वाल्मिकी पुरस्काराने दिनांक २०.१०.२४ रोजी कवी कुलगुरू कालिदास सभागृह नागपूर येथे सन्मानित केले गेले. यावेळी डॉक्टर भैरप्पा यांनी रामटेक येथील कवी कुलगुरू कालिदास स्मारकाला भेट देण्याचे इच्छा व्यक्त केली. दिनांक २१.१०.२४ रोजी त्यांनी भेट देऊन आधुनिक कादंबरीकराने गतकाळातील थोर कवि कालिदासास आदरांजली वाहिली.

स्मारक अतिशय सुंदर असल्याचे सांगून त्याचा गौरव करून आनंद व्यक्त केला. परंतु स्मारकाची श्रद्धेने पाहणी करत असतांना स्मारका सभोवताली वाढलेले गवत व स्मारकाची झालेली दुरावस्था पाहून ते अत्यंत व्यथित झालेत व त्यांच्या सोबतच्या व्यक्तींसमोर आपली खंत व्यक्त केली. वृत्तपत्राने बातमीद्वारे लोकांसमोर उजागर केली. त्याअनुषंगाने दिनांक २७.१०.२४ रविवारी हिंदु रिसर्च फाउंडेशनच्या पुढाकाराने व स्थानिक




स्वयंसेवी संस्थेच्या साहकायार्ने कवि कुलगुरु कालिदासांच्या स्मारकाचे श्रमदानातून स्वच्छता अभियान आयोजित केले गेले.

ह्या स्वच्छता अभियानात कृष्णा भाल, अध्यक्ष हिंदु सेवा संघ, रामटेक व एनटीपीएस संस्थेचे संचालक जगन्नाथ गराट यांच्या मार्गदर्शनाखाली श्रमदानातून स्मारकाची स्वच्छता मोहीम राबवली गेली.

यावेळी स्वच्छता श्रमदान कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात हिंदू सेवा संघ, सृष्टी सौंदर्य बहुउद्देशीय संस्था, योगीराज हॉस्पिटल, एनटीपीएस हिवरा बाजार, विदर्भ साहित्य संघ, एकविरा माता भक्तगण, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ते व स्वयंसेवक उपस्थित होते.

सर्वांनी स्वेच्छेने, निरपेक्ष, निस्वार्थ हेतूने हिरीरीने भाग घेऊन कवी कुलगुरू कवि कालीदासांच्या स्मारकाची स्वच्छता मोहीम राबविली.

या स्वच्छता अभियानात नाना नागपुरे व नगर पालिका रामटेक यांचे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले. यावेळी उपस्थित झालेल्या सर्व स्वयंसेवकांचे हिंदू रिसर्च फाउंडेशन व हिंदू सेवा संघातर्फे आभार व्यक्त करण्यात आले.

# वडधामन्यातील विविध पक्षातील कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ३० :

आमदार समीर मेघे यांचे नेतृत्वात रविवार २७ ऑक्टोबर रोजी वडधामना येथील विविध पक्षाचे शेकडो महिला-पुरुष कार्यकर्त्यांनी भाजपात प्रवेश करण्यात आला.

यावेळी हिंगना विधानसभेचे संयोजक नरेश चरडे, भाजपा वाडी मंडळ अध्यक्ष आनंदबाबु कदम, वडधामनाचे सरपंच धिरज आंबटकर, जिल्हा मंत्री राजुताई भोले, भाजपा ओबीसी महीला आघाडीच्या अध्यक्ष ज्योती भोरकर उपस्थीत होते. योगीराज आंदे, संजीव शुक्ला, श्रीकीशन



चचाने, आदित्य शर्मा, ऊमेश रायपुरकर, चंद्रशेखर देवूळकर चैतन्यश्वर सोनबावने, नरेंद्र ठाकरे, चंद्रकांत मसराम, ललन शर्मा, मुकेश शर्मा, संतोष शर्मा, हरीदास ऊकरे, अमीत सिंग, यादव टेकाडे, मनोज पाल, प्रमोद गजभिए, ईश्वर सोनुले, संजय पाटिल, शामकिसन चचाने, राजकुमार आदे, सरीता सोनवाने, निकीता ठाकर, पूष्पा आदे, सुनीता शर्मा, छाया चचाने, पुजा सोनुले, खिलेश्वरी शाहु, रितु तिवारी, पुनम शर्मा, मिना साहुसकर आदींनी पक्षप्रवेश घेतला.

# प्रेमीयुगुलांकडून वसूली करणाऱ्या पोलिसांवरील गुन्हा रद्द

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

नागरिकांची सुरक्षा करणे हे पोलिसांचे प्राथमिक कर्तव्य असते. मात्र नागपूरमध्ये पोलिसांनी एका प्रेमी जोडप्याला धमकावत त्यांच्याकडून वसूली करण्याचे प्रकरण काही महिन्यांपूर्वी पुढे आले होते. या प्रकरणामुळे नागपूर पोलिसांवर नामुष्की ओढविण्याची परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र आता एका आश्चर्यकारक घटनाक्रमात या प्रकरणातील दोन दोषी पोलिसांवरील गुन्हा रद्द करण्यात आला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने हा गुन्हा रद्द करण्याचे आदेश दिले. पोलिसांनी त्यांच्या कर्तव्याच्या विरोधात जाऊन हे कृत्य केले आहे. यामुळे सामान्य नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास कमी होतो, असे मतही न्यायालयाने नोंदविले, मात्र हा गुन्हा रद्द केला.

वाठोडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत १३ एप्रिल २०२४ रोजी ही घटना घडली होती. जबलपूर-हैदराबाद महामार्गावर एक तरुण आपल्या तरुण मैत्रीणीसह एका कारमध्ये होता. रात्री आठ वाजताच्या सुमारास दोन व्यक्ती कारजवळ आले आणि प्रेमी जोडप्याला धमकावले. दोघांनी आपली ओळख पोलीस कर्मचारी म्हणून सांगितली.

एका निर्जन ठिकाणी अश्लील चाळे करत असल्यामुळे तुमच्यावर गुन्हा दाखल करण्यात येईल, अशी धमकी देत पोलिसांनी त्यांच्याकडून दोन लाख रुपयांची मागणी केली. जोडप्याकडून सुमारे पावणे दोन लाख किंमतीची सोन्याची चैन देखील बळकावली. प्रेमी जोडप्याला पोक्सोच्या गुन्ह्याअंतर्गत अडकवण्याची भितीही पोलिसांनी दाखविली. या घटनेनंतर वाठोडा पोलीस ठाण्यात दोन्ही पोलीस कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल केला. वाठोडा पोलिसांनी याप्रकरणी तपास केला, मात्र आरोपपत्र दाखल केले नाही. दरम्यान आरोपी पोलिस कर्मचारी संदीप यादव आणि पंकज यादव यांनी उच्च न्यायालयात गुन्हा रद्द करण्यासाठी याचिका दाखल केली.

प्रेमी जोडप्यांनी वसूली करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांची तक्रार केली होती. मात्र उच्च न्यायालयात त्यांनी शपथपत्र दाखल करत गुन्हा मागे घेण्यास आक्षेप नसल्याचे सांगितले. या प्रकरणामुळे त्यांच्या मानसिक शांतीवर विपरित परिणाम होत आहे. याशिवाय दोघेही विद्यार्थी असल्याने या न्यायालयानी प्रकरणामुळ त्यांच्या शिक्षणावर आणि भविष्यावर परिणाम होतो आहे, असे लिखित स्वरुपात प्रेमी जोडप्याने सांगितले. प्रेमी जोडप्याच्या या शपथपत्रानंतर न्यायालयाने दोन्ही पोलीस कर्मचाऱ्यांवरील गुन्हा रद्द केला.

मात्र पोलीस यंत्रणेला त्रास दिल्यामुळे एक लाख रुपयांचा दंडही ठोठावला. उच्च न्यायालयाच्या ग्रंथालयाला ११ नोव्हेंबरपूर्वी ही दंडाची रक्कम जमा करायची आहे. दोन्ही पोलीस कर्मचारी सध्या निलंबित आहेत आणि त्यांची विभागीय चौकशी प्रलंबित आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे विभागीय चौकशीवर परिणाम होणार नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

# नागपुर जिल्हा ग्रामीण उपाध्यक्ष राजाराम पांडे यांचा भाजपात प्रवेश

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ३० :

हिंगणा तालुक्यातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शप) गटाचे नागपुर जिल्हा ( ग्रामीण ) चे उपाध्यक्ष राजाराम पांडे यांनी आमदार समिर मेघे यांच्या उपस्थितीत शेकडो कार्यकर्त्यां सह आज सोमवार २८ ऑक्टोबर रोजी भाजपाचे पदाधिकारी अंबादास उके यांच्या कार्यालयात आयोजित कार्यक्रमात भाजपात प्रवेश घेतला.

पांडे यांनी शनिवार २६ ऑक्टोबर रोजी राष्ट्रवादी कॉंग्रेस (श प) पार्टी च्या उपाध्यक्ष पदाचा व प्राथमिक सदस्यत्व सोडल्याचे प्रसिध्दी पत्रक काढून जाहीर केले होते. प्रवेश घेणाऱ्या मध्ये प्रामुख्याने राजाराम पांडे, चंकी पांडे, ब्रजपाल सिंग, संजीव यादव, परेश पाल,



विवेक तिवारी, विक्की तिवारी, मुन्ना राजभर, राम सपकाळ, अनुराग तिवारी, रामकिशोर अहिरवार, रवी पाटीदार, प्रियंका पाटीदार, शेखर बोदलखंडे, रुपेश (बंटी) भिसेन, गणेश नवघरे, दलजीत सिंह सिब्बल, करण टेकाम, विश्वास गेडाम, नितीन गेडाम, मंगेश टेकाम शेषवंता टेकाम आदींचा समावेश आहे. यावेळी प्रामुख्याने अंबादास उके, सुरेश काळबांडे, विनोद ठाकरे, कैलाश गिती, चेतनलाल पांडे, चंद्रशेखर राऊत, दादाराव मसराम आदी उपस्थित होते.

# दरोड्याच्या तयारीत मिळाली गुंडांची टोळी

**नागपूर :** अजनी पोलिसांनी मंगळवारी रात्री गस्ती दरम्यान दरोड्याच्या तयारीत असलेल्या गुन्हेगारांच्या टोळीवर धाड टाकली. एक आरोपी फरार होण्यात यशस्वी झाला, मात्र चार आरोपी पोलिसांच्या हाती लागले.

झडतीमध्ये आरोपींजवळ शस्त्रही मिळाले. प्रशिल उर्फ मोनू रायडर जाधव (23), ललित गणेश रेवतकर (23) दोन्ही रा. बसंतनगर, बाभुळखेडा, रोहित अशोक भगत (18) रा. जयभीमनगर आणि आकाश योगेश शेवारे (24) रा. निरंजननगर, बेलतरोडी अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. अजनी पोलिसांचे एक पथक रात्री 2 वाजताच्या सुमारास ठाण्यांतर्गत रेल्वे क्वॉर्टर परिसरात गस्त घालत होते. या दरम्यान निक्षू चौकाजवळ पोलिसांना वरील आरोपी अंधारामध्ये संशयास्पदरित्या दिसले. पोलिसांनी घेराबंदी करून त्यांच्यावर धाड टाकली. चार आरोपी पोलिसांच्या हाती लागले, मात्र एक पळून जाण्यात यशस्वी झाला. अटकेतील आरोपींच्या झडतीमध्ये पोलिसांनी 2 चाकू, दांडा, रॉड, नायलॉन दोरी आणि मिरची पावडर मिळाले. पोलिसांनी आरोपींकडून 4 मोबाईल फोनही जप्त केले. त्यांच्यावर दरोड्याची तयारी आणि आर्म्स ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

# अव्हेल कॉन्व्हेंट अॅन्ड हायस्कूल मध्ये दीपावली उत्सवाचा जल्लोष




■ महासागर प्रतिनिधी
**वाडी, दि. ३० :**

दाभा येथील अव्हेल कॉन्व्हेंट अॅन्ड हायस्कूल मध्ये दीपावली उत्सव आनंदात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी एकत्र येऊन या सणाच्या पवित्र आणि मंगलमयी वातावरणात कार्यक्रमाचे आयोजन केले.

यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने आणि दीपप्रज्वलनाने झाली. विद्यार्थ्यांनी रंगीबेरंगी पोशाख परिधान करून सुंदर नृत्य, गीते आणि नाटकांमधून दीपावलीचे महत्त्व आणि संदेश व्यक्त केले. दीपोत्सवाचे महत्त्व, पर्यावरणपूरक साजरा करण्याचे आवाहन आणि सणाचे सामाजिक व आध्यात्मिक पैलू समजावून देणारे उपक्रमही राबविण्यात आले.

कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे आकाशकंदील आणि रांगोळी स्पर्धा, ज्यात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सणाच्या महत्त्वाविषयी मार्गदर्शन केले आणि सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून फटाके न फोडता दीपावली साजरी करण्यावर भर दिला.

मुख्याध्यापिका कोमल करंडे यांनी विद्यार्थ्यांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या आणि सर्वांना सण सुरक्षित व पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांनी मोलाचे सहकार्य केले. शाळेत दीपावली उत्सव साजरा करण्यामध्ये विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि आत्मीयता स्पष्ट दिसत होती.

## नागपुर महानगर पालिकेच्या देणगी केंद्रांना मिळत आहे प्रतिसाद

**नागपूर :** दिवाळीत प्रत्येक घरात स्वच्छता मोहीम राबवली जाते. घरांमध्ये ठेवलेल्या न वापरलेल्या आणि टाकाऊ वस्तूंचे वर्गीकरण सुरू झाले आहे. घरगुती वापराच्या नसलेल्या साहित्यासाठी महापालिकेने दान संकलन केंद्रे उभारली आहेत.

नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त अभिजीत चौधरी यांच्या नेतृत्वाखाली अतिरिक्त महापालिका आयुक्त आंचल गोयल यांच्या आदेशानुसार गुजरवाडी गणेश पेठ वार्ड परिसरात महापालिकेच्या दिवाळी कचरा दान केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. प्रभाग क्र. १७ झोन न.४ कचरा दान केंद्राला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. स्वास्थ निरीक्षक राजेश गायधनी,ग णेशपेठ वार्ड जमादार राजू डेकाटे, वृषभ राजेश, मोघरे कर्मचारी वर्ग निरंजन शेंडे, रोहित अरखेल, नितीन खरे, रवि गौतम अभिषेक गजभिये उपस्थित होते.

स्वच्छ दिवाळी शुभ दिवाळी केंद्रांवर नागरिकांकडून खूप चांगली देणगी मिळाली. महापालिकेच्या दिवाळी कचरा दान केंद्राचे दान केलेल्या वस्तूंचे गरजू लोकांना वाटप करण्यात येणार आहे.

# धारदार शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस केली अटक

### कन्हान पोलीस डीबी पथकाची कारवाई

■ महासागर प्रतिनिधी
**कन्हान, दि. ३० :**

कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत गोंडेगाव कॉलोनी मध्ये हातात तलवार घेऊन फिरणाऱ्या आरोपी गोलु ऊर्फ फिंदु चौधरी ला डीबी पथकाने पकडुन लॉकपबंद केले.

प्राप्त झालेल्या माहिती नुसार सोमवार (दि.२८) ऑक्टोंबर ला दुपारी १२:०० वाजता च्या दरम्यान कन्हान पोलीस डीबी पथक परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली कि गोलु ऊर्फ फिंदु चौधरी हा गोंडेगाव कॉलोनी मध्ये हातात तलवार घेऊन फिरत आहे.

अश्या मिळालेल्या माहिती वरुन पोलीसांनी गोलु ऊर्फ फिंदु चौधरी चा घरी जाऊन परिचय देऊन नाव विचारले असता त्याने आपले नाव रविप्रकाश ऊर्फ गोलु गुलाब चौधरी (वय ३२) रा.गोंडेगाव कॉलोनी असे सांगितले. पोलीसांनी सदर इसमाचा घरची झडती घेतली असता घराच्या आतील खोलीत लाकडी दिवाणाचा गादीखाली निळ्या रंगाच्या कव्हर मध्ये धारदार तलवार किंमत ८०० रु मिळुन आली.

इसमाला शस्त्र बाळगणे बाबत परवाना विचारला असता त्याने परवाना नसल्याचे सांगितल्याने पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करुन आरोपी रविप्रकाश ऊर्फ गोलु गुलाब चौधरी ला अटक करुन त्याचा जवळुन तलवार जप्त करुन गुन्हा दाखल केला असुन गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा मार्गदर्शनात पोना अमोल नागरे करीत आहे.

सदरची कारवाई नागपुर ग्रामीण पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार, अप्पर पोलीस अधिक्षक रमेश धुमाळ यांचा मार्गदर्शनात, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष गायकवाड, पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील, सपोनि राहुल चव्हान, हरिष सोनभद्रे, महेश बिसेन, मपोहवा नालंदा पाटील, अमोल नागरे, अश्विन गजभिए, आकाश सिरशाट सह आदि पोलीस कर्मचारी यांनी ही कारवाई यशस्वीरित्या पार पाडली.

# मध्य रेल्वे नागपूर विभागाकडून सेवाग्राम येथे स्टेशन महोत्सव

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. ३० :**

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने 30 ऑक्टोबर 2024 रोजी सेवाग्राम रेल्वे स्टेशनवर "स्टेशन महोत्सव"चे आयोजन केले.




भारतीय रेल्वेच्या समृद्ध वारशाचा सन्मान करण्यासाठी आणि त्याच्या ऐतिहासिक योगदानाबद्दल जनजागृती करण्यासाठी हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या उत्सवात स्थानिक रहिवासी, रेल्वे कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

कार्यक्रमाची सुरुवात सांस्कृतिक सादरीकरणाने झाली, ज्यात स्थानिक कलांचा देखावा घडवण्यात आला. त्यानंतर रेल्वेच्या जुन्या छायाचित्रांचा, वस्त्रांचा आणि इतर ऐतिहासिक वस्तूंचा समावेश असलेली प्रदर्शनी आयोजित करण्यात आली. ज्यामुळे तरुण पिढीत रेल्वे बद्दल आदर निर्माण झाला.

स्टेशन मास्टर व वरिष्ठ स्टेशन कर्मचाऱ्यांनी उपस्थितांना संबोधित करताना रेल्वे वारसा जतन करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचा समारोप रेल्वे कर्मचाऱ्यांचा सन्मान सोहळ्याने झाला.

"स्टेशन महोत्सव" केंद्रीय रेल्वेच्या समुदायाबद्दलच्या बांधिलकीचा आणि भारताच्या रेल्वे वारशाबद्दल कृतज्ञतेचा गौरवपूर्ण उपक्रम ठरला आहे.

# औदुंबर प्रदक्षिणेतून दत्तनामाचा अखंड जयघोष

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. ३० :**

दत्तसंप्रदायाच्या प्रचार-प्रसारार्थ कार्यरत श्रीगुरुमंदिर जयप्रकाशनर येथे श्रीगुरुद्वादशी आणि श्रीपाद श्रीवल्लभ स्वामींच्या निजानंदगमन दिनाचे औचित्य साधत सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत अखंड औदुंबर प्रदक्षिणेचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्यातून दत्तनामाचा जयघोष तर झालाच शिवाय सायंकाळी काढण्यात आलेल्या पंचप्रदक्षिणा पालखी मिरवणुकीत पदांनी संपूर्ण परिसरात दत्तनामाचा गजर झाला. यावेळी धर्मभास्कर सद्गुरुदास महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती.



या उपक्रमाचे आयोजन दरवर्षी श्रीगुरुमंदिरातर्फे करण्यात येते व त्यात मोठ्या संख्येत भाविक सहभागी होतात. सकाळी प्रभातसमयी पुष्प आणि दीपांची आरास करण्यात आली. त्यानंतर भाविकांची अक्षरशः रिघ सुरू होती.

सायंकाळपर्यंत अंदाजे एक हजाराहून अधिक भाविकांनी औदुंबर प्रदक्षिणा करून पुण्यप्राप्ती करून घेतली. सायंकाळी प्रदक्षिणा उपक्रमाचा समारोप पालखी प्रदक्षिणेने झाला. यावेळी उपासनेच्या पुस्तिकेतील पाचही प्रदक्षिणांचे गायन सुरू होते. फटाक्यांची आतषबाजी आणि दिगंबरा, दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबराचा गजर अशा मंगलमय वातावरणात औदुंबराभोवती पालखी झुलत होती. प्रदक्षिणा पूर्ण झाल्यानंतर आरती व महाप्रसादाने उपक्रमाची सांगता झाली.

# द्रुगधामना हायस्कूलच्या रिधिमा वाघमारेंचा गुणगौरव

■ महासागर प्रतिनिधी
**वाडी, दि. ३० :**

श्री दत्ता मेघे फाउंडेशन, नागपूर तर्फे भव्य निबंध स्पधार्चे आयोजन करण्यात आले होते. त्या स्पर्धेत द्रुगधामना हायस्कूलची वर्ग १० वीची विद्याथीर्नी रिधिमा भगवान वाघमारे हिने आईः जगण्याची प्रेरणा याविषयावर निबंध लिहीला होता. तो निबंध उत्कृष्ठ ठरल्याबद्दल रिधिमाचा संस्थेतर्फे ट्रॉफी, सर्टिफिकेट, व रोख रक्कम देऊन पुरस्काराने गौरविण्यात आले.

आयोजन समितीचे अध्यक्ष रवि मेघे यांच्या हस्ते पुरस्कार वितरीत करण्यात आला. एकूण ३००० विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यात ३२०विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला.

रिधिमाने आपल्या यशाचे श्रेय आई वडीलासह प्राचार्या ज्योती अढावू वर्गशिक्षिका आरती भोरे, मराठी विषयाच्या शिक्षिका वंदना मुसळे आदींना दिले.

रिधिमाचे प्रा. अविनाश चौधरी, प्रा.बाबूलाल मोरे, प्रा.नंदकिशोर भोयर, प्रा. प्रगती पाचपोहर, प्रा. जयश्री किरणापूरे, प्रा. अविनाश बारब्दे, प्रा. गजानन काकड, आरती भोरे, वंदना मुसळे,सुनीता चव्हाण, वैशाली लोही, प्रकाश मस्के, विलास चौधरी, विलास मुसळे ,लक्ष्मण शिंदे, राजेंद्र शेळके, शंकर राऊत, पंढरी धार्मीक आदींनी कौतुक केले.



# कुरैशी समाजासाठी काँग्रेसने लक्ष द्यावे : मोहम्मद सलीम कुरेशी

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. ३० :**

कुरैश फाउंडेशन इंटरनॅशनलने 2024 विधानसभा निवडणुकीसाठी मध्य नागपूर काँग्रेस उमेदवार निवड प्रक्रियेत मुस्लिम ओबीसी प्रतिनिधित्वाच्या अभावाबद्दल चिंता व्यक्त केली .नागपूर, भारत - मध्य नागपूरातील मुस्लिम समाज आणि अनेक काँग्रेस समर्थकांच्या वतीने, कुरैश फाउंडेशन इंटरनॅशनलने 2024 विधानसभा निवडणुकीत मुस्लिम उमेदवार, विशेषतः 85% मुस्लिम ओबीसी समुदायाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या उमेदवाराच्या अनुपस्थितीबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. हा निर्णय राहुल गांधी यांच्या धार्मिक आणि जातीय लोकसंख्येचे योग्य प्रतिनिधित्व करण्याच्या आवाहनाच्या विरोधात दिसतो.




समुदायाच्या आकांक्षांचे योग्यरित्या प्रतिनिधित्व करणाऱ्या मुस्लिम उमेदवाराच्या अभावामुळे अनेकांना दुर्लक्षित आणि अप्रतिनिधित्वित वाटत आहे. हा समुदाय काँग्रेसचा दीर्घकालीन आधारस्तंभ राहिला आहे, परंतु अद्याप योग्य प्रतिनिधित्वाची कमतरता दिसून येत आहे.

अंतिम निर्णय अद्याप घेतलेला नसला, तरी जोपर्यंत समुदायाच्या हिताचे खरे प्रतिनिधित्व करणारा उमेदवार समोर येत नाही, तोपर्यंत सक्रिय सहभाग प्रेरित करणे कठीण आहे.

कुरैशी समाजासाठी काँग्रेसने लक्ष द्यावे -मोहम्मद सलीम कुरेशी त्यावेळी पत्र परिषदेमध्ये मंचावरील डॉ. मोहम्मद आसिफ कुरेशी अध्यक्ष कुरैश फाउंडेशन इंटरनॅशनल, मोहम्मद सलीम कुरेशी सरचिटणीस, अशफाक अहमद कुरेशी, नाझीम कुरेशी, नजीर कुरेशी, कमाल अख्तर अन्सारी, रिजवान कुरेशी चौधरी यावेळी यांची उपस्थिती होती.

# निवडणूक छाननी प्रक्रिया पार पाडावी : सुनील कुमार



■ महासागर प्रतिनिधी
**कामठी, दि. ३० :**

राष्ट्रीय निवडणुक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणुक निवडणुक कार्यक्रमा नुसार आगामी २० नोव्हेंबरला कामठी मौदा विधान सभा मतदार संघाची सार्वत्रिक निवडणुक होणार आहे. त्याप्रमाणे २२ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर पर्यंत कामठी तहसील कार्यालयांतील सभागृहात निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांकडे उमेदवारांनी पक्ष व अपक्ष असे २९ उमेदवारांनी ३३ अर्ज दाखल केले.

त्या नुसार कामठी मौदा विधान सभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ अतंर्गत ५८ कामठी विधान सभा मतदार संघासाठी प्राप्त उमेदवारांच्या नामनिर्देश पत्रांची छाननी आज दिनांक ३० ऑक्टोबर ला सकाळी ११ वाजता निवडणुक निर्णय अधिकारी ५८ कामठी विधान सभा संघ यांचे सभागृहात निवडणूक निरीक्षक सुनील कुमार तसेच उमेदवार/प्रस्तावक/ प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत करण्यात आला. दरम्यान प्राप्त नामनिर्देशन पत्राची संक्षिप्त छाननी प्रक्रिया पार पाडावी व सदर छाननी प्रक्रियेबाबत निवडणूक आयोगाने दिलेल्या निदेर्शांचे पालन करण्याच्या सुचना निवडणूक निरीक्षक सुनील कुमार यांनी दिल्या.

## उद्या मेट्रो सेवा सायंकाळी ६ वाजेपर्यंत

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. ३० :**

दिवाळीच्या निमित्ताने शुक्रवार, १ नोव्हेंबर रोजी मेट्रो सेवा संध्याकाळी ६ वाजेपर्यंत राहणार असल्याची माहिती मेट्रोने दिली आहे. लक्ष्मी पूजनाच्या दिवशी संध्याकाळच्या वेळेस घरोघरी पूजा असल्याने प्रवासी संख्या कमी असते.

त्यामुळे नागपूर मेट्रोच्या - खापरी, प्रजापती नगर, ऑटोमोटिव्ह स्केअर आणि नगर - या चारही टर्मिनल स्टेशन वरून शेवटची मेट्रो गाडी संध्याकाळी ६ वाजता सुटणार आहे. यासंदर्भात प्रवाशांनी आपल्या प्रवासाची योजना करावी, असे आवाहन मेट्रोने केले आहे.

# विनयभंगाचा गुन्हा रद्द करण्याची तरुणीची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. ३० :**

नागपूरमधील एका तरुणीने पोलीस कर्मचाऱ्यावर विनयभंगाचा गुन्हा दाखल केला. हा गुन्हा रद्द करण्यासाठी संबंधित पोलीस कर्मचाऱ्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली. याचिका दाखल झाल्यावर तक्रारदार तरुणीनेही गुन्हा मागे घेण्यास आक्षेप नसल्याचे सांगितले. विनयभंगाचा गुन्हा दाखल केल्यामुळे मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे युपीएससी परीक्षेच्या तयारीवर विपरित परिणाम होत असल्याचे कारण देत तक्रारदार तरुणीने गुन्हा मागे घेण्यास परवानगी दिली.

नंदनवन पोलीस ठाण्याच्या हद्दीत तक्रारदार २३ वर्षीय तरुणी राहते. तिचे वडील पोलीस विभागात कार्यरत आहेत. वडीलांचे मित्रही पोलीस विभागात असल्याने ते वारंवार घरी येत होते आणि त्यांच्यात कौटुंबिक संबंध निर्माण झाले. ५९ वर्षीय वडीलांच्या मित्राने तरुण मुलीवर वाईट नजर टाकायला सुरुवात केली. ते तरुणीला आक्षेपार्ह संदेश पाठवायचे, फोन करून वारंवार त्रास द्यायचे.

वारंवार होणाऱ्या याप्रकारामुळे तरुणीने वडीलाच्या मित्राविरोधात विनयभंगाची तक्रार दाखल केली. तरुणीच्या तक्रारीनंतर नंदनवन पोलिसांनी भारतीय दंड विधानच्या कलम २९४, कलम ३२३, कलम ३५४ आणि कलम ४५२ अंतर्गत गुन्हा दाखल केला. हा गुन्हा रद्द करण्यासाठी संबंधित पोलीस कर्मचाऱ्याने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. न्या.विनय जोशी आणि न्या.अभय मंत्री यांच्या खंडपीठासमक्ष याप्रकरणावर सुनावणी झाली.

गुन्हा रद्द करण्यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्यावर तरुणीने न्यायालयात शपथपत्र दाखल केले. शपथपत्रात तिने सांगितले या प्रकरणामुळे तिच्या मानसिक अवस्थेवर परिणाम होत आहे. त्यामुळे ती हे प्रकरण चालवू इच्छित नाही.

याशिवाय तरुणीने बी.टेक.चे शिक्षण पूर्ण केले आहे आणि आता ती केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षेची [युपीएससी] तयारी करत आहे. या प्रकरणामुळे ती नीटप्रकारे युपीएससी परीक्षेची तयारी करू शकत नाही. याचिका निकाली काढली तर ती परीक्षेच्या तयारीवर लक्ष केंद्रित करू शकेल, असे तिने न्यायालयाला सांगितले.

तरुणीच्या आईवडीलांनीही याप्रकरणी न्यायालयात मत नोंदविले. तरूणी आता लग्नाच्या वयात येत आहे. त्यामुळे जर प्रकरण प्रलंबित राहिले तर याचा परिणाम तिच्या लग्नावरही होऊ शकतो, असे तिच्या पालकांनी न्यायालयाला सांगितले. न्यायालयाने सर्व बाबी लक्षात घेता आरोपी पोलीस कर्मचाऱ्यावरील गुन्हा रद्द करण्याचे आदेश दिले. यासह आरोपी पोलीस कर्मचाऱ्याच्या फोनमधील सर्व आक्षेपार्ह सामग्री तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली नष्ट करण्यात यावी, असेही निर्णयात स्पष्ट केले.

# दक्षिण पूर्व मध्य रेल्वे नागपूर विभागातर्फे स्वच्छता चौपालचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. ३० :**

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे नागपूर विभागात स्वच्छ भारत अभियान अंतर्गत 2/10/2024 ते 31/10/2024 या कालावधीत स्वच्छता चौपाल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. डिजिटायझेशन, स्वच्छता, सर्वसमावेशकता आणि तक्रार निवारण यावर भर देणारी विशेष मोहीम 4.0 रेल्वे प्रशासनाने सुरू केली आहे. नमिता त्रिपाठी- विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांनी अधिकाऱ्यांना रेल्वे स्थानकांवर स्वच्छता चौपाल उभारण्याचे निर्देश दिले आणि या स्वच्छता चौपालमध्ये लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायत व नागरी संस्थांचे प्रतिनिधी तसेच संबंधित क्षेत्रातील प्रबुद्ध व्यक्ती, डी आर यू सी सी सदस्यांना आमंत्रित करावे. स्थानके स्वच्छतेत सुधारणा करण्यासाठी सूचना घ्याव्यात. जेणेकरून स्वच्छता अभियानात लोक सहभागाची खात्री करता येईल.



दिलीप सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली विभागांतर्गत नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी, कामठी, गोंदिया, नैनपूर, तुमसर रोड, भंडारा रोड, नागभीड, डोंगरगढ आणि छिंदवाडा स्थानकात स्वच्छता चौपाल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याअंतर्गत प्रवाशांशी थेट संवाद साधून त्यांना रेल्वे आवारातील स्वच्छता, रेल्वे सुरक्षा आणि उपलब्ध सुविधांची जाणीव करून देण्यात आली, तसेच प्रवासी व स्थानिक जनतेच्या सोयी-सुविधा व समस्यांबाबत माहिती घेण्यात आली जेणेकरून रेल्वे भारतीय रेल्वेमध्ये प्रवाशांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या रेल्वे सुविधांमध्ये सुधारणा करून रेल्वे सेवा आणखी सुधारता येईल.

वरील सर्व रेल्वे स्थानकांवर, पदनिर्देशित अधिकारी, स्थानक अधीक्षक, व्यावसायिक कर्मचारी आणि रेल्वे संरक्षण दलाच्या कर्मचाऱ्यांनी डी आर यू सी सी सदस्य आणि प्रवाशांशी थेट संवाद साधला आणि स्थानकांवर आयोजित केलेल्या चौपाल कार्यक्रमात प्रवाशांना स्थानकांवर ठेवण्यास सांगितले.

स्टेशन परिसर स्वच्छ करण्यासाठी प्रेरित. यावेळी प्रवाशांनी अनेक नवीन सूचनाही केल्या. ट्रेनच्या वेळी काउंटरवर गर्दी असते, असे प्रवाशांनी सांगितले तेव्हा मोबाइल ॲपवर प्रवाशांना सांगितले की, ते तिकीट मोबाइलवरूनच काढू शकतात रेल्वे मदत क्रमांकाची माहिती देण्यात आली.

जेणेकरून प्रवाशांना कोणत्याही प्रकारची तक्रार नोंदवता येईल आणि त्यावर लवकरात लवकर तोडगा काढता येईल.स्वच्छता चौपाल हे प्रवाशांचा अनुभव सुधारण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे जे प्रवाशांना सुरक्षितता आणि स्वच्छतेशी संबंधित महत्त्वाच्या मुद्द्यांवर संवेदनशील बनवेल, तसेच, हे सामुदायिक संवादाचे व्यासपीठ आहे, जेथे प्रवासी त्यांच्या समस्या आणि सूचना थेट रेल्वेशी शेअर करू शकतात. यामुळे समस्या सोडवण्याच्या प्रक्रियेला गती मिळण्यासही मदत होईल.

# फडणवीसांच्या मतदारसंघातील प्रतिस्पर्ध्यांचे निम्मे अर्ज बाद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :



राज्याच्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यंदाही नागपूर दक्षिण-पश्चिम विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात आहेत. २००९ मध्ये दक्षिण-पश्चिम विधानसभा क्षेत्राची निर्मिती झाल्यापासून देवेंद्र फडणवीस या मतदारसंघातून विजयी होत आहे. उपमुख्यमंत्री यांचा बालेकिल्ला असलेल्या दक्षिण-पश्चिम विधानसभा क्षेत्रातील हालचालींकडे संपूर्ण राज्यातील जनतेचे लक्ष लागले आहे.

यंदा दक्षिण-पश्चिम विधानसभा क्षेत्रातून निवडणुकीसाठी ४० अर्ज दाखल करण्यात आले. यापैकी निवडणूक आयोगाने १९ अर्ज स्वीकारले तर १८ अर्ज बाद केले. उर्वरित तीन अर्जांवर अद्याप निर्णय झालेला नाही. बुधवारी सायंकाळपर्यंत निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, नागपूर शहरातील सहा विधानसभा क्षेत्रातील मतदारसंघापैंकी सर्वाधिक अर्ज दक्षिण-पश्चिम विधानसभा क्षेत्रातच बाद झालेले आहेत.

नागपूर दक्षिण-पश्चिम मतदार संघातून भाजपच्यावतीने स्वतः देवेंद्र फडणवीस मैदानात आहेत तर त्यांचे मुख्य प्रतिद्वंदी म्हणून काँग्रेसने प्रफुल गुडधे पाटील यांना निवडणूकीच्या रिंगणात उभे केले आहे. दोन्ही प्रमुख उमेदवाराचे अर्ज निवडणूक आयोगाने मंजूर केले आहेत.

याशिवाय भीमसनेचे पंकज शंभरकर, बहुजन रिपब्लिकन सोशलिस्ट पक्षाचे मारोती वानखेडे, बहुजन समाज पक्षाचे सुरेंद्र डोंगरे, वंचित बहुजन आघाडीचे विनय भांगे, पीपल्स पार्टी ऑफ इंडियाचे ओपुल तामगाडगे, अखिल भारतीय परिवार पक्षाच्या उषा ढोक, विकास इंडिया पक्षाचे विनायक अवचट यांचे अर्ज मंजूर करण्यात आले. अपक्ष उमेदवारांमध्ये नितीन गायकवाड, सचिन वाघाडे, महमूद खान, विनोद मेश्राम यांचा समावेश आहे. नागपूर दक्षिण-पश्चिम विधानसभा क्षेत्रात काही उमेदवारांनी एकपेक्षा अधिक अर्ज दाखल केले होते. यात काँग्रेसचे प्रफुल गुडधे पाटील यांनी सर्वाधिक चार तर भाजपचे देवेंद्र फडणवीस यांनी दोन अर्ज दाखल होते.

दोघांचेही सर्व अर्ज मंजूर करण्यात आले. ४ नोव्हेंबर ही अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत आहे. या मुदतीपर्यंत इतर अर्ज मागे घेतले जातील.

दक्षिण-पश्चिम विधानसभा क्षेत्रात एकूण ४० अर्जांपैकी १८ अर्ज बाद झाले.

यात देश जनहित पक्षाचे घनश्याम पुरोहित, ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉकचे ॲड.संतोष लांजेवार, लोक स्वराज्य पक्षाचे अमोल हाडके, रिपब्लिकन पक्षाचे रामचंद्र वानखेडे, बळीराजा पक्षाचे दत्तु मोहिते, राष्ट्रीय गोंडवाना पक्षाच्या संस्कृती पेंडोर, रिपब्लिकन सेनेचे राजेंद्र मेश्राम यांचे अर्ज बाद करण्यात आले. याशिवाय अपक्ष उमेदवार जॉनी रायबोर्डी, सुरेश घाटे, वर्षा नांदगावे, चक्रधर जांभुळे, अजय डांगे, यशवंत कावरे, पंकज काळबांडे, उषा चौधरी यांचे अर्ज बाद झाले.

# बालकांसोबत घेऊन बनवली टोळी

## ४ चोरीचे गुन्हे उघडकीस

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

गुन्हेगारी प्रवृत्तीच्या तरुणाने परिसरातील अल्पवयीन मुलांना सोबत घेऊन स्वतःची टोळी बनवली. ही टोळी गत 3 महिन्यांपासून अंबाझरी ठाण्यांतर्गत चोरीत सक्रीय होती. एका ठिकाणी मिळालेल्या सीसीटीव्ही फुटेजवरून पोलिसांना आरोपींचा सुगावा लागला. आरोपी तरुण व त्याच्या चार अल्पवयीन साथीदारांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता 4 घटनांचा खुलासा झाला. अर्णव उर्फ दिनेश अवनकर (20) रा. पांढराबोडी, अंबाझरी बायपास रोड असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

फियार्दी इंद्रपाल विश्वकर्मा (50) यांचा फुटाळा तलावाजवळ पानठेला आहे. गत 19 सप्टेंबरच्या रात्री इंद्रपाल पानठेला बंद करून घरी गेले होते.

मध्यरात्रीला चोरांनी कुलूप तोडून पानठेल्यात ठेवलेली सिगारेटची पाकिटे आणि रोख 20 हजार रुपयांसह 40 हजार रुपयांचा माल चोरून नेला. पोलिसांनी इंद्रपाल यांच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासण्यात आली. खबऱ्यांनाही कामावर लावण्यात आले. दरम्यान अर्णव आणि त्याचे अल्पवयीन साथीदार चोरीत सक्रीय असल्याची माहिती मिळाली.

पोलिसांनी संशयाच्या आधारावर अर्णवला ताब्यात घेऊन चौकशी केली. त्याने 4 अल्पवयीन साथीदारांसोबत मिळून इंद्रपाल यांचा पानठेला फोडल्याची माहिती दिली.

सखोल चौकशीत पाचही आरोपींनी अंबाझरी ठाण्यांतर्गतच मोबाईल आणि वाहन चोरीही केल्याची माहिती दिली. पोलिसांनी आरोपींकडून 6 दुचाकी वाहन, 6 मोबाईल फोन आणि सिगारेटची पाकिटे असा एकूण 2.21 लाख रुपयांचा माल जप्त केला आहे.

# पोलीस आणि एसएसटीच्या कारवाईतून १४.६ लाख रुपये जप्त

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांसह निवडणूक आयोग अत्यंत दक्षतेने काम करत आहे. निवडणुकीत मतदारांचा प्रभाव पडू नये यासाठी पोलिसांच्या झडतीसह विविध उपाययोजना केल्या जात आहेत. अजूनही कार्यरत आहे. या क्रमाने लकडगंज पोलिसांनी मोठी कारवाई करत दोन वाहनांमधून एकूण १४.६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

निवडणुकीच्या काळात मतदारांची मते मिळविण्यासाठी उमेदवार सर्वतोपरी प्रयत्न करतात. त्यासाठी प्रचार-प्रसार तर होतोच, पण काही वेळा पैशांची देवाणघेवाणही होते. ज्या निष्पक्ष निवडणुका प्रक्रियेसाठी घातक आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेदरम्यान विशेष देखरेख ठेवली जाते. नागपुरातील लकडगंज पोलीस ठाण्यांतर्गत एका कारची झडती घेतली असता त्यात ९ लाख ४० हजार रुपये सापडले. ाात्र, ही रोकड कोणाची आहे याबाबत माहिती नसल्याने पोलिसांनी ती जप्त केली. तसेच लकडगंज पोलीस ठाण्यांतर्गत गंगाबाई घाट चौकात तपासणी केली असता एका कारमध्ये ५ जण आढळून आले. लाख वीस हजार रुपये मिळाले. या दोन्ही प्रकरणी पोलिसांनी तक्रारी नोंदवून तपास सुरू केला आहे.

# महायुतीने राजकारणाची खालची पातळी गाठली : नाना पटोले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी कथित सिंचन घोटाळ्यासाठी दिवंगत आर. आर. पाटील यांना जबाबदार धरल्याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे. आज आबा (आर.आर. पाटील) हयात नाहीत. त्यामुळे त्यांच्याविषयी अशा पद्धतीने चर्चा करणे योग्य नाही. पण अजित पवार मोदींच्या वॉशिंग मशीनमध्ये गेल्यामुळे धुतल्या गेलेत हे स्पष्ट आहे, असे ते म्हणालेत.



नाना पटोले नागपूरमध्ये पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, आज आबा हयात नाही. त्यामुळे त्यांच्या विषयी अशा पद्धतीने चर्चा करणे वा बोलणे योग्य नाही. महायुतीचे राजकारण किती खालच्या पातळीवर गेलेले आहे, हे यावरून दिसून येते.

सत्तेसाठी काही पण असे एकंदरीत चित्र आहे. देवेंद्र फडणीस अजित पवारांविरोधात गाडीभर पुरावे घेवून आले होते. त्यांना चक्की पिसायला लावीन असे सांगत होते. मग भ्रष्टाचार झाला की नाही हे त्यांना माहिती नाही काय? मोदींच्या वॉशिंग मशीनमध्ये गेल्यामुळे अजित पवार धुतल्या गेले आहेत. या प्रकरणी महाराष्ट्राच्या राजकीय व्यवस्थेला कलंक लावण्याचा काम झाले आहे. त्याबद्दलचे प्रश्न आता जनताच निवडणुकीत विचारणार आहे.

नाना पटोले यांनी यावेळी पक्षांतर्गत बंडखोरीचा मुद्दा चचेअंती निकाली काढण्याची ग्वाही दिली. यंदाच्या निवडणुकीत महाराष्ट्राच सर्वच पक्षांमध्ये बंडखोरी झाली. त्यावर चर्चेद्वारे तोडगा काढला जाईल. आघाडी म्हटल्यावर काही ठिकाणी अडचणी येतात. दिलीप माने यांना तिकीट जाहीर करून शिवसेनेने जागेवर दावा सांगितल्यामुळे अलायन्स टिकून ठेवण्यासाठी काँग्रेसने केलेला एक प्रयत्न होता. दिलीप माने यांना पुढच्या काळात न्याय दिला जाईल, असे ते म्हणाले.

एकनाथ शिंदे यांनी तिकीट न दिल्यामुळे श्रीनिवास वनगा रडले. सगळ्याच पक्षात अशी परिस्थिती आहे. त्यावर आता चर्चा करावी असे वाटत नाही. नवाब मलिकांना अजित पवारांनी उमेदवारी दिली आहे. महायुतीत महाभारत सुरू आहे. नवाब मालिकांची उमेदवारी ही सुरूवात आहे. भविष्यात अजून खूप काही पाहायला मिळेल, असा टोलाही नाना पटोले यांनी यावेळी महायुतीला लगावला.

# महा निवडणूक-महा रांगोळी स्पर्धेचे मनपाद्वारे आयोजन

**नागपूर:** विधानसभा निवडणुकीमध्ये नागपूर शहरातील नागरिकांनी जास्तीत जास्त मतदान करावे याकरिता जनजागृतीसाठी नागपूर महानगरपालिकेद्वारे विविध अभियान राबविण्यात येत आहेत. नागपूर शहरात मतदानाची टक्केवारी वाढावी याकरिता भारत निवडणूक आयोगाचे मतदारांचे पद्धतशीर शिक्षण आणि निवडणूक सहभाग अर्थात स्वीप कार्यक्रम अंतर्गत शहरात रांगोळी स्पर्धा घेण्यात येत आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर यांच्या संकल्पनेनुसार शहरात दिवाळीच्या दिवशी ३१ ऑक्टोबर ते ०२ नोव्हेंबर २०२४ रोजी महा निवडणूक- महा रांगोळी ही अभिनव स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेतर्गत स्पर्धकांना दिवाळीच्या दिवशी १ नोव्हेंबर २०२४ रोजी आपल्या घरी काढलेल्या रांगोळीचा फोटो माझे मत माझा अधिकार किंवा मेरा मत मेरा अधिकार किंवा मनपाच्या ईमेल आयडीवर किंवा मनपाद्वारे जारी करण्यात आलेल्या क्यूआर कोडवर पाठवायचा आहे. विजेत्या स्पर्धकाला मनपातर्फे आकर्षक बक्षीस देखील प्रदान करण्यात येणार आहेत. जास्तीत जास्त नागपूरकरांनी महा निवडणूक-महा रांगोळी या स्पर्धेमध्ये सहभागी होउन नागरिकांना मतदानाप्रती जागरूक करण्याच्या मोहिमेमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन उपायुक्त तथा सहायक नोडल अधिकारी डॉ. रंजना लाडे यांनी केले आहे.

# १.३२ लाखाच्या मालावर डल्ला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

घराचे कुलूप तोडून अज्ञात आरोपीने सोन्याचांदीचे दागिने व रोकड असा एकूण 1 लाख 32 हजार 700 रुपयांच्या मालावर डल्ला मारला. ही घटना कोराडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी अमित बाबुलाल गोंडाणे (30) रा. गुरूवार बाजार वॉड, कोराडीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. गत 26 ऑक्टोबरच्या रात्री अमित घराला कुलूप लावून कामावर गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटातून रोख 89 हजार व सोन्याचांदीचे दागिने असा एकूण 1,32,700 रुपयांचा माल चोरी करून पसार झाला.

# गायक अरुण सहारे व त्यांचा संच लोकसंगीत कार्यक्रमात नागपूर आकाशवाणीवर

■ महासागर प्रतिनिधी
कळमेश्वर, दि. ३० :



नागपूर येथे आकाशवाणीवर गायक अरुणभाऊ सहारे व त्यांचा संच यांचा कार्यक्रम दिनांक 25 / 10 / 2024 ला शुक्रवारी रात्री आठ वाजून पंधरा मिनिटांनी नागपूर आकाशवाणी केंद्रावरून मुंबई रिले आकाशवाणीवरून प्रसारित करण्यात आला यां गीताच्या विषयावर आकाशवाणी केंद्राच्या माध्यमातून ). राष्ट्रीय एकात्मता 2 ) वृक्षारोपण 3 ) स्वच्छता अभियान या विषयावर एकाच वेळी संपूर्ण महाराष्ट्रातील केंद्रावरून हा कार्यक्रम प्रसारित करण्यात आला होता त्यांच्या या गायनाला संगीत साथ देणारे रवींद्र बांबोळे व हरीश बांबोळे यांनी दिली. तर कोरसची साथ कल्पना सहारे व अनामिका निकोसे यांनी दिली आहे.

त्यांच्या नवीन गीतांचा कार्यक्रम पुन्हा दिनांक 01 / नोव्हेंबर 2024 ला रात्री आठ वाजून पंधरा मिनिटांनी, याच आकाशवाणी केंद्रावरून प्रसारित होणार आहे. भारत सरकार ऑल इंडिया रेडिओ तर्फे या कार्यक्रमाचे रेकॉर्डिंग अरूणभाऊ सहारे व सहकारी संच यांना कार्यक्रमाचे निमंत्रण देऊन दिनांक 17/10/2024 ला आकाशवाणीच्या स्टुडिओत रेकॉरडिंग करण्यात आले होते. आपल्या मोबाईलवर नागपूर आकाशवाणी ची लिंक टच करून हा कार्यक्रम आपण प्रत्येक मोबाईलवर ऐकू शकता असे आव्हान माननीय युवराज मेश्राम विदर्भ प्रसिद्धीप्रमुख विदर्भ शाहीर कलाकार परिषद यांनी एका पत्रकाद्वारे जाहीर केलेले आहे.

# मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना काळी पणती, काळे आकाश कंदील पाठवणार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

४० हजार कोटींहून अधिक रक्कमेची देयके शासनाने थकवल्याने राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागासह इतर विभागाची कामे करणारे तीन लाखांहून अधिक कंत्राटदार व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या कामगार कुटुंबियांची दिवाळी आंधारात जात आहे. त्याकडे लक्ष व वेधण्यासाठी कंत्राटदारांची संघटना राज्यपाल, मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांना काळी पणती व काळा आकाश कंदील पाठवणार आहे.

राज्यातील ३ लाख कंत्राटदारांचे शासनाकडे ४० हजार कोटी रुपयांची देयके थकली आहेत. मागील सहा महिन्यापासून महाराष्ट्र कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटना देयकाच्या मागणीसाठी शासनाकडे पाठपुरावा करीत आहे. कंत्राटदारांनी ३१ सप्टेंबर २०२४ पासून शासनाची कामे थांबवली आहेत. ८ ऑक्टोबर रोजी प्रत्येत जिल्ह्यात धरणे देण्यात आली. १४ ऑक्टोबरपासून दररोज मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना निवेदने मेल केली जात आहे, असे महाराष्ट्र कंत्राटदार महासंघाचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी सांगितले. संघटनेचे एक अधिवेशन नुकतेच धुळे येथे पार पडले. त्यात राज्यातील ३२ जिल्ह्यातील संघटनेचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

शासनाने कंत्राटदारांची देयके चुकती करावी, अशी विनंती या अधिवेशनात करण्यात आली होती. मात्र त्याकडेही दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे कंत्राटदार संतापले असून त्यांनी राज्यपाल, मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना काळी पणती व काळा आकाश कंदील पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला, असे संघटनेचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी सांगितले.

सार्वजनिक बांधकाम विभाग व इतर विभागाकडील विविध देयके देण्यासाठी बीडीएस प्रणाली कार्यरत आहे. पण ऐन दिवाळीत ही प्रणाली पाच दिवसापासून बंद आहे. राज्याची आर्थिक परीस्थिती गंभीर असल्यानेच ही प्रणाली बंद ठेवण्यात आल्याचा आरोप, कंत्राटदारांच्या संघटनेने केला आहे.

कंत्राटदारांना चालू देयके तर अदा केली जात नाहीच दुसरीकडे दोन- चार वर्षात पूर्ण केलेल्या कामांची अनामत रक्कमही शासनाने अडवून ठेवली आहे. काम पूर्ण झाल्यावर कंत्राटदाराने मागणी केल्यास तत्काळ ही रक्कम त्यांच्या खात्यावर जमा करणे आवश्यक असते. मात्र याचे पालनही केले जात नाही.

# शिक्षण ही काळाची गरज तर संस्कार जीवनाची गरज

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :



असे म्हणतात शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे तर संस्कार हे मानवाला मानव बनविणारे मूल्य आहे. त्यामुळे काळाची गरज असलेल्या शिक्षणापेक्षाही जीवनाची गरज असलेल्या संस्कार मूल्यांची संस्कारक्षम बालकांमध्ये रुजवणूक होण्याची गरज आहे आणि याच ध्येयाने प्रेरित वारकरी मंच महाराष्ट्र राज्य नागपूर शहर या कार्यकारिणीची स्थापना झाली व वारकरी संप्रदायाला वारकरी शिक्षणासोबतच सामाजिक जन जागृती या उद्देशांसोबतच आध्यात्मिक शिक्षणाचे बीज रोवणे व संस्कार मूल्यांचे रुजवणूक करण्याचे महत्त्वाचे कार्य या कार्यकारीनीद्वारे गेल्या तीन वर्षांपासून बिजांकुरीत होत आहे.

शिक्षण ही काळची गरज तर संस्कार जीवनाची गरज आहे असे ब्रीदवाक्य असणाऱ्या वारकरी मंच महाराष्ट्र राज्य नागपूर शहरद्वारे अध्यात्मिक मूल्यांची रुजवणूक संस्कारक्षम बालकांवर करण्यासाठी आठवड्यातून एकदा हनुमान आरती, हनुमान चालीसा म्हणण्यात येते. आतापर्यंत बालकांकडून 200 आरत्या म्हणूवून घेण्यात आल्या. गेल्या दोन वर्षांपासून दोन ते अठरा वर्षे वयोगटांच्या मुलांसाठी उन्हाळ्यात अध्यात्मिक बालसंस्कार शिबिर घेण्यात येत आहे. यामध्ये वारकरी हरिपाठ, देवाचे श्लोक, रामरक्षा स्तोत्र यासोबतच सूर्यनमस्कार व योगा घेण्यात येतो. या संस्कार वगार्चे वैशिष्ट्य म्हणजे हे वर्ग खास करून पालकांच्या प्रोत्साहनाने व त्यांच्या उस्फुर्त सहभागाने घेण्यात येतात. या संस्कार वर्गांना हुडकेश्वर पोलीस स्टेशनचे पीआय दरवर्षी हजेरी लावतात.

आतापर्यंत व्हॉइस ओव्हर आर्टिस्ट डॉक्टर स्नेहल शिंदे, श्रीमंत राजे मुधोजी भोसले यांचे मार्गदर्शन तर पर्यावरण विषयी आस्था व छत्रपती शिवाजी महाराजांच्या शस्त्रांचे प्रशिक्षण हितेश डफ यांच्याद्वारे देण्यात आले आहे. यासोबतच विविध सामाजिक उपक्रम घेण्यात येतात. यात सर्वात पहिला उपक्रम हा पर्यावरणाची रक्षा जगाची सुरक्षा हा होता. यामध्ये ट्री सलाईन अंतर्गत छेद असलेल्या बॉटल द्वारे झाडांना पाणी देण्याची व्यवस्था करण्यात आली तसेच दक्षिण नागपूर येथे 80 रोपट्यांचे वृक्षारोपण करून साठ झाडे जगविण्यात आली.

तसेच अनाथ आश्रम व वृद्धाश्रम येथे वृद्धांचे वाढदिवस साजरे करून त्यांना आपलेपणाचा आनंद वाटण्यात येतो याशिवाय गरजू वस्तूंचे दान करण्यात येते. जामठ्याला असलेल्या कुष्ठरोगी समितीमध्ये पाण्याच्या कॅन वाटप करण्यात आले. प्राणीमात्रांविषयी सहानुभूती बाळगून गोमातांचे संरक्षण ही केल्या जाते. या उपक्रमांमध्ये हनुमान चालीसा ची 11 आवर्तने न थांबता म्हणण्यात आली. इको फ्रेंडली सायकल रॅली व हर घर भगवा या उपक्रमांचाही समावेश आहे.

> सामाजिक, अध्यात्मिक उपक्रम राबवण्यासाठी आर्थिक सहाय्याची गरज असते. आतापर्यंत कार्यकारिणी सदस्या कडून व भजन कार्यक्रमाद्वारे जमा झालेल्या निधीतून उपक्रम राबविण्यात आले. पण यापुढे मोठ्या उद्देशांच्या उपक्रमांसाठी मोठ्या निधीची आवश्यकता भासणार आहे तेव्हा इच्छुकांनी यथेच्छ अर्थ सहाय्य करावे.
>
> **मयूर वाजगे, वारकरी मंच महाराष्ट्र राज्य नागपूर शहर जिल्हाध्यक्ष**

> आमच्या कार्यकारिणीच्या कामांची दखल घेऊन शाळांमधून मुलांना आध्यात्मिक व संस्कार मूल्यांची शिकवणूक देण्यासाठी बोलावणे येत आहे तेव्हा शाळांसाठी एक तास काढण्याचा आमचा कयास आहे. बाबा आमटे कुष्ठरोगी समिती जामठा व आदिवासी देसाई निवासी शाळा येथे गरजू वस्तूंचे दान इच्छुकांकडून करण्यात यावे
>
> **दिनेश कांबळे, वारकरी मंच महाराष्ट्र राज्य नागपूर शहर शहर अध्यक्ष**

या वारकरी मंचाचे वारकरी युवा भजन मंडळ आहे. नवरात्र, गणपती मध्ये मंदिरात व घरोघरी भजनाचा कार्यक्रम घेण्यात येतो व यातून होणाऱ्या उत्पन्नापासून सामाजिक उपक्रम राबवील्या जातात.

या वारकरी मंचाची खासियत म्हणजे या कार्यकारणीचे सर्व सदस्य 18 ते 24 वर्षे वयोगटाची असून कुणीच शिकत आहेत तर कुणी जॉब करून काम सांभाळत आहे. सर्वजण मनापासून शिस्तबद्ध रीतीने व तेवढाच आत्मीयतेने उपक्रम राबवित असल्याने बालक व पालक वर्ग त्यांच्याशी मनोभावे जुळला गेलेली आहे. 2021 ला स्थापित या कार्यकारिणीचे काम बघून श्री स्वामी समर्थ अक्कलकोट सेवा संस्थाद्वारे 2023 चा राज्यस्तरीय स्वामी सेवा रत्न पुरस्कार देण्यात आला. याशिवाय या मंचाने दक्षिण नागपूर खासदार भजन स्पर्धेत चौथा क्रमांक पटकाविला.

वारकरी संप्रदायाला शास्त्रोक्त पद्धतीने वारकरी शिक्षण देण्यासाठी 2019 ला आळंदी पंढरपूर येथे वारकरी मंचाची स्थापना करण्यात आली. या समितीने वारकरी मंच महाराष्ट्र राज्य नागपूर शहरालाही संलग्नित करून घेतले आहे. या निवासी विद्यालयात शालेय शिक्षणासोबतच वारकरी शिक्षणाचे धडे देण्यात येतात याही संस्थेशी हे वारकरी मंच जुळलेले आहे.

